RNI No. MAHBIL /2009/37831
Reg. No. MH/MR/South-339/2011–13

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग चार–ब

वर्ष ५, अंक ६८] सोमवार, ऑगस्ट २६, २०१३/भाद्र ४, शके १९३५ [पृष्ठे ५०, किंमत : रुपये ९.००

असाधारण क्रमांक ११६

## प्राधिकृत प्रकाशन

**महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र अधिनियमांन्वये तयार केलेले**
**(भाग एक, एक-अ आणि एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले नियम व आदेश यांव्यतिरिक्त) नियम व आदेश.**

**सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग**
मंत्रालय विस्तार, हुतात्मा राजगुरु चौक,
मादाम कामा मार्ग, मुंबई ४०० ०३२, दिनांक २० ऑगस्ट २०१३

**अधिसूचना**

**महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६०.**

क्रमांक सीएसएल. २०१३/सीआर क्र. ६३९/१५ सी.—महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० (१९६१ चा महा. २४) कलम १६५ च्या उप-कलम (२) अंतर्गत प्राप्त अधिकारांचा वापर करून आणि त्याबाबतच्या इतर सर्व अधिकारांनुसार राज्य शासन खालील प्रस्तावित नियम मसुदा जे त्यामुळे प्रभावित होणार असतील अशा सर्व व्यक्तींच्या माहितीसाठी आणि हे मसुदा आणि नियम महाराष्ट्र शासन दिनांक ३ सप्टेंबर २०१३ रोजी किंवा तद्नंतर विचारात घेईल ह्याची सूचना देण्यासाठी खालील नियम मसुदा ह्याद्वारे प्रकाशित करण्यात येत आहे.

२. ह्या मसुद्याबाबत कोणत्याही व्यक्तीकडून कोणताही आक्षेप व सूचना महाराष्ट्र शासनाचे सचिव, मंत्रालय विस्तार, हुतात्मा राजगुरू चौक, मादाम कामा रोड, मुंबई ४०० ०३२ ह्या पत्त्यावर प्राप्त झाल्यास वर नमूद दिनांकापूर्वी त्यांचा शासन विचार करील.

**नियम मसुदा**

क्रमांक सीएसएल. २०१३/सीआर क्र. ६३९/१५ सी. महाराष्ट्र सहकारी संस्था कायदा, १९६० (१९६१ चा महा. २४) च्या कलम १६५ च्या उप-कलम (२) अंतर्गत प्राप्त अधिकारांचा वापर करून आणि त्याबाबतच्या इतर सर्व अधिकारांनुसार आणि निवडणूकबाबतचे सद्याचे सर्व नियम निष्प्रभावित करून **महाराष्ट्र शासन राजपत्र** असाधारण भाग चार-ब, दिनांक २० ऑगस्ट २०१३ मध्ये प्रकाशित शासन अधिसूचना, सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग क्रमांक सीएसएल. २०१३/सीआर क्र. ६३९/१५ सी, दिनांक १९ ऑगस्ट २०१३ महाराष्ट्र शासन आक्षेप व सूचनांचा विचार करून ह्याद्वारे सहकारी संस्थांच्या निवडणुका घेण्याचे नियमन करण्याचे खालील नियम तयार करीत आहेत ते खालीलप्रमाणे :—

**महाराष्ट्र सहकारी संस्था निवडणूक नियम, २०१३**

भाग-एक

**प्राथमिक**

१. **संक्षिप्त नाव, व्याप्ती व प्रयुक्ती**—

(१) या नियमांस, महाराष्ट्र सहकारी संस्था निवडणूक नियम, २०१३ असे म्हणण्यात येईल.

(२) हे संपूर्ण महाराष्ट्र राज्यास लागू होतील.

(३) हे नियम, यथास्थिती शासनाचे राजपत्रात प्रसिद्धीच्या दिनांकापासून लागू होतील.

**२. व्याख्या - संदर्भानुसार दुसरा अर्थ अपेक्षित नसेल तर, या नियमात—**

(१) ' कायदा ' म्हणजे महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६०.

(२) ' मतदान पेटी ' यात कोणतीही पेटी/पिशवी किंवा इतर जमा करावयाचे इतर साधन ज्यात मतदार मतपत्रिका टाकू शकतील याचा समावेश असेल.

(३) ' उपविधी ' म्हणजे कायद्यान्वये नोंदणीकृत झालेली संस्थेची उपविधी.

(४) ' मुख्य कार्यकारी अधिकारी ' म्हणजे ज्या संस्थेची निवडणूक व्हावयाची आहे अशा संस्थेचा प्रशासकीय प्रमुख अथवा समकक्ष अधिकारी.

(५) ' समिती ' म्हणजे जिच्याकडे संस्थेच्या कारभाराचे व्यवस्थापन सोपविण्यात आली असेल अशा त्या सहकारी संस्थेची व्यवस्थापन समिती किंवा संचालक मंडळ किंवा नियामक मंडळ किंवा अन्य निर्देशन निकाय मग तो कोणत्याही नावाने संबोधण्यात येवो.

(६) ' मतदार संघ ' म्हणजे संस्थेच्या उपविधीमध्ये विनिर्दीष्ट केल्याप्रमाणे निर्वाचक विभाग.

(७) ' भ्रष्ट कृती ' म्हणजे नियम ७५ मध्ये नमूद केलेली कोणत्याही कृती.

(८) ' जिल्हा सहकारी निवडणूक अधिकारी ' म्हणजे राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरणाने मान्यता दिलेला/ दिलेले उप निबंधक सहकारी संस्थाच्या दर्जापेक्षा कमी नसलेले जिल्ह्याचे अधिकारी की, जे त्यांच्या जिल्ह्यात राज्य सहकारी निवडणूक प्राधिकारणाला संस्थांच्या निवडणुकीमध्ये त्यांचे कर्तव्य व जबाबदा-या पार पाडण्यात मदत करील/करतील व ते राज्य सहकारी निवडणूक आयोगाच्या नियंत्रणात असतील.

(९) ' निवडणूक ' म्हणजे संस्थांची समितीचा सदस्य किंवा सदस्यांची तसेच पदाधिका-यांची निवडणूक.

(१०) ' मतदारांची यादी ' म्हणजे नियम ८ व नियम ११ नुसार, अंतिम रूप दिलेली मतदाराची यादी.

(११) ' निरीक्षक ' म्हणजे राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरणाने सहकारी संस्थांच्या निवडणुकांवर लक्ष ठेवण्यासाठी किंवा तद्अनुषंगाने नेमून दिलेली इतर कार्ये पार पाडण्यासाठी निर्देशित केलेले शासकीय अधिकारी.

(१२) ' मतदान अधिकारी ' म्हणजे निवडणूक निर्णय अधिका-याने निवडणुकीकामी नेमलेली व्यक्ती.

(१३) ' मतदान केंद्राध्यक्ष ' म्हणजे निवडणूक निर्णय अधिका-याने निवडणुकीकामी नेमलेली व्यक्ती.

(१४) ' सार्वजनिक सुट्टी ' म्हणजे परक्राम्य लेख अधिनियम, १८८१ (१८८१ चा २६) यांच्या कलम २५ च्या प्रयोजनाकरिता सार्वजनिक सुट्टीचा असेल किंवा राज्यातील किंवा त्यांच्या कोणत्याही भागातील सरकारी कार्यालयासाठी सुट्टीचा दिवस म्हणून राज्य शासनाने जाहीर केलेला कोणताही दिवस किंवा जिल्हाधिका-याने जाहीर केलेला स्थानिक सुट्टीचा दिवस.

(१५) ' राखीव जागा ' म्हणजे अनुसूचित जाती किंवा अनुसूचित जमाती, महिला, विमुक्त जाती किंवा भटक्या जमाती किंवा विशेष मागासप्रवर्ग, इतर मागास वर्ग यातील व्यक्तींसाठी राखून ठेवलेली जागा.

(१६) ' निवडणूक निर्णय अधिकारी ' म्हणजे सहकारी संस्थांच्या निवडणुका पार पाडणेकामी राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरणाने किंवा प्राधिकरणाचे वतीने प्राधिकृत केलेल्या अधिका-याने नेमणूक केलेली व्यक्ती.

(१७) ' रा.स.नि.प्रा./प्राधिकरण ' म्हणजे उक्त अधिनियमाच्या कलम ७३ क ब नुसार राज्य शासनाने गठीत केलेले राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण.

(१८) ' कलम ' म्हणजे उक्त अधिनियमाचे कलम.

(१९) ' संस्था ' म्हणजे उक्त अधिनियमात विनिर्दिष्ट केलेली सहकारी संस्था.

(२०) ' तालुका किंवा प्रभाग सहकारी निवडणूक अधिकारी ' तालुक्यातील/प्रभागातील सहकारी संस्थांच्या निवडणुका पार पाडण्याच्या दृष्टीने संपूर्ण कामकाज पाहणारा राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरणाने मान्यता दिलेला आणि राज्य सहकारी प्राधिकरण व जिल्हा सहकारी निवडणूक अधिकारी यांचे नियंत्रणाखाली असलेले अधिकारी.

**३. राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरणाचे अधिकार (रा.स.नि.प्रा.) :—**

राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरणास सहकारी संस्थांच्या निवडणुका पार पाडण्याकामी खालील अधिकार व शक्ती असेल

(१) राज्य शासन, जिल्हा परिषद किंवा कोणतीही स्थानिक स्वराज्य संस्था किंवा कोणतीही सहकारी संस्था त्यांच्या कोणत्याही अधिका-यास निवडणुकीच्या कामासाठी कोणत्याही पदावर, हुद्यावर व कर्तव्ये सोपवून नेमू शकतील.

(२) प्रत्येक अधिकारी किंवा सेवकवर्ग जो अशा रीतीने नेमला आहे, त्याने त्याच्यावर त्याला नेमून दिलेली कर्तव्ये बजाविली पाहिजेत व अशा रीतीने त्याला नेमून दिलेली कर्तव्ये त्याने न बजाविल्यास विधीयुक्त प्राधिका-याचा अवमान केल्याबद्दल खटला दाखल केला जाण्यास पात्र असेल असा विधीयुक्त प्राधिकारी भारतीय दंड संहितेच्या प्रकरण १० तरतुदीनुसार लोकसेवक आहे व अशा लोकसेवकाने नेमून दिलेली विधीयुक्त कर्तव्ये न केल्यास खटला केला जाण्यास पात्र राहील.

(३) जरूर लागेल त्याप्रमाणे कोणत्याही शासकीय कार्यालय, स्थानिक स्वराज्य संस्था, सहकारी संस्थेकडून निवडणुकीच्या कामासाठी कोणतीही जागा, वाहन किंवा कोणतीही लागणारी वस्तू मागणी करून घेता येईल. अशारितीने मागून घेतलेली कोणतीही वस्तू (जागा, वाहन वैगेरे. . .) ज्यांच्याकडे अशी मागणी केली आहे, ती जागा, वाहन किंवा इतर वस्तू जसे असेल त्याप्रमाणे ती देणे, ज्या प्राधिका-याच्या ताब्यात ती आहे त्याने मागणी करणा-यास किंवा त्याने अधिकृत केलेल्या व्यक्तीस देणे त्याच्यावर बंधनकारक आहे.

(४) सहकारी संस्थांची वर्गवारी व त्यांचे व्यवसाय स्वरूप यांस अनुसरून सहकारी संस्थेचे कार्यक्षेत्रात आचारसंहिता विषद करून जारी करेल.

(५) सहकारी संस्थांच्या निवडणुका निरपेक्ष व सुरळीतपणे पार पाडणेकामी निवडणूक निरीक्षक, क्षेत्रीय अधिकारी यांची नेमणूक करेल.

भाग-दोन

## निवडणुकीसाठी संस्थांचे प्रकार

**४. संस्थांचे प्रकार :—**

या अधिनियमात असलेल्या सहकारी संस्थांचे निवडणूक पार पाडण्यासाठी खालील प्रकारात वर्गीकरण करण्यात येईल :–

(I) 'अ' प्रकार संस्था—

(१) राज्यस्तरीय शिखर किंवा संघीय संस्था,

(२) महाराष्ट्र राज्य सहकारी बँक,

(३) महाराष्ट्र राज्य सहकारी कृषी व ग्रामीण विकास बँक,

(४) महाराष्ट्र राज्य सहकारी गृहनिर्माण वित्तीय महामंडळ,

(५) महाराष्ट्र राज्य सहकारी आदिवासी विकास महामंडळ,

(६) महाराष्ट्र राज्य सहकारी कापूस उत्पादक पणन महामंडळ,

(७) सर्व सहकारी साखर कारखाने,

(८) सर्व जिल्हा सहकारी बँका,

(९) सर्व सहकारी सूत गिरण्या,

(१०) सहकारी दूध संघ की ज्यांचे मागील आर्थिक वर्षात एक लाख किंवा पेक्षा जास्त दूध संकलन असणा-या संस्था.

(II) 'ब' प्रकार संस्था—

(१) सर्व नागरी सहकारी बँका,

(२) सर्व पगारदारांच्या सहकारी बँका,

(३) रुपये दहा लाख किंवा त्यापेक्षा जास्त वसूल भागभांडवल असणा-या प्राथमिक कृषी सहकारी पतसंस्था व आदिवासी सहकारी पतसंस्था,

(४) रुपये एक कोटी किंवा त्यापेक्षा जास्त ठेवी असलेल्या, रुपये दहा लाख किंवा त्यापेक्षा जास्त वसूल भागभांडवल असणा-या सहकारी पतसंस्था,

(५) रुपये एक कोटी किंवा त्यापेक्षा जास्त वसूल भागभांडवल असलेल्या नोकरदारांच्या पतसंस्था,

(६) शासकीय सहाय्य असलेल्या साखर कारखाने वगळता इतर सहकारी प्रक्रिया संस्था,

(७) शासकीय सहाय्य असलेल्या सहकारी औद्योगिक संस्था व सहकारी औद्योगिक वसाहती,

(८) सर्व जिल्हा किंवा तालुका सहकारी खरेदी विक्री संघ,

(९) सर्व मध्यवर्ती सहकारी ग्राहक संस्था,

(१०) सर्व विभागीय व जिल्हास्तरीय सहकारी मंडळे,

(११) सर्व सहकारी दूध संघ की ज्यांचे मागील आर्थिक वर्षात एक लाख पेक्षा कमी दूध संकलन असणा-या संस्था,

(१२) 'अ' प्रकारात न मोडणारे इतर जिल्हा/तालुका सहकारी संघ.

(III) 'क' प्रकार संस्था—

(१) रुपये दहा लाख पेक्षा कमी वसूल भागभांडवल असणा-या प्राथमिक कृषी सहकारी पतसंस्था व आदिवासी सहकारी पतसंस्था,

(२) रुपये एक कोटी पेक्षा कमी ठेवी असलेल्या, रुपये दहा लाख किंवा त्यापेक्षा जास्त वसूल भागभांडवल असणा-या सहकारी पतसंस्था,

(३) रुपये एक कोटी पेक्षा कमी वसूल भागभांडवल असलेल्या नोकरदारांच्या पतसंस्था,

(४) शंभर किंवा त्यापेक्षा जास्त सभासद असलेल्या गृहनिर्माण संस्था,

(५) सर्व प्राथमिक ग्राहक सहकारी संस्था,

(६) सर्व प्राथमिक दुग्ध मत्स्य, वराह आणि पशुधन सहकारी संस्था,

(७) शासकीय सहाय्य नसलेल्या सहकारी औद्योगिक संस्था व सहकारी औद्योगिक वसाहती,

(८) शासकीय सहाय्य नसलेल्या साखर कारखाने वगळता इतर सहकारी प्रक्रिया संस्था,

(९) सर्व प्राथमिक सहकारी पणन संस्था,

(१०) सर्व प्राथमिक विणकर (हातमाग व यंत्रमाग) सहकारी संस्था,

(११) इतर कृषी सहकारी संस्था,

(१२) शंभर किंवा पेक्षा जास्त सभासद असलेल्या सहकारी उपसा जलसिंचन आणि सहकारी पाणी वापर संस्था,

(१३) वरील प्रकार 'अ' व प्रकार 'ब' मध्ये समावेश नसलेल्या व खालील प्रकार 'ड' मध्ये समावेश नसलेल्या इतर सहकारी संस्था किंवा संस्थांचा प्रवर्ग.

(IV) 'ड' प्रकार संस्था—

(१) शंभर पेक्षा कमी सभासद असलेल्या गृहनिर्माण संस्था,

(२) शंभर पेक्षा कमी सभासद असलेल्या सहकारी उपसा जलसिंचन आणि सहकारी पाणी वापर संस्था,

(३) सर्व मजूर/जंगल कामगार सहकारी संस्था,

(४) इतर सर्वसाधारण सहकारी संस्था.

**५. ज्या संस्थांमध्ये निवडणुका घेण्यात यावयाच्या असतील त्या संस्थांच्या नावांचे वार्षिक प्रतिवृत्त :—**

(१) पुढील वर्षी होणा-या सर्व सहकारी संस्थांच्या नावाचा उल्लेख असलेले नमुना 'इ-१' मध्ये अद्ययावत वार्षिक प्रतिवृत्त राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण यांच्या कार्यालयामध्ये ठेवण्यात येईल,

(२) ज्या सहकारी संस्थेची निवडणूक होणार आहे, अशी संस्थेची समिती नमुना 'इ-२' मध्ये अहवाल त्यांचा समिती कालावधी पूर्ण होण्याच्या सहा महिने अगोदर जिल्हा सहकारी निवडणूक अधिकारी किंवा तालुका अथवा प्रभाग सहकारी निवडणूक अधिकारी यांना सादर करील.

परंतु, ज्या सहकारी संस्थेचे कार्यक्षेत्र एकापेक्षा जास्त जिल्ह्यात विस्तारलेले आहे ती संस्था तिचा अहवाल त्या संस्थेचे मुख्यालय ज्या जिल्ह्यात आहे, त्या जिल्ह्याच्या जिल्हा सहकारी निवडणूक अधिका-याकडे सादर करील.

परंतु आणखी असे की, जी संस्था समिती कलम ७३ क ख चे उप कलम १४(अ) १ नुसार प्रतिवृत्त देण्यात कसूर करेल तर संबंधित जिल्हा सहकारी निवडणूक अधिकारी किंवा तालुका अथवा प्रभाग सहकारी निवडणूक अधिकारी या पोट-नियमात तरतूद केलेनुसार त्यांच्याकडील असलेल्या नोंदवह्यातील माहितीनुसार यादी करेल, सदरची यादी ही जशी प्रथम दर्शनी सहकारी संस्थांच्या निवडणुका घेण्यात येणा-या संस्थांची यादी असल्याचा पुरावा मानण्यात येईल.

भाग-तीन

## प्राथमिक मतदार यादी तयार करणे

**६. व्यक्ती सभासद असणा-या सहकारी संस्थांची तात्पुरती मतदार यादी :—**

(१) ज्यावर्षी सार्वत्रिक निवडणुका घ्यावयाच्या असतील त्या वर्षासाठी मतदारांची तात्पुरती यादी प्रत्येक संस्थेकडे तयार करण्यात येईल. ज्या सभासदाने कमीत कमी दोन वर्षे नाव नोंदविल्यापासून सदस्य म्हणून पूर्ण केली असतील व जे क्रियाशील सभासद असतील अशा कलम २७(३) अन्वये पात्र व्यक्तींचा तात्पुरत्या मतदार यादीत समावेश करण्यात येईल. उपविधीमध्ये वेगवेगळ्या मतदारसंघाची तरतूद करण्यात आली असेल तर, मतदारांची नावे, उपविधीमध्ये घालून दिल्याप्रमाणे, मतदारसंघ निहाय क्रमाने लावण्यात येतील.

(२) कलम २७ (३-ए) नुसारचा दोन वर्षाचा कालावधी हा सभासदास संस्थेचे सभासदत्व मिळाल्यापासून ते समितीचा कालावधी समाप्त होईपर्यंत मोजण्यात येईल.

परंतु, अकल्पीत कारणामुळे ज्या सहकारी संस्थांच्या समितीची निवडणूक त्यांचा विहीत कालावधी संपण्याच्या आधी होऊ शकली नाही अशा संस्थांची तात्पुरती मतदार यादी ही राज्य सहकारी निवडणूक प्राधीकरण यांनी ठरवून दिलेल्या अर्हता दिनांकानुसार करण्यात येईल.

परंतु, आणखी असेही ज्या सहकारी संस्थेची कलम ७१(१-अ) (अ) अन्वये नोंदणी नंतरच्या पहिल्या हंगामी समितीचा कालावधी समाप्त होण्यापूर्वीची पहिली निवडणूक आहे अशा बाबतीत तात्पुरत्या मतदार यादीत संस्थेच्या नोंदणीच्या दिवशी असलेल्या सभासदांचा समावेश असेल.

परंतु, आणखी असेही, ज्या सहकारी संस्थेवर कलम ७७-अ अन्वये प्राधिकृत अधिकारी अथवा कलम ७८-अ अन्वये प्रशासक नेमलेला असेल अशा संस्थेच्या बाबतीत राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण यांनी ठरवून दिलेल्या अर्हता दिनांकानुसार तात्पुरती मतदार यादी तयार करण्यात येईल.

(३) मतदाराच्या अधिप्रमाणित तात्पुरती मतदार यादीच्या चार प्रती, जिल्हा सहकारी निवडणूक अधिकारी किंवा तालुका/प्रभाग सहकारी निवडणूक अधिकारी यांच्याकडे समितीचा कालावधी संपण्यापूर्वी १२० दिवस संस्थेची समिती सादर करेल. समितीने सादर केलेली अधिप्रमाणीत तात्पुरती मतदार यादी संस्थेच्या व जिल्हा सहकारी निवडणूक अधिकारी किंवा तालुका/प्रभाग सहकारी निवडणूक अधिकारी यांच्या सूचना फलकावर दहा दिवसांच्या आत हरकती अथवा सूचना सादर करण्यासाठी प्रसिद्ध करेल.

(४) मतदारांच्या तात्पुरत्या यादीच्या प्रती जिल्हा सहकारी निवडणूक अधिकारी किंवा तालुका/प्रभाग सहकारी निवडणूक अधिकारी यांच्याकडे पाठविण्यात कोणतीही संस्था कसूर करील तर, जिल्हा सहकारी निवडणूक अधिकारी किंवा तालुका/प्रभाग सहकारी निवडणूक अधिकारी स्वतः किंवा याबाबतीत त्याने प्राधिकृत केलेल्या कोणत्याही व्यक्तीमार्फत, मतदारांची तात्पुरती यादी तयार करील आणि त्यासाठी आलेला खर्च, जमीन महसूलाच्या थकबाकीप्रमाणे त्या संस्थेकडून वसूल करण्यात येईल.

(५) लगत पूर्ववर्ती पोटनियमान्वये जिल्हा सहकारी निवडणूक अधिकारी किंवा तालुका/प्रभाग सहकारी निवडणूक अधिकारी कारवाई केल्याच्या प्रसंगी तो, दावे व आक्षेप सादर करता यावेत म्हणून आपल्या सूचनाफलकावर आणि त्या संस्थेच्या सूचनाफलकावर दहा दिवसांच्या आत हरकती अथवा सूचना सादर करण्यासाठी प्रसिद्ध करेल.

परंतु, उपरोक्त यादी राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण व सहकार खात्याच्या अधिकृत संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यांत येईल.

**७. व्यक्ती सभासद असणा-या सहकारी संस्थांच्या मतदारांच्या तात्पुरत्या यादीत समाविष्ट करावयाचा तपशील**

व्यक्तीगत सभासदांच्याबाबतीत, मतदारांचा तात्पुरत्या यादीत, मतदार म्हणून नोंदणी होण्याचा हक्क असलेल्या प्रत्येक व्यक्तीचे नाव, तिच्या वडिलांचे किंवा पतीचे नाव, आडनाव (वर्णमालेनुसार), आवश्यक असेल तर संस्थेच्या नोंदवहीत नोंद केलेल्या पत्त्यासह अशा व्यक्तींची ओळख पटविण्यास आवश्यक असतील अशा इतर तपशिलासह नमुना इ -३ मध्ये अंतर्भूत असेल.

**८. व्यक्ती सभासद असणा-या सहकारी संस्थांच्या मतदारांच्या तात्पुरत्या यादीसंबंधातील दावे व आक्षेप**

(१) दावे किंवा आक्षेप मागविण्यासाठी मतदारांची कोणतीही तात्पुरती यादी प्रसिद्ध करण्यात येईल तेव्हा, मतदार असणा-या संबंधित संस्थेच्या कोणत्याही सदस्यास यादीतील नाव किंवा पत्ता किंवा इतर तपशील यांच्यासंबंधातील कोणतीही अकृती किंवा चूक, जिल्हा सहकारी निवडणूक अधिकारी किंवा तालुका/प्रभाग सहकारी निवडणूक अधिकारी यांच्या निदर्शनास यादी प्रसिद्ध झाल्यापासून दहा दिवसांच्या आत आणता येईल.

(२) प्रत्येक दावा किंवा आक्षेप लेखी स्वरुपात दाखल करण्यात येईल आणि ज्या कारणावरून दावा करण्यात किंवा, यथास्थिती, आक्षेप घेण्यात आलेला असेल ती कारणे त्यात नमूद करण्यात येतील.

(३) प्रत्येक दावा किंवा आक्षेप, जिल्हा सहकारी निवडणूक अधिकारी किंवा तालुका/प्रभाग सहकारी निवडणूक अधिकारी आक्षेप व हरकती दाखल करावयाच्या दिनांकापासून दहा दिवसांच्या आत आवश्यक असेल तर विचार करून त्यावर त्यास आवश्यक ती चौकशी करून निर्णय घेईल. त्यानंतर हरकती व दावे दाखल करावयाच्या दिनांकापासून १५ दिवसांच्या आत मतदाराची अंतिम यादी प्रसिद्ध करण्यात येईल. दावे व आक्षेप यांचा निर्णय केल्यानंतर जिल्हा सहकारी निवडणूक अधिकारी किंवा तालुका/प्रभाग सहकारी निवडणूक अधिकारी यांचेकडून पक्की करण्यात आलेली यादी, मतदारांची अंतिम मतदार यादी असेल.

(४) मतदारांची अंतिम यादी जिल्हा सहकारी निवडणूक अधिकारी किंवा तालुका/प्रभाग सहकारी निवडणूक अधिकारी कार्यालयाच्या सूचनाफलकावर तसेच संस्थेच्या सूचना फलकावर निवडणुकीचा कार्यक्रम जाहीर करण्यापूर्वी किमान दहा दिवस अगोदर प्रसिद्ध करण्यांत येईल आणि कोणताही आक्षेप व दावे निकालात काढल्यानंतर पंधरा दिवसाहून अधिक कालावधी अशा रीतीने प्रसिद्ध करण्यासाठी असणार नाही.

**९. व्यक्ती सभासद अथवा व्यक्ती सभासद व संस्था सभासद असणा-या सहकारी संस्थांची तात्पुरती मतदार यादी**

(१) ज्या वर्षी सार्वत्रिक निवडणूका घ्यावयाच्या असतील त्या वर्षासाठी मतदारांची तात्पुरती यादी प्रत्येक संस्थेकडे तयार करण्यात येईल. ज्या व्यक्ती सभासदाने कमीत कमी दोन वर्ष नाव नोंदविल्यापासून सदस्य म्हणून पूर्ण केली असतील व जे क्रियाशील सभासद असतील अशा क्रियाशील व्यक्ती सभासदांचा व ज्या संस्था सभासदाने कमीत कमी तीन वर्ष नाव नोंदविल्यापासून सदस्य म्हणून पूर्ण केली असतील व जे क्रियाशील सभासद असतील अशा क्रियाशील संस्था सभासदांचा कलम २७(३) अन्वये पात्र व्यक्तींचा तात्पुरत्या मतदार यादीत समावेश करण्यात येईल. उपविधीमध्ये वेगवेगळ्या मतदारसंघाची तरतूद करण्यात आली असेल तर, मतदारांची नावे, उपविधीमध्ये घालून दिल्याप्रमाणे, मतदारसंघ निहाय क्रमाने लावण्यात येतील.

(२) कलम २७(३-ए) नुसारचा तीन वर्षाचा कालावधी हा सभासदास संस्थेचे सभासदत्व मिळाल्यापासून ते समितीचा कालावधी समाप्त होईपर्यंत मोजण्यात येईल.

परंतु, अकल्पित कारणामुळे ज्या सहकारी संस्थांच्या समितीची निवडणूक त्यांचा विहित कालावधी संपण्याच्या आधी होऊ शकली नाही अशा संस्थांची तात्पुरती मतदार यादी ही राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण यांनी ठरवून दिलेल्या अर्हता दिनांकानुसार करण्यात येईल.

परंतु, आणखी असेही ज्या सहकारी संस्थेची कलम ७१(१-अ) (अ) अन्वये नोंदणी नंतरच्या पहिल्या हंगामी समितीचा कालावधी समाप्त होण्यापूर्वीची पहिली निवडणूक आहे अशा बाबतीत तात्पुरत्या मतदार यादीत संस्थेच्या नोंदणीच्या दिवशी असलेल्या सभासदांचा समावेश असेल.

परंतु, आणखी असेही, ज्या सहकारी संस्थेवर कलम ७७-अ अन्वये प्राधिकृत अधिकारी अथवा कलम ७८-अ अन्वये प्रशासक नेमलेला असेल अशा संस्थेच्या बाबतीत राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण यांनी ठरवून दिलेल्या अर्हता दिनांकानुसार तात्पुरती मतदार यादी तयार करण्यात येईल.

(३) मतदाराच्या अधिप्रमाणित तात्पुरती मतदार यादीच्या चार प्रती, जिल्हा सहकारी निवडणूक अधिकारी किंवा तालुका/प्रभाग सहकारी निवडणूक अधिकारी यांच्याकडे समितीचा कालावधी संपण्यापूर्वी १२० दिवस संस्थेची समिती सादर करेल. समितीने सादर केलेली अधिप्रमाणीत तात्पुरती मतदार यादी संस्थेच्या व जिल्हा सहकारी निवडणूक अधिकारी किंवा तालुका/प्रभाग सहकारी निवडणूक अधिकारी यांच्या सूचना फलकावर दहा दिवसांच्या आत हरकती अथवा सूचना सादर करण्यासाठी प्रसिद्ध करेल.

(४) मतदारांच्या तात्पुरत्या यादीच्या प्रती जिल्हा सहकारी निवडणूक अधिकारी किंवा तालुका/प्रभाग सहकारी निवडणूक अधिकारी यांच्याकडे पाठविण्यात कोणतीही संस्था कसूर करील तर, जिल्हा सहकारी निवडणूक अधिकारी किंवा तालुका/प्रभाग सहकारी निवडणूक अधिकारी स्वतः किंवा याबाबतीत त्याने प्राधिकृत केलेल्या कोणत्याही व्यक्तीमार्फत, मतदारांची तात्पुरती यादी तयार करील आणि त्यासाठी आलेला खर्च, जमीन महसुलाच्या थकबाकीप्रमाणे त्या संस्थेकडून वसूल करण्यात येईल.

(५) लगत पूर्ववर्ती पोटनियमान्वये जिल्हा सहकारी निवडणूक अधिकारी किंवा तालुका/प्रभाग सहकारी निवडणूक अधिकारी कारवाई केल्याच्या प्रसंगी तो, दावे व आक्षेप सादर करता यावेत म्हणून आपल्या सूचनाफलकावर आणि त्या संस्थेच्या सूचनाफलकावर दहा दिवसांच्या आत हरकती अथवा सूचना सादर करण्यासाठी प्रसिद्ध करेल.

परंतु, उपरोक्त यादी राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण व सहकार खात्याच्या अधिकृत संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात येईल.

**१०. व्यक्ती सभासद असणा-या सहकारी संस्थांच्या मतदारांच्या तात्पुरत्या यादीत समाविष्ट करावयाचा तपशील**

(१) व्यक्तीगत क्रियाशील सभासदांच्याबाबतीत, मतदारांचा तात्पुरत्या यादीत, मतदार म्हणून नोंदणी होण्याचा हक्क असलेल्या प्रत्येक व्यक्तीचे नाव, तिच्या वडिलांचे किंवा पतीचे नाव, आडनाव (वर्णमालेनुसार), आवश्यक असेल तर संस्थेच्या नोंदवहीत नोंद केलेल्या पत्त्यासह अशा व्यक्तींची ओळख पटविण्यास आवश्यक असतील अशा इतर तपशिलासह नमुना इ -३ मध्ये अंतर्भूत असेल.

(२) सहकारी संस्था किंवा संस्था ह्या सहकारी संस्थांच्या सभासद असतील तर जिल्हा सहकारी निवडणूक अधिकारी किंवा तालुका/ प्रभाग सहकारी निवडणूक अधिकारी, समितीची मुदत संपण्याच्या आधी १५० दिवस अशा संस्थांच्या प्रतिनिधींची नावे कळविण्याबाबतचा दिनांक प्रसिद्ध करील आणि अशा संस्था त्यांच्यावतीने मतदानात भाग घेणा-या किंवा संस्थेच्या वतीने निवडणूक लढविणा-या अधिकृत प्रतिनिधींची नावे समितीची मुदत संपण्यापूर्वी १२० दिवस आधी संस्थेमार्फत जिल्हा सहकारी निवडणूक अधिकारी किंवा तालुका/प्रभाग सहकारी निवडणूक अधिकारी यांना कळविल. संस्थेने कळविलेला प्रतिनिधी हा संस्थेचा क्रियाशील सभासद असला पाहिजे.

(३) सभासद संस्था त्यांच्या अधिकृत प्रतिनिधींची नावे संस्थेच्या उपविधीमध्ये नमूद केल्याप्रमाणे संस्थेच्या किंवा समितीच्या ठरावासह कळविल. सदरची संस्था वर नमूद केल्याप्रमाणे सभासद संस्थांच्या प्रतिनिधींचा समावेश असलेली नावे मतदारांची तात्पुरती यादी जिल्हा सहकारी निवडणूक अधिकारी किंवा तालुका/प्रभाग सहकारी निवडणूक अधिकारी यांच्याकडे प्राथमिक यादी प्रसिद्ध करावयाच्या दिनांकापूर्वी सादर करेल. संस्था प्रतिनिधीच्या नावाशिवाय सभासद संस्थेचे नाव, त्यांचा नोंदणी क्रमांक व पत्ता आवश्यक असल्यास मतदार संघाचे नावाचा समावेश असेल.

(४) सभासद संस्थेच्या अधिकृत प्रतिनिधीचा मृत्यू किंवा संस्थेची नव्याने झालेली निवडणूक याबाबतीत सभासद संस्थांना त्यांनी या पूर्वी कळविलेल्या प्रतिनिधींच्या नावात नामनिर्देशन करावयाच्या शेवटच्या दिवसांच्या पूर्वी ५ दिवस पेक्षा जास्त नाही कालावधीत नव्याने ठराव करून बदल करता येईल.

**११. व्यक्ती सभासद असणा-या सहकारी संस्थांच्या मतदारांच्या तात्पुरत्या यादीसंबंधातील दावे व आक्षेप**

(१) दावे किंवा आक्षेप मागविण्यासाठी मतदारांची कोणतीही तात्पुरती यादी प्रसिद्ध करण्यात येईल तेव्हा, मतदार असणा-या संबंधित संस्थेच्या कोणत्याही सदस्यास यादीतील नाव किंवा पत्ता किंवा इतर तपशील यांच्यासंबंधातील कोणतीही अकृती किंवा चूक, जिल्हा सहकारी निवडणूक अधिकारी किंवा तालुका/प्रभाग सहकारी निवडणूक अधिकारी यांच्या निदर्शनास यादी प्रसिद्ध झाल्यापासून दहा दिवसांच्या आत आणता येईल.

(२) सदर संस्थेचा कोणताही सभासद त्याचा दावा किंवा हरकत स्वतंत्र अर्जाद्वारे जिल्हा सहकारी निवडणूक अधिकारी किंवा तालुका/प्रभाग सहकारी निवडणूक अधिकारी यांना दावा किंवा हरकत दाखल करण्याच्या दिनांकापूर्वी कार्यालयीन वेळेत दाखल करेल. प्रत्येक दावा किंवा आक्षेप लेखी स्वरुपात दाखल करण्यात येईल आणि ज्या कारणावरून दावा करण्यात किंवा, यथास्थिती, आक्षेप घेण्यात आलेला असेल ती कारणे त्यात नमूद करण्यात येतील.

(३) प्रत्येक दावा किंवा आक्षेप, जिल्हा सहकारी निवडणूक अधिकारी किंवा तालुका/प्रभाग सहकारी निवडणूक अधिकारी आक्षेप व हरकती दाखल करावयाच्या दिनांकापासून दहा दिवसांच्या आत आवश्यक असेल तर विचार करून त्यावर त्यास आवश्यक ती चौकशी करून निर्णय घेईल. त्यानंतर हरकती व दावे दाखल करावयाच्या दिनांकापासून १५ दिवसांच्या आत मतदाराची अंतिम यादी प्रसिद्ध करण्यात येईल. दावे व आक्षेप यांचा निर्णय केल्यानंतर जिल्हा सहकारी निवडणूक अधिकारी किंवा तालुका/प्रभाग सहकारी निवडणूक अधिकारी यांचेकडून पक्की करण्यात आलेली यादी, मतदारांची अंतिम मतदार यादी असेल.

(४) मतदारांची अंतिम यादी जिल्हा सहकारी निवडणूक अधिकारी किंवा तालुका/प्रभाग सहकारी निवडणूक अधिकारी कार्यालयाच्या सूचनाफलकावर तसेच संस्थेच्या सूचना फलकावर निवडणुकीचा कार्यक्रम जाहीर करण्यापूर्वी किमान दहा दिवस अगोदर प्रसिद्ध करण्यात येईल आणि कोणताही आक्षेप व दावे निकालात काढल्यानंतर पंधरा दिवसाहून अधिक कालावधी अशा रीतीने प्रसिद्ध करण्यासाठी असणार नाही.

(५) उपरोक्त नियम १० उप-नियम ४ अन्वये आवश्यक त्या बदलांबाबत जिल्हा सहकारी निवडणूक अधिकारी किंवा त्याने प्राधिकृत केलेला अधिकारी त्याला आवश्यक वाटेल ती चौकशी करून संबंधित बदलाची नोंद संबंधित मतदाराच्या अंतिम मतदार यादीत करेल.

भाग-चार

## निवडणुका पार पाडण्यासाठी प्रशासकीय यंत्रणा

**१२. निवडणूक निर्णय अधिका-याची नेमणूक**

(१) राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण किंवा त्यांनी नेमणूक केलेला अधिकारी, निवडणूक निर्णय अधिकारी तसेच त्याला मदत करण्यास आवश्यक असेल तर एक किंवा त्यापेक्षा जास्त सहायक निवडणूक अधिकारी यांची नेमणूक करेल.

(२) प्रत्येक सहायक निर्वाचन अधिकारी, निर्वाचन अधिका-याच्या नियंत्रणाधीन राहून निर्वाचन अधिका-याची सर्व किंवा कोणतीही कामे पार पाडण्यास सक्षम असेल.

परंतु, कोणताही सहायक निवडणूक निर्णय अधिकारी, नामनिर्देशन पत्राच्या छाननीशी संबंधित असतील अशी निवडणूक निर्णय अधिका-याची कोणतीही कामे, ती करण्यास निवडणूक निर्णय अधिका-यास अपरिहार्यपणे प्रतिबंध झाला नसेल तर, पार पाडणार नाही.

**१३. निरिक्षकाची नेमणूक**

राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण सहकारी संस्थांच्या निवडणुकांवर लक्ष ठेवण्यासाठी किंवा तद्अनुषंगाने नेमून दिलेली इतर कार्य पार पाडण्यासाठी शासकीय अधिका-यांस निरिक्षक म्हणून निर्देशीत करेल.

**१४. निवडणूक निर्णय अधिका-याचे सर्वसाधारण कर्तव्य**

कोणत्याही निवडणुकीत, अधिनियम आणि तदन्वये केलेले नियम व उपविधी यांमध्ये उपबंधित केलेल्या रीतीने, कार्यक्षमपणे निवडणूक घेण्यासाठी आवश्यक असतील अशी सर्व कामे आणि गोष्टी करणे हे निवडणूक निर्णय अधिका-यांचे सर्वसाधारण कर्तव्य असेल.

**१५. मतदान केंद्रे**

निवडणूक निर्णय अधिकारी, आवश्यकता असेल तर, ज्या मतदारसंघाची निवडणूक घेण्यात यावयाची असेल अशा कोणत्याही मतदारसंघासाठी पुरेशा प्रमाणात मतदान केंद्राची तरतूद करील व संस्थेच्या सूचना फलकावर आणि त्याला योग्य वाटेल अशा इतर रीतीने तरतूद करण्यात आली असेल ती मतदान क्षेत्रे दर्शविणारी यादी प्रसिद्ध करील.

**१६. मतदान केंद्राध्यक्ष आणि मतदान अधिकारी यांची नेमणूक**

(१) निवडणूक निर्णय अधिकारी, प्रत्येक मतदान केंद्रासाठी, मतदार केंद्राध्यक्षांची आणि त्याला आवश्यक वाटेल अशा मतदान अधिका-याची किंवा अधिका-यांची नेमणूक करील, परंतु, जी व्यक्ती उमेदवाराकडून किंवा त्याच्या वतीने कामावर लावलेली असेल किंवा त्या निवडणुकीत किंवा निवडणुकीसंबंधी उमेदवारासाठी अन्यथा काम करीत असेल अशा कोणत्याही व्यक्तीची नेमणूक करणार नाही.

परंतु, मतदान केंद्रावर मतदान अधिकारी गैरहजर असेल तर, मतदान केंद्राध्यक्षास जी व्यक्ती उमेदवाराकडून किंवा त्याच्या वतीने कामावर लावलेली असेल किंवा निवडणुकीत किंवा निवडणुकीसंबंधी, त्या उमेदवारासाठी अन्यथा काम करीत असेल अशा कोणत्याही व्यक्तीव्यतिरिक्त, मतदान केंद्रावर उपस्थित असणा-या कोणत्याही अशा व्यक्तीची, पहिल्या अधिका-याच्या अनुपस्थितीत मतदान अधिकारी म्हणून नेमणूक करता येईल आणि निवडणूक निर्णय अधिका-यास त्याप्रमाणे कळविता येईल.

(२) मतदान केंद्राध्यक्षाने तसा निर्देश दिला असेल तर, मतदान अधिकारी, अधिनियमाखालील किंवा तद्न्वये केलेले कोणतेही नियम किंवा उपविधी याखालील मतदार केंद्राध्यक्षाची सर्व किंवा कोणतीही कामे पार पाडील.

(३) आजारपणामुळे किंवा इतर अपरिहार्य कारणामुळे मतदान केंद्राध्यक्षास, मतदान केंद्रावर स्वतः उपस्थित राहणे इतर अपरिहार्य कारणामुळे मतदान केंद्राध्यक्षास , मतदान केंद्रावर स्वतः उपस्थित राहणे शक्य झाले नसेल तर, अशा कोणत्याही अनुपस्थितीमध्ये अशी कामे पार पाडण्यासाठी मतदान केंद्राध्यक्षाकडून पूर्वी प्राधिकृत करण्यात आला असेल अशा मतदान अधिका-याकडून त्याची कामे, पार पाडण्यात येतील.

**१७. मतदान केंद्राध्यक्षाचे आणि मतदान अधिका-यांचे सर्वसाधारण कर्तव्य**

(१) मतदान केंद्रावर सुव्यवस्था राखणे आणि उचितरित्या मतदान होत आहे हे पाहणे हे मतदान केंद्राध्यक्षाचे सर्वसाधारण कर्तव्य असेल.

(२) मतदान केंद्रावर मतदान केंद्राध्यक्षाला त्याची कामे पार पाडण्यास मदत करणे हे अशा मतदान केंद्रावरील मतदान अधिका-याचे कर्तव्य असेल.

(३) मतदान केंद्राध्यक्ष, मतदान अधिकारी, निवडणूक निर्णय अधिकारी, सहायक निवडणूक निर्णय अधिकारी आणि या नियमानुसार निवडणुकीच्या कामांसाठी नेमण्यात आलेल्या इतर व्यक्ती यांनी राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण किंवा त्यांनी नेमून दिलेल्या अधिकारी यांच्या सर्वसाधारण मार्गदर्शन, देखरेख आणि नियंत्रणानुसार काम केले पाहिजे.

भाग पाच

## निवडणुकीचा कार्यक्रम

**१८. निवडणूक कार्यक्रम जाहीर करणे**

निवडणूक निर्णय अधिकारी, राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरणाची मान्यता घेऊन निवडणुकीच्या विविध टप्प्याचा कार्यक्रम संस्थेची अंतिम मतदार यादी प्रसिद्ध झाल्याच्या दिनांकापासून दहा दिवसांच्या आत खालीलप्रमाणे जाहीर करेल.—

| अ.क्र. (१) | बाब (२) | कालावधी (३) |
|---|---|---|
| १ | निवडणूक कार्यक्रम जाहीर करण्याचा दिनांक | (ज्या दिनांकास कार्यक्रम प्रसिद्ध करावयाचा आहे तो दिनांक टाकावा.) |
| २ | नामनिर्देशनाची शेवटची तारीख | निवडणूक कार्यक्रम जाहीर झाल्याच्या दिनांकापासून ५ दिवस |
| ३ | मिळालेल्या नामनिर्देशनाच्या प्रसिद्धीची तारीख | नामनिर्देशनासाठी निश्चित केलेल्या शेवटच्या तारखेपर्यंत जसजशी मिळतील त्याप्रमाणे. |
| ४ | नामनिर्देशनाच्या छाननीची तारीख | नामनिर्देशन दाखल करण्यासाठी निश्चित केलेल्या शेवटच्या तारखेनंतरच्या दुस-या दिवशी. |
| ५ | छाननीनंतरची विधिमान्य नामनिर्देशन यादीची प्रसिद्धी | छाननीनंतर दुसरे दिवशी |
| ६ | ज्या तारखेस नामनिर्देशन मागे घेता येईल ती तारीख | छाननीनंतर विधीमान्य नामनिर्देशन यादीच्या प्रसिद्धीनंतर १५ दिवसांच्या आत. |

| (१) | (२) | (३) |
|---|---|---|
| ७ | निवडणूक लढविणा-या उमेदवाराच्या अंतिम यादीच्या प्रसिद्धी व चिन्हांचे वाटप | नामनिर्देशन मागे घेण्यासाठी निश्चित केलेल्या तारखेच्या निकट अनुवर्ती दिवस |
| ८ | आवश्यक असल्यास ज्या तारखेस आणि ज्या मुदतीत मतदान घेण्यात येईल ती तारीख व ती मुदत | निवडणूक लढविण्या-या उमेदवारांच्या अंतिम यादीच्या प्रसिद्धीच्या तारखेपासून ०७ दिवस पूर्वी नाही व १५ दिवसांनंतरची नाही अशी तारीख (वेळ, जागा यांची प्रसिद्धी निवडणूक निर्णय अधिकारी यांनी प्रसिद्ध केल्याप्रमाणे ) |
| ९ | मतमोजणी तारीख, वेळ व जागा | ज्या तारखेस मतदान घेण्यात येईल त्या तारखेपासून तिस-या दिवसांच्या आत किंवा त्यानंतरचा दिवस (वेळ, जागा यांची प्रसिद्धी निवडणूक निर्णय अधिकारी यांनी प्रसिद्ध केल्याप्रमाणे ) |
| १० | मतदानाचे निकाल जाहीर करण्याची तारीख | मतमोजणीनंतर लगेच. |

**स्पष्टीकरण :—**

(अ) वरील प्रकरणात विनिर्दीष्ट केल्याप्रमाणे मोजावयाच्या ताराखांमधील शेवटची तारीख, सार्वजनिक सुट्टीचा दिवस असेल तर, निकट अनुवर्ती कामाचा दिवस, त्या त्या कारणासाठी निश्चित करण्यात येईल.

(ब) मतदाराच्या संख्येनुसार मतदान केंद्राची संख्या व त्यांच्या जागांची निश्चिती राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण किंवा जिल्हा सहकारी निवडणूक प्राधिकारी यांच्याशी विचार विनिमय करून, निश्चित करण्यात येतील. जिल्ह्यात किंवा शहरात मतदान केंद्रे विखुरली असतील त्या बाबतीत निवडणूक निर्णय अधिका-याच्या कार्यालयात किंवा त्यास योग्य वाटेल अशा संस्थेची नोंदणी झालेल्या कार्यालयात मतदानविषयक सर्व मतपेट्या किंवा इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्रे मिळण्याची व्यवस्था करील.

**१९. निवडणुकीचा कार्यक्रम जाहीर करण्याची रीतः—**

(१) जिल्हा सहकारी निवडणूक अधिकारी, नियम १८ अन्वये नमुना इ-४ अन्वये काढलेल्या आदेशाची प्रत, एकतर संस्थेस जातीने देईल किंवा संस्थेच्या नोंदणी केलेल्या पत्त्यावर, संस्थेच्या नावे टपाल दाखला घेऊन, टपालाद्वारे पाठवून संस्थेच्या सूचना फलकावर किंवा संस्थेच्या अधिकृत संकेतस्थळावर प्रसिद्ध करणेबाबत निर्देशित करेल, आणि त्याशिवाय उक्त आदेश जिल्हा सहकारी निवडणूक अधिकारी, निवडणूक निर्णय अधिकारी, निबंधक यांच्या कार्यालयातील सूचना फलकावर किंवा अधिकृत संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात येईल.

(२) प्रत्यक्ष मतदानाची वेळ निवडणूक कार्यक्रमामध्ये नमूद केलेली असेल.

(३) निवडणूक निर्णय अधिकारी निवडणुकीच्या वेगवेगळे टप्प्यांबाबत वेळ, तारीख आणि स्थळ निश्चिती करून त्याचा समावेश निवडणूक कार्यक्रमांमध्ये करेल.

(४) राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण अथवा जिल्हा सहकारी निवडणूक अधिकारी निवडणुकीचा कार्यक्रम किमान एका स्थानीक वृत्तपत्रात प्रसिद्ध करेल :

परंतु, एखाद्या संस्थेचे कार्यक्षेत्र एक गाव किंवा महानगरपालिकेचा एक प्रभाग असल्यास निवडणुकीचा कार्यक्रम त्या संस्थेच्या व स्थानिक स्वराज्य संस्थेच्या सूचना फलकावर प्रसिद्ध करण्यात येईल.

(५) राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरणाच्या पूर्वमान्यतेशिवाय, या नियमान्वये निश्चित केलेली तारीख, मतदानासाठी निश्चित केलेल्या तारखेपासून सात दिवसांच्या आत बदलता येणार नाही.

**२०. उमेदवारांचे नामनिर्देशन :—**

(१) हा अधिनियम आणि उपविधी यांच्या उपबंधान्वये एखादी जागा भरण्यासाठी एखादी व्यक्ती निवडली जाण्यास अर्हताप्राप्त असेल आणि तिचे नाव उमेदवारांच्या यादीत नमूद केलेले असेल तर, ती जागा भरण्यासाठी निवडणुकीतील उमेदवार म्हणून, अशा कोणत्याही सभासदास नामनिर्देशन करता येईल :

परंतु, संयुक्त किंवा सहयोगी सदस्य यांचेबाबतीत ज्या सदस्यांचे नाव शेअर प्रमाणपत्रात नाव प्रथम असेल, केवळ असाच सदस्य निवडणुकीसाठी उमेदवार म्हणून नामनिर्दीष्ट करण्यास पात्र आहे :

परंतु, आणखी असे की, कलम ७३ ब आणि ७३ क च्या बंधाच्या तरतुदीप्रमाणे राखीव जागेसाठी, तसेच संस्थेच्या कोणत्याही व्यक्ती सभासदास, किंवा सदस्य संस्थेच्या कोणत्याही समिती सदस्य तो निवडून आलेला असल्यास, स्वीकृत झालेला असल्यास किंवा निर्देशित केलेला असल्यास, निवडणुकीसाठी उमेदवार म्हणून नामनिर्दीष्ट करण्यास पात्र आहे.

(२) नियम २१ अन्वये सादर केलेले प्रत्येक नामनिर्देशनपत्र, नमूना इ -५ मध्ये पूर्ण करण्यात येईल. परंतु, नामनिर्देशन पत्रातील निशाणी संबंधातील प्रतिज्ञापत्र भरण्यातील कसूर, दोष अर्थानूसार, महत्त्वाचा दोष असल्याचे मानण्यात येणार नाही.

(३) मतदारांच्या यादीमध्ये जिचे नाव नोंदविण्यात आलेले आहे अशा कोणत्याही व्यक्तीला, निवडणुकीसाठी एखाद्या उमेदवाराचे नामनिर्देशन करण्यासाठी सूचक किंवा अनुमोदक होता येईल :

परंतु, कलम ७३ ब व कलम ७३ क अन्वये असलेल्या राखीव मतदारसंघाव्यतिरिक्त इतर मतदारसंघांमध्ये त्याच मतदारसंघांमधील सूचक व अनुमोदक असला पाहिजे.

(४) कोणत्याही मतदारास, मागणी करण्यात आल्यावर, नियम २३ अन्वये नमूद केलेले शुल्क भरल्यानंतर. निवडणूक निर्णय अधिका-याकडून नामनिर्देशनपत्र पुरविण्यात येईल.

**२१. नामनिर्देशनपत्र सादर करणे आणि विधीग्राह्य नामनिर्देशनपत्रासाठी आवश्यक असलेल्या गोष्टी :—**

(१) नियम १८ अन्वये नेमण्यात आलेल्या तारखेस किंवा तत्पूर्वी प्रत्येक उमेदवार, उक्त नियमांन्वये दिलेल्या आदेशान्वये विनिर्दीष्ट केलेल्या वेळी आणि जागी, नियम २० द्वारे उपबंधीत केल्याप्रमाणे पूर्ण केलेले आणि उमेदवाराने आणि एक नाव सुचविणारा व दुसरा अनुमोदक अशा त्यांच्या मतदारसंघातील दोन मतदारांनी सही केलेले नामनिर्देशनपत्र एकतर व्यक्तीशः किंवा त्याचे नाव सुचविणा-या व्यक्तीमार्फत निवडणूक निर्णय अधिका-याच्या स्वाधीन करील.

(२) हा अधिनियम, नियम, किंवा उपविधी याअन्वये मतदार म्हणून जी कोणत्याही अनहर्तेस अधीन नसेल आणि ज्या मतदारसंघाकरिता उमेदवार नामनिर्देशीत करण्यात आला असेल त्या मतदारसंघाच्या मतदारांच्या यादीत जिचे नाव नमूद केले असेल अशा कोणत्याही व्यक्तीस नाव सुचविणारी आणि अनुमोदक म्हणून स्वाक्षरी करता येईल :

परंतु, राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरणाने विनिर्दीष्टीत केलेल्या नमुन्यात उमेदवाराने कलम ७३ क अनुसार अनर्हता नसल्याबाबतचे प्रतिज्ञापत्र व साक्षांकित केलेल्या जातीच्या दाखल्याची प्रत नामनिर्देशन पत्रासोबत जोडली पाहिजे.

(३) कलम ७३ ब व ७३ क च्या उपबंधाखालील राखीव जागेच्या बाबतीत, उमेदवाराच्या नामनिर्देशनपत्रात ज्या विशिष्ट अनुसूचित जातीचा, अनुसूचित जमातीचा किंवा विमुक्त जाती, भटक्या जमाती, विशेष मागास प्रवर्ग, इतर मागास वर्ग, प्रवर्गाचा उमेदवार असेल ती अनुसूचित जात, जमात, किंवा विमुक्त जाती, भटक्या जमाती, विशेष मागास प्रवर्ग , इतर मागास वर्ग विनिर्दीष्ट करणारे प्रतिज्ञापत्र सभासदाने करून दिलेले प्रतिज्ञापत्र अंतर्भूत नसेल तर उक्त उमेदवार, उक्त जागा भरण्यासाठी निवडून येण्यास अर्हता प्राप्त असल्याचे समजण्यात येणार नाही.

(४) कलम ७३ ब व कलम ७३क अन्वये असलेल्या राखीव मतदारसंघाव्यतिरिक्त इतर मतदारसंघासाठी नामनिर्देशनपत्र सादर केल्यानंतर, निवडणूक निर्णय अधिकारी, नामनिर्देशनपत्रात नमूद केल्याप्रमाणे उमेदवार आणि त्याचे नाव सुचविणारी आणि अनुमोदक व्यक्ती यांची नावे आणि क्रमांक हे नियम ८ आणि ११ मध्ये उल्लेखिलेल्या मतदारांच्या यादीत नमूद केल्याप्रमाणेच आहेत याबद्दल स्वतःची खात्री करून घेईल, उमेदवाराने ज्या संस्थेचे प्रतिनिधीत्व करीत आहे त्या संस्थेच्या समिती सदस्यांची प्रमाणित यादी जोडली पाहिजे. या पोट-नियमान्वये नामनिर्देशन पत्र फेटाळणेत आले असेल तर, निवडणूक निर्णय अधिकारी, ती फेटाळण्यात आलेबाबतची कारणे त्यावर नमूद करेल :

परंतु, निवडणूक निर्णय अधिकारी उक्त नावे किंवा क्रमांक मतदारांच्या यादीतील तत्सम नोंदीबरोबर जुळाव्यात म्हणून नामनिर्देशनपत्रातील उक्त नावे व क्रमांक यासंबंधीची कोणतेही लेखनविषयी किंवा तांत्रिक दोष सुधारणेस परवानगी देईल व आवश्यक त्याबाबतीत उक्त नोंदीतील कोणतेही लेखनविषयक किंवा मुद्रणविषयक दोष दुर्लक्ष करण्यात येतील.

(५) निवडणूक निर्णय अधिकारी उप-नियम १ अन्वये नामनिर्देशन प्राप्त झाल्यानंतर त्यावर नामनिर्देशनपत्र क्रमांक टाकून त्यावर नामनिर्देशन पत्र मिळाल्याची वेळ व तारीख टाकून स्वाक्षरी करेल.

**२२. निवडणुकांसाठी निशाण्या :-**

(१) निवडणूक निर्णय अधिकारी, राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरणाने विनिर्दीष्ट केलेल्या निशाण्यामध्ये उमेदवाराने निवडणुकीच्या वेळी निवडता येतील अशा निशाण्या विनिर्दीष्ट करील, परंतु महाराष्ट्र राज्यातील राजकीय पक्षाशी संबंधित असतील अशा कोणत्याही निशाण्या तो नेमून देणार नाही.

(२) जेव्हा अशा कोणत्याही निवडणुकीच्या वेळी उमेदवाराकडून किंवा त्यांचे वतीने एकापेक्षा अधिक नामनिर्देशनपत्र देण्यात येतील त्याबाबतीत, प्रथम देण्यात आलेल्या नामनिर्देशनपत्रात निशाण्यांच्या संबंधात करण्यात आलेल्या प्रतिज्ञापने, जरी उक्त नामनिर्देशनपत्र फेटाळण्यात आले असले तरी, नियम २८ उप नियम ३ अन्वये विचारात घेण्यात येतील व निशाण्या संबंधातील इतर काणतेही प्रतिज्ञापत्रे विचारात घेण्यात येणार नाहीत.

**२३. ठेवी आणि शुल्क :—**

उमेदवाराने निवडणूक निर्णय अधिका-याकडे खाली विनिर्दिष्ट केल्याप्रमाणे ठेव म्हणून ठेवल्याखेरीज, किंवा ठेवण्याची व्यवस्था केल्याखेरीज एखाद्या मतदारसंघातून त्याला निवडणुकीसाठी यथोचितरित्या नामनिर्देशित करण्यात आले असल्याचे समजण्यात येणार नाही.

| अ. क्र. | संस्था प्रकार | अनुसूचित जाती अथवा जमातीच्या उमेदवाराशिवाय इतर उमेदवारासाठी ठेव रक्कम (रु.) | अनुसूचित जाती अथवा जमातीच्या उमेदवारासाठी ठेव रक्कम (रु.) | नामनिर्देशनपत्र शुल्क (रू) |
|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) |
| १ | शिखर संस्था | ५००० | १००० | २०० |
| २ | जिल्हा किंवा पेक्षा जास्त कार्यक्षेत्र असणा-या संस्था | २००० | ५०० | १०० |
| ३ | तालुका किंवा पेक्षा जास्त कार्यक्षेत्र असणा-या मात्र जिल्हा पेक्षा जास्त कार्यक्षेत्र नसणा-या संस्था | १००० | ३०० | १०० |
| ४ | गाव किंवा प्रभाग पेक्षा जास्त कार्यक्षेत्र नसणा-या संस्था | ५०० | २०० | ५० |

परंतु, एकाच मतदारसंघातील निवडणुकीसाठी एकाहून अधिक नामनिर्देशनपत्राद्वारे उमेदवारास नामनिर्देशित करण्यात आले असेल त्याबाबतीत, या नियमान्वये त्याने एकाहून अधिकवेळा ठेवीची रक्कम ठेवणे आवश्यक असणार नाही. असे असले तरी संस्थेची व संस्थांच्या वर्गाची आर्थिक बाबी विचारात घेऊन सदरच्या ठेवी सामान्य अथवा विशेष आदेशाद्वारे वेळोवेळी बदलण्यास राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण सक्षम असेल.

**२४. नामनिर्देशनाची नोटीस व छाननीची वेळ व जागा :—**

निवडणूक निर्णय अधिकारी, नियम २१ अन्वये नामनिर्देशनपत्र मिळालेनंतर, ते देणा-या व्यक्तीस किंवा, नामनिर्देशनाच्या छाननीसाठी निश्चित केलेला दिवस, वेळ, आणि जागा कळवील, आणि त्या नामनिर्देशनपत्रावर अनुक्रमांक नोंदील आणि त्यावर ज्यातारखेस आणि ज्यावेळेस ते नामनिर्देशन त्यांच्याकडे पाठविण्यात आले असेल ती तारीख व वेळ नमूद करणारे प्रमाणपत्र जोडून त्यावर सही करील, आणि त्यानंतर शक्य तितक्या लवकर उमेदवार आणि नाव सुचविणारी व्यक्ती या दोघाच्या नामनिर्देशनपत्रात अंतर्भूत असणारे वर्णन सारखे वर्णन असणा-या नामनिर्देशनाची नोटीस आपले कार्यालयात एखाद्या ठळक जागी लावण्याची व्यवस्था करील.

**२५. नामनिर्देशन पत्रांची छाननी :—**

(१) नियम १८ अन्वये नामनिर्देशनपत्रांच्या छाननीसाठी तारीख निश्चित केल्यानंतर, उमेदवार, त्यांचे निवडणूक प्रतिनिधी, प्रत्येक उमेदवाराचे नाव सुचविणारी एक व्यक्ती आणि प्रत्येक उमेदवाराचे यथोचितरित्या लेखी प्राधिकृत केलेली इतर एक व्यक्ती यांना, नियम १८ अन्वये याबाबत नेमलेल्या दिवशी आणि जागी उपस्थित राहता येईल. निवडणूक निर्णय अधिकारी, नियम २० अन्वये आवश्यक असल्याप्रमाणे पाठविण्यात आलेल्या अशा सर्व उमेदवारांच्या नामनिर्देशनपत्रांच्या तपासणीसाठी सर्व वाजवी सोयी त्यांना उपलब्ध करून देईल. नामनिर्देशनपत्र छाननीस इतर कोणत्याही व्यक्तीस उपस्थित राहता येणार नाही.

(२) निवडणूक निर्णय अधिकारी त्यानंतर त्या नामनिर्देशनपत्राची तपासणी करील आणि कोणत्याही नामनिर्देशनासंबंधी घेण्यात येतील अशा सर्व आक्षेपांवर निर्णय देईल आणि एकतर असे आक्षेप घेण्यात आल्यावर किंवा स्वतः होऊन, त्यास आवश्यक वाटेल अशी कोणतीही संक्षिप्त चौकशी कोणतीही असल्यास, ती केल्यानंतर, पुढील कोणत्याही कारणासाठी म्हणजेच,—

(अ) अधिनियमाद्वारे किंवा तद्न्वये जागा भरण्यासाठी निवडून येण्यास उमेदवार अनर्ह असेल ;

(ब) सूचक किंवा अनुमोदक नामनिर्देशपत्रावर स्वाक्षरी करण्यास अनर्ह असेल ;

(क) नियम २१ व २३ च्या उपबंधापैकी कोणत्याही उपबंधांचे पालन करण्यात कसूर झाली असेल ;

(ड) उमेदवाराची किंवा त्यांचे नाव सुचविणा-या व्यक्तीची नामनिर्देशनपत्रावरील सही खरी नसेल तर त्यास कोणतेही नामनिर्देशनपत्र फेटाळता येईल.

(३) ज्या नामनिर्देशनपत्रासंबंधात कोणतीही नियमबाह्य गोष्ट घडली नसेल अशा दुस-या नामनिर्देशनपत्राद्वारे एखादा उमेदवार यथोचितरित्या नामनिर्दीष्ट करण्यात आला असेलतर, पोट-नियम २ खंड क किंवा ड मधील कोणत्याही मजकुरामुळे पहिल्या नामनिर्देशपत्रासंबंधात कोणतीही नियमबाह्यता घडली आहे या कारणावरून, कोणत्याही उमेदवाराचे नामनिर्देशनपत्र फेटाळण्याचा अधिकार मिळतो असे समजता कामा नये.

(४) निवडणूक निर्णय अधिकारी, महत्त्वपूर्ण नसेल अशा कोणत्याही दोषासाठी कोणतेही नामनिर्देशनपत्र फेटाळणार नाही.

(५) निवडणूक निर्णय अधिकारी, नियम १८ अन्वये याबाबत नेमलेल्या तारखेस छाननी करील आणि दंगा किंवा उघड हिंसाचार किंवा त्याच्या नियंत्रणाबाहेरील कारणे यामुळे अशा कामकाजामध्ये व्यत्यय किंवा अडथळा आला असेल त्या व्यतिरिक्त, कामकाज स्थगित करण्यास मान्यता देणार नाही :

परंतु, निवडणूक निर्णय अधिका-याने किंवा इतर कोणत्याही व्यक्तीने कोणत्याही आक्षेप घेतला असेल त्याबाबत, संबंधित उमेदवारास, त्यांचे खंडन करण्यास, दुस-या दिवसानंतरही नसेल अशी मुदत, देण्यात येईल आणि निवडणूक निर्णय अधिकारी ज्या तारखेनंतर कामकाज स्थगित करण्यात आले असेल त्या तारखेस आपला निर्णय नोंदविल.

(६) निवडणूक निर्णय अधिकारी, प्रत्येक नामनिर्देशनपत्रावर ते स्वीकारल्याचा किंवा फेटाळण्याचा आपला निर्णय पृष्ठांकित करील आणि नामनिर्देशनपत्र फेटाळण्यात आले असेल तर, अशा रितीने फेटाळण्याच्या आपल्या कारणांच्या संक्षिप्त निवेदनाची लेखी नोंद करील, आणि अशा निवेदनाची एक प्रत संबंधित उमेदवार किंवा त्याचा सूचक यांना मागणी केल्यास देईल. प्रस्तुत निवेदनाची एक प्रत न चुकता राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण किंवा जिल्हा सहकारी निवडणूक अधिकारी यांना पाठविल.

**२६. वैध नामनिर्देशनांची यादी प्रसिद्ध करणे :—**

सर्व नामनिर्देशनपत्रांची छाननी करण्यात आल्यानंतर आणि ते स्वीकारल्याच्या किंवा फेटाळल्याच्या निर्णयाची नोंद करण्यात आल्यानंतर लगेच, निवडणूक निर्णय अधिकारी, ज्यांची नामनिर्देशपत्रे स्वीकारण्यात आली असतील त्या उमेदवारांची यादी तयार करील. छाननी संपल्यानंतर लगेच, निवडणूक निर्णय अधिकारी आपल्या सूचना फलकावर यादी लावील आणि ती यादी अशा रितीने ज्या तारखेस आणि ज्या वेळेस लावण्यात आली असेल ती तारीख आणि वेळ यांची नोंद करील :

परंतु, निबंधक अथवा राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरणाने प्राधिकृत केलेल्या अधिका-यापुढे नामनिर्देशनपत्र नाकारण्यावरती दाखल केलेल्या अपिलात नामनिर्देशन पत्र वैध ठरल्यास निवडणूक निर्णय अधिकारी , त्याचे नाव वैध नामनिर्देशनाच्या यादीत समाविष्ट करण्यास सक्षम असेल.

**२७. उमेदवारी मागे घेणे :—**

(१) कोणत्याही उमेदवारास आपल्या सहीनिशी पाठविलेल्या नमुना इ -६ अनुसार लेखी नोटीशीद्वारे आणि निवडणूक निर्णय अधिका-याकडे ती पोहचून आपली उमेदवारी मागे घेता येईल.

(२) उमेदवारी मागे घेण्यासाठी नियम १८ अन्वये निश्चित केलेल्या शेवटच्या दिवशी दुपारी ३-०० वाजण्यापूर्वी निवडणूक निर्णय अधिका-याकडे नोटीस पाठविण्यात आली पाहिजे.

(३) नोटीस, एकतर उमेदवारास स्वतः किंवा त्यांचे सुचविणा-या व्यक्तीमार्फत किंवा त्याने याबाबत लेखी प्राधिकृत केलेल्या निवडणूक प्रतिनिधीमार्फत देता येईल.

(४) पोट-नियम १ अन्वये जिने आपली उमेदवारी मागे घेतल्याची नोटीस दिली असेल अशा व्यक्तीस, नोटीस रद्द करण्याची मुभा देण्यात येणार नाही.

(५) निवडणूक निर्णय अधिकारी, उमेदवारी मागे घेतल्याच्या नोटीशीचा खरेपणा आणि पोट-नियम १ अन्वये ती देणा-या व्यक्तीची ओळख याबाबत खात्री पटल्यावर, त्याच्या कार्यालयातील सूचना फलकावर नोटीस लावण्याची व्यवस्था करील.

**२८. निवडणूक लढविणा-या उमेदवारांची यादी तयार करणे आणि निशाणी वाटप करणे :—**

(१) नियम १८ अन्वये उमेदवारी मागे घेण्याकरिता निश्चित करण्यात आलेल्या शेवटच्या तारखेच्या लगत नंतरच्या तारखेस निवडणूक निर्णय अधिकारी निवडणूक लढविणा-या उमेदवारांची, म्हणजेच ज्यांची नामनिर्देशनपत्रे अंतिमरित्या स्वीकारण्यात आली असतील आणि ज्यांनी आपली उमेदवारी विहीत मुदतीत मागे घेतली नसेल अशा उमेदवारांची यादी तयार करील आणि ती नमुना इ -७ नमुन्यामध्ये प्रसिद्ध करील.

(२) उक्त यादीत मतदारांची यादी ज्या भाषेत तयार करण्यात आलेली असेल त्या भाषेतील वर्णानुक्रमानुसार नावे आणि निवडणूक लढविणा-या उमेदवारांचे नामनिर्देशपत्रामध्ये दिल्याप्रमाणे पत्ते अंतर्भूत असतील.

(३) मतदान आवश्यक असेल त्या बाबतीत, निवडणूक निर्णय अधिकारी, निवडणूक लढविणा-या उमेदवारांनी आपआपल्या नामनिर्देशनपत्रामध्ये व्यक्त केलेल्या निशाण्यांच्या पंसतीवर विचार करील आणि,

(अ) निवडणूक लढविणा-या प्रत्येक उमेदवारास, व्यवहार्य असेल तेथवर, त्याच्या पसंतीनुरूप वेगवेगळी निशाणी नेमून देईल आणि,

(ब) निवडणूक लढविणा-या एकाहून अधिक उमेदवारांनी एकाच निशाणीसाठी आपली पसंती दर्शविली असेल तर, प्रथम आलेल्याला प्रथम प्राधान्य या तत्वावरती निशाणी नेमून देईल आणि नेमून देण्यात आलेली निशाणी अंतिम राहील.

(क) जर निवडून द्यावयाच्या जागेच्या तीस टक्के उमेदवारांनी गट तयार करून सामुहीक अर्जाद्वारे एकाच निशाणीची मागणी केल्यास त्यास निवडणूक निर्णय अधिकारी एक निशाणी देईल.

(४) प्रत्येक उमेदवारास त्याला नेमून देण्यात आलेल्या निशाणीबाबत तात्काळ कळविण्यात येईल आणि राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरणाने पाठविलेला निशाणीचा नमुना निवडणूक निर्णय अधिका-याकडून पुरविण्यात येईल.

**२९. निवडणूक प्रतिनिधीची नेमणूक करणे आणि अशी नेमणूक रद्दबातल करणे**

(१) एखाद्या उमेदवारास, स्वतच्या प्रतिनिधी म्हणून एखाद्या व्यक्तीची नेमणूक करावयाची असल्यास, तो अशी नेमणूक पोट नियम ४ च्या उपबंधाच्या अधिन राहून नमुना इ-८ मध्ये करील उमेदवार अशी नेमणूकीसंबंधीची नोटीस निवडणूक निर्णय अधिका-याला नामनिर्देशनपत्र सादर करतेवेळी किंवा त्यानंतर परंतू त्याने त्याच्या निवडणूक खर्चाचा हिशोब दाखल करण्यापुर्वी केव्हाही, नेऊन देईल किंवा पाठवून देईल, तसेच उमेदवार नेमणुकीच्या पत्राची एक प्रत त्याने नियुक्त केलेल्या निवडणूक प्रतिनिधीलाही पाठवून देईल.

(२) उमेदवार, स्वतःची सही असेलेले एक लेखी प्रतिज्ञापत्र निवडणूक निर्णय अधिका-याकडे दाखल करून निवडणूक प्रतिनिधीची नेमणूक कोणत्याही वेळी रद्द करू शकेल. ज्या दिवशी असे प्रतिज्ञापत्र दाखल करण्यात येईल त्या दिवसापासून अशी नेमणूक रद्द केली जाईल अशाप्रकारे निवडणूक प्रतिनिधीची नेमणूक रद्द करण्यात येईल, अथवा तो मृत्यु पावेल तर, मग ही घटना निवडणूकीपूर्वी किंवा निवडणुकीच्या कालावधीत किंवा निवडणूक नंतर घडलेली असो परंतू उमेदवाराने ,उमेदवाराच्या निवडणूक खर्चाचा हिशेब निवडणूक निर्णय अधिका-याकडे दाखल करण्यापुर्वी घडेल तर, उमेदवारास आपला निवडणूक प्रतिनिधी म्हणून अन्य एखाद्या व्यक्तीची नेमणूक करता येईल आणि त्यासंबंधीची नोटीस, पहिल्या निवडणूक प्रतिनिधीच्या बाबतीत ती ज्या पध्दतीने देण्यात आली होती त्याच पध्दतीने निवडणूक निर्णय आधिका-याला देईल.

(३) उमेदवारास ज्याचे नाव मतदार यादीत आहे अशा व्यक्तीची निवडणूक प्रतिनिधी म्हणून नेमणूक करता येईल.

(४) उक्त अधिनियम , नियम किंवा उपविधी या अन्वये मतदार म्हणून अनर्ह ठरलेल्या कोणत्याही व्यक्तीची, जोपर्यंत ती अनर्ह असल्याचे चालू आहे तोपर्यंत किंवा जीचे नाव उमेदवार ज्या मतदारसंघाकरिता नामनिर्देशीत करण्यात आला असेल त्या मतदारसंघाच्या मतदार यादीत नसेल अशा कोणत्याही व्यक्तीची निवडणूक प्रतिनिधी म्हणून नियुक्ती केली जाणार नाही.

**३०. मतदान प्रतिनिधीची आणि मतमोजणी प्रतिनिधीची नेमणूक**

(१) मतदान घेतले जाणार असेल अशा निवडणुकीत, निवडणूक लढविणा-या कोणत्याही उमेदवारास, प्रत्येक मतदान केंद्रावर, अशा उमेदवाराचा मतदान प्रतिनिधी म्हणून काम करण्यासाठी एक प्रतिनिधी आणि एक बदली प्रतिनिधी यांची नेमणूक करता येईल. अशा नेमणूक उमेदवारांच्या सहीने नमुना इ-८ अ मधील लेखी पत्राद्वारे करण्यात येईल्.

(२) उमेदवार नेमणुकीचे पत्र मतदान प्रतिनिधीला देईल व तो ते मतदानासाठी निश्चित केलेल्या तारखेस मतदान केंद्राध्यक्षास सादर करील आणि त्याच्या समक्ष, त्यात अंतर्भुत असलेल्या प्रतिज्ञापत्रावर सही करील. मतदान केंद्राध्यक्ष त्याला सादर केलेले पत्र स्वतःच्या पालन केलेले असल्याखेरीज, मतदान केंद्रावरील कोणतेही काम पार पाडण्यास परवानगी देण्यात येणार नाही.

(३) मतदान प्रतिनिधींना, उमेदवारांचे, नमुना इ-८ अ मध्ये दिलेल्या प्राधिकारानुसार मतमोजणी प्रतिनिधी म्हणून काम करता येईल.

(४) निवडणूक लढविणा-या प्रत्येक उमेदवारास, आपल्या सहीने, नमुना इ- ८अ मध्ये दोन प्रतीत लिहिलेल्या लेखी पत्राद्वारे उमेदवारांचे मतमोजणी प्रतिनिधी म्हणून काम करण्यासाठी, चारपेक्षा अधिक नसतील इतक्या प्रतिनिधीची नेमणूक करता येईल. मतमोजणीस प्रारंभ करण्यापुर्वी उमेदवार, अशा मतमोजणी प्रतिनिधीच्या नेमणुकीबाबतची नोटीस, निवडणूक निर्णय अधिका-याला, नेमणुकीबाबतचे पत्र अशा अधिका-याकडे अग्रेषित नोटीस, निवडणूक निर्णय अधिका-याला, नेमणुकीबाबतच्या पत्राची दुसरी प्रत मतमोजणी प्रतिनिधीलाही देईल. उमेदवार, नेमणुकीबाबतची निश्चित केलेल्या तारखेस, निवडणूक निर्णय अधिका-यास सादर करील आणि तिच्यात अंतर्भुत असलेल्या प्रतिज्ञापत्रावर त्याच्या समक्ष सही करील. निर्वाचन अधिकारी त्याला सादर केलेली दुसरी प्रत स्वतःच्या अभिरक्षेत ठेवून घेईल. कोणत्याही मतमोजणी प्रतिनिधीस, त्याने या उपबंधाचे पालन केलेले असल्याखेरीज, मतमोजणीसाठी निश्चित केलेल्या जागी कोणतेही काम पारपाडण्यास परवानगी देण्यात येणार नाही.

**३१. मतदानापुर्वी उमेदवार मरण पावणे**

निवडणूक लढविणारा एखाद्या उमेदवार मरण पावला असेल आणि त्याच्या मृत्युची बातमी निवडणूक निर्णय अधिका-याला मतदानास प्रारंभ होण्यापुर्वी मिळाली असेल तर, निवडणूक निर्णय अधिकारी, उमेदवाराच्या मृत्युच्या वस्तुस्थितीबद्दल खात्री पटल्यावर, मतदानाबाबत प्रत्यादेश देईल आणि राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण किंवा जिल्हा सहकारी निवडणूक अधिकारी यांना निवडणूकीच्या इतिवृत्तासह कळविल आणि निवडणूक संदर्भातील सर्व कामकाजास, नवीन निवडणूक असल्याप्रमाणे सर्व बाबतीत, नव्याने प्रारंभ करण्यात येईल.

परंतू ,मतदानाबाबत प्रत्यादेश देताना निवडणूक लढविणारा उमेदवार असणा-या कोणत्याही व्यक्तीच्या बाबतीत, आणखी नामनिर्देशन करण्याची आवश्यकता असणार नाही.

परंतु आणखी असे की, मतदानाबाबत प्रत्यादेश देण्यापुर्वी, जीने नियम २७ अन्वये आपली उमेदवारी मागे घेतलेल्याची नोटीस दिली असेल अशी कोणतीही व्यक्ती, अशारीतीने मतदानाबाबत प्रत्यादेश दिल्यानंतर, निवडणुकीसाठी उमेदवार म्हणून नामनिर्देशन होण्यास अपात्र ठरणार नाही.

**३२. अविरोध निवडणुका**

नियम २७ अन्वये, ज्या मुदतीच्या आत उमेदवारी मागे घेता येईल ती मुदत संपल्यानंतर ज्यांचे नामनिर्देशन स्वीकारण्यात आले आहे असा केवळ एकच उमेदवार मतदार संघात असेल तर, निवडणूक निर्णय अधिकारी ती जागा भरण्यासाठी यथोचितरित्या तो निवडून आला असल्याचे तात्काळ जाहीर करील आणि ती घोषणा नमुना इ-९ मध्ये करून प्रमाणित करील आणि राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण किंवा जिल्हा सहकारी निवडणूक अधिकारी किंवा तालुका किंवा प्रभाग निवडणूक निर्णय अधिकारी यांना यथावकाश कळविल.

भाग—सहा

**मतदान**

**३३. निवडणुकांच्या वेळी मतदानाची रीत**

मतदान घेण्यात येईल त्या प्रत्येक निवडणुकीच्या बाबतीत. यात यापुढे उपबंधित केलेल्या रीतीने गुप्त मतदान पद्धतीने मते देण्यात येतील आणि कोणतीही मते प्रतिनिधींमार्फत स्वीकारण्यात येणार नाही.

**३४. मतपेटी किंवा इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्र**

प्रत्येक मतपेटी किंवा इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्र राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरणाकडून मान्यता देण्यात येईल अशा स्वरुपाची असेल.

**३५. मतपत्रिकेचा नमुना**

प्रत्येक मतपत्रिका नमुना इ- १० मध्ये असेल. उमेदवारांची नावे निवडणूक लढविणा-या उमेदवारांच्या यादीत ती ज्या क्रमाने असतील त्या क्रमाने मतपत्रिकेवर लावण्यात येतील. उमेदवाराला टोपण नाव असल्यास नामनिर्देशन पत्रात नमूद केल्याप्रमाणे त्याचा समावेश करण्यात येईल. दोन किंवा अधिक उमेदवारांचे एक नाव असेल तर, त्याचा व्यवसाय किंवा निवास स्थान याची यापुढे भर घालून किंवा इतर कोणत्याही रीतीने, निवडणूक निर्णय अधिकारी त्यातील फरक दाखविल.

**३६. मतदान केंद्रावरील व्यवस्था**

(१) प्रत्येक मतदान केंद्राच्या बाहेरील बाजूस पुढील गोष्टी ठळकपणे प्रदर्शित करण्यात येतील :-

(अ) ज्या मतदान क्षेत्रातील मतदारांना त्या मतदान केंद्रात मत देण्याचा हक्क असेल ते मतदान क्षेत्र विनिर्दिष्ट करणारी मतदान केंद्रात एकाहून अधिक मतदान मंडप असतील त्या बाबतीत, अशा प्रत्येक मंडपाबाहेर अशा मंडपासाठी नेमून दिलेल्या मतदारांचा तपशील विनिर्दिष्ट करणारी एक नोटीस, आणि

(ब) निवडणूक लढविणा-या उमेदवारांच्या चिन्हांकीत यादीची एक प्रत.

(२) प्रत्येक मतदान केंद्रामध्ये, ज्यात मतदारांना, दृष्टीआड राहून आपली मते नोंदता येतील अशा एका किंवा अधिक मतदानकक्षांची रचना करण्यात येईल.

(३) निवडणूक निर्णय अधिकारी प्रत्येक मतदान केंद्राला पुरेशा प्रमाणात मतपेट्या किंवा इलेक्ट्रोनिक्स मतदान यंत्र, मतपत्रिका, अशा मतदान केंद्रात ज्यांना मतदानाचा हक्क आहे अशा त्या मतदान क्षेत्रातील किंवा क्षेत्रातील मतदारांच्या यादीच्या प्रती, मतपत्रिका वरविभेद खुणेचा ठसा उमटविण्यासाठी साधने आणि मतपत्रिकांवर खूण करण्यासाठी मतदारांना आवश्यक असलेल्या वस्तू पुरविल. निवडणूक निर्णय अधिकारी प्रत्येक मतदान केंद्राला, अशा मतदान केंद्रात मतदान घेण्यासाठी आवश्यक असतील अशी इतर साधनसामग्री आणि उपसाधनेही पुरविल.

**३७. मतदान केंद्रात प्रवेश**

मतदान केंद्राध्यक्ष, मतदान केंद्रात कोणत्याही एका वेळी प्रवेश देण्यासाठी मतदारांच्या संख्येचे नियमन करील आणि पुढील, व्यक्ती व्यतिरिक्त इतर सर्व व्यक्तींना प्रवेश देणार नाही :—

(अ) मतदान अधिकारी,

(ब) निवडणुकीशी संबंधित अशा कामावर असलेले लोकसेवक,

(क) जिल्हा सहकारी निवडणूक अधिकारी किंवा निवडणूक निर्णय अधिकारी यांच्याकडून प्राधिकृत करण्यात आलेल्या व्यक्ती,

(ड) उमेदवार, त्यांचे निवडणूक प्रतिनिधी आणि नियम ३० च्या उपबंधास अधीन राहून, प्रत्येक उमेदवाराचा एक प्रतिनिधी,

(ई) मतदाराबरोबर असलेले कडेवरील मूल,

(फ) मदती शिवाय ज्याला हालचाल करता येत नाही अशा अंध किंवा अपंग मतदाराबरोबर आलेली एखादी व्यक्ती.

(ग) निवडणूक निर्णय अधिकारी किंवा मतदान केंद्राध्यक्ष मतदाराची ओळख पटविणा-या प्रयोजनासाठी नियुक्त करील अशा इतर व्यक्ती.

**३८. मतदानासाठी मतपेट्या तयार करणे**

(१) मतपेटीच्या सुरक्षिततेसाठी एखादी कागदी मोहोर वापरात आणण्यात आली असेल त्या बाबतीत, मतदान केंद्राध्यक्ष कागदी मोहोरवर आपली स्वतःची सही करील आणि उपस्थित असलेल्या मतदान प्रतिनिधींपैकी ज्यांची त्यावर सह्या करण्याची इच्छा असेल त्यांच्या सह्या घेईल.

(२) निवडणूक निर्णय अधिकारी, त्यानंतर अशा रीतीने स्वाक्षरित केलेली कागदी मोहोर तिच्यासाठी मतपेटीत ठेवलेल्या जागी बसवील आणि त्यानंतर तिच्यात मतपत्रिका टाकण्यासाठी फट उघडी राहील, अशा रीतीने ती पेटी सुरक्षित आणि मोहोरबंद करण्यात येईल.

(३) मतपेट्या सुरक्षित करण्यासाठी वापरण्यात आलेल्या मोहोरा अशा रीतीने लावण्यात येतील की, ज्यामुळे पेटी बंद केल्यानंतर मोहोर तोडल्याशिवाय ती उघडता येऊ शकणार नाही.

(४) मतपेट्या सुरक्षित करण्यासाठी कागदी मोहोरांचा वापर करणे आवश्यक नसेल त्याबाबतीत, मतदान केंद्राध्यक्ष, मतपेटीत मतपत्रिका टाकण्यासाठी फट उघडी राहील अशा रीतीने मतपेटी सुरक्षित आणि उपस्थित असलेल्या मतदान प्रतिनिधींना, त्यांची इच्छा असल्यास, त्यांच्या मोहोरा लावण्यास परवानगी देईल.

(५) मतदान केंद्रात वापरण्यात आलेल्या प्रत्येक मतपेटीला आतून आणि बाहेरून दोन्ही बाजूस पुढील गोष्टी चिन्हांकित असलेल्या मोहोरा असल्या पाहिजेत :—

(अ) मतदार संघाचा अनुक्रमांक , कोणताही असल्यास आणि त्याचे नाव ;

(ब) मतदान केंद्राचा अनुक्रमांक आणि त्याचे नाव ;

(क) मतपेटीचा अनुक्रमांक मतदान संपल्यावर शेवटी मतपेटीच्या केवळ बाहेरील बाजूसच खूणचिठ्ठीवर हा अनुक्रमांक लिहावा ; आणि

(ड) मतदानाची तारीख.

(६) मतदानास प्रारंभ होण्याच्या लगतपूर्वी, मतदान केंद्राध्यक्ष, उपस्थित मतदान प्रतिनिधींना आणि इतर व्यक्तींना मतपेटी रिकामी असल्याचे आणि तिच्यावर पोटनियम (५) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या खुणचिठ्ठ्या असल्याचे दाखविल.

(७) त्यानंतर मतपेटी बंद करून मोहोरबंद आणि सुरक्षित करण्यात येईल आणि ती मतदान केंद्राध्यक्ष आणि मतदान प्रतिनिधी यांच्या नजरेसमोर राहील अशा जागी ठेवण्यात येईल.

**३९. मतदानासाठी इलेक्ट्रोनिक मतदान यंत्र तयार करणे**

जर इलेक्ट्रोनिक मतदान यंत्रामार्फत मतदान घेणेचे ठरविल्यास यथास्थिती या नियमांमध्ये तांत्रिकदृष्ट्या सोयीस्कर होईपर्यंत राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरणाने नेमून दिलेल्या पद्धतीनुसार घेण्यात येईल.

**४०. मतदारांची ओळख पटविणे**

(१) मतदान केंद्राध्यक्षास मतदान केंद्रावर मतदारांची ओळख पटविण्यासाठी किंवा मतदान घेताना त्याला अन्यथा इतर मदत करण्यासाठी त्यास योग्य वाटेल अशा व्यक्तींची नियुक्ती करता येईल.

(२) प्रत्येक मतदार मतदान केंद्रात प्रवेश करते वेळी त्याच्याजवळ भारत निवडणूक आयोगाने ठरवून दिलेले छायाचित्र असलेला ओळखीचा पुरावा किंवा संस्थेने संस्थेच्या उपविधीनुसार निर्गमित केलेले छायाचित्र असलेले ओळखपत्र.

(३) प्रत्येक मतदार मतदान केंद्रात प्रवेश करील तेव्हा, मतदार केंद्राध्यक्ष किंवा याबाबत त्याने प्राधिकृत केलेला मतदान अधिकारी मतदाराचे नाव आणि इतर तपशील मतदारांच्या यादीतील संबंधित नोंदीशी ताडून पाहील आणि इतर तपशील पुकारील.

(४) एखाद्या व्यक्तीच्या मतपत्रिका मिळविण्याच्या अधिकाराबाबत निर्णय घेताना, मतदार केंद्राध्यक्ष किंवा यथास्थिती, मतदान अधिकारी, मतदारांच्या यादीतील नोंदीतील केवळ लेखन व मुद्रणदोषांकडे, अशा नोंदीशी संबंधित असलेल्या मतदारांशी अशा व्यक्तीचे साम्य आहे याबाबत त्यांची खात्री झाली तर दुर्लक्ष करील.

**४१. ओळखीबाबत आव्हान देणे**

(१) कोणत्याही मतदान प्रतिनिधीस, आपण विशिष्ट मतदार आहोत असा दावा करणा-या एखाद्या व्यक्तीच्या ओळखीबाबत मतदान केंद्राध्यक्षाकडे प्रत्येक आव्हानासाठी प्रथम ५० रुपये रोख ठेवून, आव्हान देता येईल.

(२) अशी रक्कम ठेवल्यानंतर, मतदान केंद्राध्यक्ष .–

(अ) आव्हान दिलेल्या त्या व्यक्तीस तोतयेगिरीबद्दल होणा-या शास्तीसंबंधी ताकीद देईल.

(ब) मतदारांच्या यादीतील संबंधित नोंद संपूर्णपणे वाचील आणि त्या नोंदीत विनिर्दिष्ट केलेली व्यक्ती तीच आहे किंवा काय याबाबत तिच्याकडे विचारणा करील.

(क) नमुना इ-११ मधील आव्हानीत मतदारांच्या यादीत तिचे नाव आणि पत्ता नोंदविली, आणि

(ड) उक्त यादीत तिची सही करण्यास तिला भाग पाडील.

(३) त्यानंतर मतदान केंद्राध्यक्ष आव्हानाबाबत संक्षिप्त चौकशी करील आणि त्यास त्या प्रयोजनासाठी

(अ) आव्हान देणा-या व्यक्तीस आव्हानाबाबत पुरावा दाखल करण्यास आणि दिलेल्या व्यक्तीस तिच्या ओळखीबाबतचा पुरावा दाखल करण्यास भाग पाडता येईल.

(ब) आव्हान दिलेल्या व्यक्तीस तिची ओळख पटवून देण्याच्या प्रयोजनासाठी आवश्यक असे कोणतेही प्रश्न विचारता येतील आणि त्याची शपथेवर उत्तरे देण्यास तिला भाग पाडता येईल, आणि

(क) आव्हान दिलेल्या व्यक्तीकडून आणि साक्ष देऊ करणा-या इतर कोणत्याही व्यक्तीकडून शपथ घेवविता येईल.

(४) चौकशीनंतर, मतदान केंद्राध्यक्षास असे वाटेल की, आव्हान सिद्ध झालेले नाही तर तो आव्हान दिलेल्या व्यक्तीस मतदानाची परवानगी देईल आणि त्यास असे वाटेल की, ते आव्हान सिद्ध झालेले आहे तर, त्यास आव्हान दिलेल्या व्यक्तीस मतदान करण्यास मनाई करता येईल.

(५) मतदान केंद्राध्यक्षाच्या मते आव्हान क्षुल्लक स्वरुपाचे असले किंवा सद्‌भावनापूर्वक दिलेले नसेल तर, तो उपबंध (१) अन्वये ठेवलेली अनामत रक्कम राज्य शासनाकडे जप्त करण्यात यावी असा निदेश देईल आणि इतर कोणत्याही बाबतीत, ती चौकशी करून आव्हान देणा-या व्यक्तीस ती परत करील.

**४२. तोतयेगिरीविरुद्ध खबरदारी घेणे**

(१) मतदारांच्या तोतयेगिरीस प्रतिबंध करण्याच्या हेतूने, ज्याच्या ओळखीबाबत मतदान केंद्राध्यक्ष किंवा यथास्थिती मतदान अधिकारी याची खात्री पटली असेल असा प्रत्येक मतदार, मतदान केंद्राध्यक्षाला किंवा मतदान अधिका-याला आपल्या डाव्या अंगठ्याची तपासणी करण्यास आणि त्यावर पक्क्या शाईची खूण करण्यास परवानगी देईल.

(२) कोणतीही मतदार उपबंध (१) अनुसार, त्याच्या डाव्या अंगठ्याचे निरीक्षण करू देण्यास किंवा खूण करू देण्यास नाकारील किंवा त्याच्या डाव्या अंगठ्यावर आधीच अशी खूण केलेली असेल किंवा शाईची खूण काढून टाकण्याच्या हेतूने तो कोणतेही कृत्य करील तर त्यास कोणतीही मतपत्रिका देण्यात येणार नाही किंवा मतदान करण्यास परवानगी देण्यात येणार नाही.

(३) मतदाराच्या डाव्या अंगठ्यासंबंधीचा या नियमातील कोणताही निर्देश हा मतदारास डावा अंगठा नसेल त्याबाबतीत त्याच्या डाव्या हाताच्या इतर कोणत्याही बोटासंबंधीचा आणि त्याच्या डाव्या हाताची सर्व बोटेच नसतील त्या बाबतीत, त्याच्या उजव्या हाताचा अंगठा किंवा इतर कोणतेही बोट यासंबंधीचा, आणि दोन्ही हातांची सर्व बोटे नसतील त्या बाबतीत त्याला असलेल्या त्याच्या डाव्या किंवा उजव्या हाताचे टोक यासंबंधीचा आहे असे समजण्यात येईल.

**४३. मतपत्रिका देणे**

(१) मतदानाच्या प्रारंभासाठी निश्चित केलेल्या वेळेआधी कोणत्याही मतदारास कोणतीही मतपत्रिका देता कामा नये.

(२) मतदान समाप्त होण्याच्या वेळी मतदान केंद्रावरचे मतदार उपस्थित असतील त्याखेरीज, इतर कोणत्याही मतदारास मतदान समाप्तीसाठी निश्चित केलेल्या वेळेनंतर कोणतीही मतपत्रिका देता कामा नये. अशा मतदारांना मतदान संपल्यानंतरही आपली मते नोंदविण्याची परवानगी देण्यात येईल.

(३) मतदाराला मतपत्रिका देण्यापूर्वी प्रत्येक मतपत्रिकेवर—

(अ) जिल्हा सहकारी निवडणूक अधिकारी निदेश देईल अशा विभेदक खुणेचा शिक्का मारण्यात येईल.

(ब) तिच्या मागच्या बाजूस मतदान केंद्राध्यक्ष स्वाक्षरी करील.

(४) मतदाराला मतपत्रिका देतेवेळी, मतदान अधिकारी, नोंद करण्यासाठी स्वतंत्रपणे ठेवलेल्या मतदारांच्या यादीच्या प्रतीमध्ये त्या मतदाराच्या नावासमोर मतपत्रिकेच्या अनुक्रमांकाची नोंद करील.

(५) उपबंध (४) मध्ये तरतूद केली असेल ते खेरीजकरून, मतदान केंद्रातील कोणतीही व्यक्ती विशिष्ट मतदारांना दिलेल्या मतपत्रिकांचे अनुक्रमांक टिपून घेणार नाही.

**४४. मतदानाची कार्यपद्धती** :—

(१) मतपत्रिका मिळताच, मतदार ताबडतोब ,—

(एक) मतदान कक्षांपैकी एका कक्षाकडे जाईल ;

(दोन) तेथे ज्या उमेदवाराला मत देण्याची त्याची इच्छा असेल त्याच्या मतपत्रिकेवरील निशाणीजवळ किंवा तिच्याजवळ, त्याला त्या प्रयोजनासाठी पुरविण्यात आलेल्या साधनाने खूण करील;

(तीन) आपले मत दिसू नये यासाठी मतपत्रिकेची घडी करील;

(चार) फर्मावण्यात आल्यास , मतपत्रिकेवरील विभेदक खूण मतदान केंद्राध्यक्षास दाखविल;

(पाच) घडी केलेली मतपत्रिका मतपेटीत टाकील ;

(सहा) मतदान केंद्राबाहेर जाईल.

(२) एक मतदार मतदान कक्षात असताना दुस-या कोणत्याही मतदारास आत प्रवेश करण्यास परवानगी देता कामा नये.

**४५. वेगवेगळे मतदारसंघ नसतील किंवा एका मतदारसंघातून एकापेक्षा अधिक जागा भरावयाच्या असतील त्या बाबतीतील मतदानाची कार्यपद्धती :—**

उपविधीमध्ये कोणत्याही मतदारसंघाची व्याख्या केली नसेल त्या बाबतीत, किंवा एखाद्या मतदारसंघासाठी उपविधीमध्ये एकपेक्षा अधिक जागा प्राधिकृत करण्यात आल्या असतील त्याबाबतीत, या जागांशी जेथवर संबंधित असेल तेथवर, मतदान पुढील उपबंधास अनुसरुन करण्यात येईलः-

(अ) प्रत्येक मतदारास, जितक्या जागा भरावयाच्या असतील आणि त्या भरण्यासाठी मतदान घ्यावयाचे असतील तितकी मते देण्याचा हक्क असेल, परंतु कोणत्याही मतदारास कोणत्याही एकाच उमेदवारास एकाहून अधिक मते देता येणार नाहीत.

(ब) मतदाराने, मतपत्रिकेवर खूण करण्याच्या प्रयोजनासाठी पुरविलेल्या साधनाने, ज्या उमेदवाराला किंवा उमेदवारांना मत देण्याची त्याची इच्छा असेल त्याच्या निशाणीवर किंवा निशाणींवर किंवा तिच्याजवळ किंवा त्यांच्याजवळ खूण करावी. त्यामुळे अशा रीतीने केलेल्या कोणत्याही खुणेचा कोणताही भाग इतर उमेदवारासाठी ठेवलेल्या जागी उमटणार नाही. मतदाराने त्यानंतर आपले मत दिसू नये अशारितीने, खूण केलेल्या मतपत्रिकेची घडी करावी आणि घडी केलेली मतपत्रिका मतपेटीत टाकावी आणि गैरवाजवी विलंब न करता मतदान केंद्रातून निघून जावे.

**४६. अंध किंवा अपंग मतदारांच्या मताची नोंदणी :—**

(१) अंधत्वामुळे किंवा इतर शारीरिक अपंगतेमुळे एखाद्या मतदारास मतपत्रिकेवरील निशाण्या ओळखणे अशक्य आहे किंवा सहाय्या शिवाय मतपत्रिकेवर खूण करणे अशक्य आहे. याविषयी मतदान केंद्राध्यक्षांची खात्री पटली असेल तर, मतदान केंद्राध्यक्ष, त्या मतदारास, त्याच्यावतीने व त्यांच्या इच्छेनुसार, मतपत्रिकेवर मत नोंदविण्यासाठी आणि आवश्यक असल्यास, मत गुप्त राहावे म्हणून मतपत्रिकेची घडी करून ती मतपेटीत टाकण्यासाठी ज्याचे वय १८ वर्षांहून कमी नाही असा एखादा सोबती मतदान कक्षात त्याच्याबरोबर नेण्यास परवानगी देईलः

परंतु कोणत्याही व्यक्तीस कोणत्याही मतदान केंद्रावर त्याच दिवशी एकाहून अधिक मतदारांचा सोबती म्हणून काम करण्यास परवानगी दिली जाणार नाहीः

आणखी असे की, या नियमान्वये कोणत्याही दिवशी, मतदारांचा सोबती म्हणून काम करण्यास एखाद्या व्यक्तीस परवानगी देण्यापूर्वी, त्याने मतदाराच्या वतीने नोंदविलेले मत तो गुप्त ठेवील आणि त्याने त्याच दिवशी यापूर्वी दुस-या एखाद्या मतदाराचा सोबती म्हणून कोणत्याही मतदान केंद्रावर काम केलेले नाही असे त्याने नमुना इ -१२ मध्ये जाहीर करणे आवश्यक असेल.

(२) मतदान केंद्राध्यक्ष या नियमाखालील सर्व प्रकरणांची नोंद नमुना इ-१३ मध्ये ठेवील.

**४७. खराब झालेल्या आणि परत केलेल्या मतपत्रिकाः—**

(१) एखाद्या मतदाराने अनवधानाने आपली मतपत्रिका , मतपत्रिका म्हणून सोयीस्करपणे वापरात येणार नाही इतकी खराब केली असेल तर, त्यास ती मतदान केंद्राध्यक्षांकडे परत करता येईल आणि ही गोष्ट अनवधानाने घडल्याबद्दल केंद्राध्यक्षाची खात्री पटवून दिल्यानंतर त्याला दुसरी मतपत्रिका देण्यात येईल आणि अशा परत केलेल्या मतपत्रिकेवर मतदान केंद्राध्यक्ष “ खराब झालेली रद्द केलेली ” असा मजकूर लिहील.

(२) एखाद्या मतदाराने मतपत्रिका मिळाल्यावर तिचा उपयोग न करण्याचे ठरविल्यास, तो ती मतपत्रिका मतदान केंद्राध्यक्षांकडे परत करील आणि अशारितीने परत केलेल्या मतपत्रिकेवर मतदान केंद्राध्यक्ष "परत केलेले -रद्द केलेली" असा मजकूर लिहील.

(३) पोट-नियम (१) किंवा पोट-नियम (२) अन्वये रद्द करण्यात आलेल्या मतपत्रिका वेगळ्या पाकिटात ठेवण्यात येतील.

**४८. दुबार नोंदलेली मते .—**

(१) आपण अमुक एक मतदार आहोत असे सांगून एखादी व्यक्ती मतदान करून गेल्यानंतर, जर दुसरी एखादी व्यक्ती आपण तोच विशिष्ट मतदार आहोत असे सांगून मतपत्रिकेची मागणी करील तर त्या व्यक्तीस स्वतःची ओळख पटवून देण्यासंबंधात, मतदान केंद्राध्यक्ष विचारील, अशा प्रश्नांची समाधानकारक उत्तरे दिल्यानंतर, या नियमाच्या पुढील उपबंधास अधीन राहून, इतर कोणत्याही मतदाराप्रमाणे (या नियमात यापुढे "दुबार नोंदलेल्या मतपत्रिका" म्हणून उल्लेखिलेल्या) मतपत्रिकेवर खूण करण्याचा हक्क राहील.

(२) अशी प्रत्येक व्यक्ती दुबार नोंदविलेली मतपत्रिका मिळण्यापूर्वी, नमुना इ-१४ मध्ये असलेल्या सूचीत तिच्या संबंधात असलेल्या नोंदीसमोर स्वतःची सही करील.

(३) दुबार नोंदलेली मतपत्रिका, मतदानासाठी उपयोगात आणलेल्या इतर मतपत्रिकांप्रमाणेच असेल; फक्त —

(अ) ती मतदान केंद्रावर उपयोगता आणण्यासाठी देण्यात आलेल्या मतपत्रिकांच्या गठ्ठयातील शेवटच्या क्रमांकाची असेल, आणि

(ब) तिच्या मागच्या बाजूवर मतदान केंद्राध्यक्षांने "दुबार नोंदलेली मतपत्रिका" असे स्वतः लिहून त्यावर स्वतःची सही केलेली असेल.

(४) दुबार नोंदलेल्या मतपत्रिकेवर मतदान कक्षात जाऊन खूण केल्यावर, मतपत्रिकेची घडी घालून मतदार ती मतपत्रिका, मतपेटीत न टाकता मतदान केंद्राध्यक्षाकडे देईल व मतदान केंद्राध्यक्ष ती मतपत्रिका त्यासाठी राखून ठेवलेल्या लिफाफ्यात ठेवील.

**४९. मतदान बंद करणे .–**

(१) मतदान केंद्राध्यक्ष ,नियम १८ अन्वये याबाबतीत निश्चित करण्यात आलेल्या वेळी मतदान बंद करील आणि त्यानंतर कोणत्याही मतदाराला मतदान केंद्रात प्रवेश देणार नाहीः

परंतु, मतदान केंद्र बंद होण्यापूर्वी, तेथे असलेल्या सर्व मतदारांना मतदान करू देण्यात येईल.

(२) मतदान केंद्र बंद होण्यापूर्वी, एखादा मतदार तेथे हजर होता की नाही असा प्रश्न उद्भवल्यास त्या बाबतीत मतदान केंद्राध्यक्ष निर्णय घेईल आणि त्याचा निर्णय अंतिम असेल.

**५०. मतदानानंतर मतपेट्या मोहोरबंद करणे :–**

(१) मतदान बंद झाल्यानंतर व्यवहार्य होईल तितक्या लवकर मतदान केंद्राध्यक्ष कोणत्याही उमेदवारांच्या किंवा त्यांच्या निवडणूक किंवा मतदान प्रतिनिधींच्या उपस्थितीत मतपेटीची फट बंद करील आणि फट बंद करण्यासाठी मतपेटीला कोणतीही यांत्रिक कळ नसेल, तर तो ती फट मोहोरबंद करील आणि कोणत्याही मतदान प्रतिनिधीला त्याची स्वतःची मोहोर लावण्यास परवानगी देईल.

(२) नंतर ती मतपेटी मोहोरबंद करण्यात येईल व सुरक्षित ठेवली जाईल.

(३) पहिली मतपेटी भरल्यामुळे दुस-या मतपेटीचा उपयोग करणे भाग पडले तर दुस-या मतपेटीचा उपयोग करण्यापूर्वी प्रथम पहिली मतपेटी उपबंध (१) व (२) मध्ये तरतूद केल्याप्रमाणे बंद करून मोहोर बंद केली जाईल; व सुरक्षित ठेवली जाईल.

**५१. मतपत्रिकांचा हिशेब :—**

(१) मतदान संपल्यांनतर मतदान केंद्राध्यक्ष मतपत्रिकांच्या हिशेबाची नोंद नमुना इ- १५ मध्ये करील व तो नमुना निराळ्या पाकिटात भरून त्यावर "मतपत्रिकांचा हिशेब" असे शब्द लिहील.

(२) एखाद्या मतदान प्रतिनिधीची, मतपत्रिकांच्या हिशेबात केलेल्या नोंदीची सत्य प्रत घेण्याची इच्छा असेल तर मतदान केंद्राध्यक्ष त्याला तसे करण्याची परवानगी देईल व सत्य प्रत म्हणून ती साक्षांकित करील.

**५२. इतर पाकिटे मोहोरबंद करणे :—**

(१) मतदान केंद्राध्यक्ष नंतर पुढीलप्रमाणे निरनिराळी पाकिटे तयार करील .–

(अ) मतदारांच्या यादीची खुणा केलेली प्रत ;

(ब) न वापरलेल्या मतपत्रिका ;

(क) रद्द केलेल्या मतपत्रिका ;

(ड) दुबार नोंदलेल्या मतपत्रिका आणि दुबार नोंदलेल्या मतपत्रिकांची यादी असलेला लिफाफा ;

(ई) आव्हानित मतांची यादी ; आणि

(फ) निवडणूक निर्णय अधिका-यांची निदेशानुसार मोहोरबंद पाकिटात ठेवावयाची इतर कोणतीही कागदपत्रे

(२) असे प्रत्येक पाकीट , मतदान केंद्राध्यक्षांची आणि उपस्थित असणा-या मतदान प्रतिनिधीपैकी मोहोर लावण्याची ज्यांची इच्छा असेल अशा प्रतिनिधींची मोहोर लावून, मोहोरबंद करण्यात येईल.

**५३. मतपेट्या वैगेरे निवडणूक निर्णय अधिका-याकडे पाठविणे :—**

(१) त्यानंतर मतदान केंद्राध्यक्ष , खालील वस्तू , निवडणूक निर्णय अधिकारी निदेश देईल त्या ठिकाणी निवडणूक निर्णय अधिका-याकडे पाठवील किंवा पाठविण्याची व्यवस्था करील,–

(अ) मतपेट्या ;

(ब) मतपत्रिकांचा हिशेब;

(क) नियम ५२ मध्ये उल्लेखिलेली मोहोरबंद पाकिटे; आणि

(ड) मतदानाच्या वेळी वापरलेली सर्व कागदपत्रे.

(२) मतमोजणी सुरू होईपर्यंत, निवडणूक निर्णय अधिकारी सर्व मतपेट्या, पाकिटे आणि इतर कागदपत्रे यांच्या सुरक्षित परिवहनाची आणि त्यांच्या सुरक्षित अभिरक्षेची पुरेशी व्यवस्था करील.

**५४. मतपेट्यांचा नाश वैगेरे झाल्यास नव्याने मतदान घेणे :—**

(१) जर एखाद्या निवडणुकीच्या वेळी,–

(अ) एखाद्या मतदान केंद्रावर उपयोगात आणलेली कोणतीही मतपेटी मतदान केंद्राध्यक्ष किंवा निवडणूक निर्णय अधिकारी यांच्या अभिरक्षेतून बेकायदेशीरपणे काढून घेण्यात आली किंवा ती अपघाताने किंवा हेतूपूर्वक नष्ट करण्यात आली किंवा गहाळ करण्यात आली किंवा त्या मतदान केंद्रावर निकाल निश्चित ठरविणे अशक्य होईल इतक्या प्रमाणात तिची नासधूस करण्यात आली किंवा तीत ढवळाढवळ करण्यात आली; किंवा

(ब) जिच्यामुळे मतदानावर अनिष्ट परिणाम घडण्याची शक्यता असेल अशी कोणतीही चूक किंवा नियमबाह्यता कार्यपद्धतीत घडली तर निवडणूक निर्णय अधिकारी ती गोष्ट जिल्हा सहकारी निवडणूक अधिकारी यांना ताबडतोब कळवील.

(२) जिल्हा सहकारी निवडणूक अधिकारी असा अहवाल मिळाल्यावर किंवा पोट-नियम (१) मध्ये उल्लेखिलेली परिस्थिती स्वतः विचारात घेऊन आणि, राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरणाच्या सामान्य अथवा विशेष आदेशाद्वारे,–

(अ) एकतर त्या मतदान केंद्रावरील मतदान निरर्थक असल्याचे घोषित करील, त्या मतदान केंद्रावर नव्याने निवडणूक घेण्यासाठी एखादा दिवस नेमील आणि वेळ निश्चित करील त्यास योग्य वाटेल अशारीतीने नेमलेला दिवस व निश्चित केलेली वेळ अधिसूचित करील; किंवा

(ब) त्या मतदान केंद्रावर नव्याने घेतलेल्या मतदानाचा निवडणुकीच्या निकालावर कोणत्याही प्रकारे परिणाम होणार नाही किंवा कार्यपद्धतीमधील चूक किंवा नियमबाह्यता महत्वाची नाही याबद्दल खात्री झाल्यास, तो निवडणूक निर्णय अधिका-यास निवडणुकीसाठी त्यास योग्य वाटतील असे निदेश देईल किंवा कार्यवाही करील.

(३) या अधिनियमाचे किंवा त्या अन्वये केलेल्या नियमांचे किंवा उपविधीचे उपबंध हे मूळ मतदानासही लागू होतील.

भाग सात

## मतमोजणी व निवडणूक निकाल जाहीर करणे

**५५. मतमोजणी :—**

मतदान घेतलेल्या प्रत्येक निवडणुकीत, निवडणूक निर्णय अधिका-याच्या पर्यवेक्षणानुसार किंवा पर्यवेक्षणाखाली आणि त्यांच्या निर्देशानुसार किंवा निदेशांखाली मतमोजणी करण्यात येईल आणि निवडणूक लढविणारा प्रत्येक उमेदवार, त्याचा निवडणूक प्रतिनिधी आणि त्याचे मतमोजणी प्रतिनिधी यांस मतमोजणीच्या वेळी उपस्थित रहाण्याचा अधिकार असेल.

**५६. मतमोजणीसाठी निश्चित केलेल्या जागी प्रवेश :—**

(१) निवडणूक निर्णय अधिकारी मतमोजणीसाठी निश्चित केलेल्या जागी,–

(अ) मतमोजणीत त्याला सहाय्य करण्यासाठी तो नेमणूक करील अशा व्यक्ती ;

(ब) जिल्हा सहकारी निवडणूक अधिका-याने प्राधिकृत केलेल्या व्यक्ती ;

(क) निवडणुकीच्या संबंधात कामावर असलेले लोकसेवक ; आणि

(ड) उमेदवार व त्याचे निवडणूक आणि मतमोजणी प्रतिनिधी यांच्या व्यतिरिक्त. . . इतर व्यक्तींना प्रवेश देणार नाही.

(२) उपबंध (१), खंड (अ) अन्वये, निवडणुकीत किंवा निवडणुकीच्या सुमारास उमेदवाराने किंवा त्याच्यावतीने कामावर लावण्यात आलेल्या किंवा अन्यथा उमेदवारासाठी काम करीत असलेल्या कोणत्याही व्यक्तीची नेमणूक करण्यात येणार नाही.

(३) मतमोजणीच्या कोणत्याही विशिष्ट टेबलावरील किंवा टेबलांच्या गटावरील मतमोजणीवर कोणत्या मतमोजणी प्रतिनिधीने किंवा प्रतिनिधींनी लक्ष ठेवावे हे निवडणूक निर्णय अधिकारी ठरवील.

(४) मतमोजणीच्या वेळी स्वतः गैरवर्तणूक करणा-या किंवा निवडणूक निर्णय अधिका-याच्या कायदेशीर निदेशांचे पालन करण्यात कसूर करणा-या कोणत्याही व्यक्तीस, जेथे मतमोजणी चालू असेल त्या जागेतून , निवडणूक निर्णय अधिका-याकडून किंवा कर्तव्य बजावणा-यास कोणत्याही पोलीस. अधिका-याकडून किंवा निवडणूक निर्णय अधिकारी या बाबतीत प्राधिकृत करील अशा कोणत्याही व्यक्तीकडून काढून लावण्यात येईल.

**५७. मतपेट्यांची छाननी व त्या उघडणे :—**

(१) निवडणूक निर्णय अधिका-यास, एका किंवा अधिक मतदान केंद्रात वापरलेल्या मतपेट्या एकाचवेळी उघडून त्यांतील मतपत्रिकांची मोजणी करून घेता येईल.

(२) मतमोजणीच्या टेबलावर मतपेटी उघडण्यापूर्वी, त्या टेबलाजवळ उपस्थित असलेल्या मतमोजणी प्रतिनिधींस, मतपेटीवर लावण्यात आली असेल अशी कागदी मोहोर किंवा इतर कोणतीही मोहोर तपासून पाहण्यास व ती जशीच्या तशीच आहे याबद्दल स्वतःची खात्री करून घेण्यास परवानगी देण्यात येईल.

(३) निवडणूक निर्णय अधिकारी, कोणत्याही मतपेटीत खरोखरच ढवळाढवळ करण्यात आलेली नाही याबद्दल स्वतःची खात्री करून घेईल कोणत्याही मतपेटीत खरोखरच ढवळाढवळ करण्यात आलेली आहे याबद्दल निवडणूक निर्णय अधिका-याची खात्री पटल्यास, तो त्या मतपेटीतील मतपत्रिकांची मोजणी करणार नाही आणि त्या मतदान केंद्राच्या बाबतीत नियम ५४ मध्ये ठरवून दिलेली कार्यपद्धती अनुसरील.

**५८. मतपत्रिकांची छाननी व त्या बाद करणे :—**

(१) प्रत्येक मतपेटीतून काढलेल्या मतपत्रिकांचे आणि असल्यास डाकेने आलेल्या मतपत्रिकांचे सोयीस्कर असे गठ्ठे करण्यात येतील व त्यांची छाननी करण्यात येईल.

(२) (अ) मतपत्रिकेवर, मतदार ओळखणे शक्य होईल अशा प्रकारची कोणतीही खूण किंवा लिखाण असेल, किंवा.

(ब) तीवर मत नोंदविलेले नसेल, किंवा

(क) एकच उमेदवार निवडावयाचा असेल त्यावेळी, त्या मतपत्रिकेवर एकापेक्षा अधिक मतदारांना मते दिली असतील किंवा

(ड) एकापेक्षा अधिक उमेदवार निवडावयाचे असतील त्या वेळी, मतदाराने मतपत्रिकेवर जेवढी मते देण्याचा त्याचा हक्क असेल त्याहून अधिक मते नोंदवलेली असतील, किंवा

(इ) कोणत्या मतदारास मत देण्यात आले आहे याबद्दल शंका निर्माण व्हावी अशा रीतीने मतपत्रिकेवरील मत दर्शवणारी खूण केलेली असेल, किंवा

(फ) ती मतपत्रिका बनावट असेल, किंवा

(ग) ती मतपत्रिका खरीखुरी मतपत्रिका म्हणून ओळखता येणार नाही इतकी खराब झाली असेल किंवा छिन्नविछिन्न झाली असेल, किंवा

(ह) त्या मतपत्रिकेचा अनुक्रमांक किंवा तिचे स्वरुप हे, मतदान केंद्रावर वापरण्यासाठी अधिकृत केलेल्या मतपत्रिकेच्या अनुक्रमांकापेक्षा किंवा, यथास्थिती, स्वरुपापेक्षा भिन्न असेल किंवा

(ळ) नियम ४३, उपबंध (३) अन्वये मतपत्रिकेवर असावयास हवी अशी खूण तीवर नसेल तर, निवडणूक निर्णय अधिकारी ती मतपत्रिका बाद ठरवीलः

परंतु.—

(एक) खंड (ह) किंवा (ळ) मध्ये निर्दिष्ट केल्याप्रमाणे असणारा कोणताही दोष हा, मतदान केंद्राध्यक्ष किंवा मतदान अधिकारी यांच्या कोणत्याही चुकीमुळे किंवा कसुरीमुळे निर्माण झाला आहे, याविषयी निवडणूक निर्णय अधिका-याची खात्री पटल्यास, केवळ अशा दोषाच्या कारणास्तव ती मतपत्रिका बाद ठरविण्यात येणार नाही ;

(दोन) दिलेले मत हे विशिष्ट उमेदवारासाठीच आहे हा हेतू मतपत्रिकेवर केलेल्या खुणेमुळे स्पष्ट होत असेल तर, मत दर्शवणारी खूण ही अस्पष्ट आहे किंवा एकाहून अधिक वेळा केली आहे केवळ याच कारणास्वत ती मतपत्रिका बाद ठरवण्यात येणार नाही.

(३) उपबंध (२) अन्वये कोणतीही मतपत्रिका बाद ठरविण्यापूर्वी, निवडणूक निर्णय अधिकारी उपस्थित असलेल्या प्रत्योक मतमोजणी प्रतिनिधीस मतपत्रिका तपासण्याची वाजवी संधी देईल.

(४) बाद केलेल्या प्रत्येक मतपत्रिकेवर निवडणूक निर्णय अधिकारी 'बाद' अशी अक्षरे लिहील आणि स्वतःच्या हाताने किंवा रबरी ठशाच्या सहाय्याने बाद केल्याची कारणे संक्षिप्तपणे नमूद करील.

(५) या नियमान्वये बाद केलेल्या सर्व मतपत्रिका एका गठ्ठ्यात एकत्रितपणे करण्यात येतील.

**५९. मतमोजणीची कार्यपद्धती :—**

(१) नियम ५८ अन्वये बाद करण्यात न आलेली प्रत्येक मतपत्रिका एक वैध मत म्हणून मोजण्यात येणार नाही.

(२) मतदान केंद्रावर वापरण्यात आलेल्या सर्व मतपेट्यांमध्ये असलेल्या सर्व मतपत्रिकांची मोजणी पूर्ण करण्यात आल्यानंतर निवडणूक निर्णय अधिकारी नमुना इ-१६ मधील निकाल पत्रकात नोंद करील आणि तपशील जाहीर करील.

(३) वैध मतपत्रिकांचा नंतर एकत्रित गठ्ठा करण्यात येईल आणि बाद मतपत्रिकांच्या गठ्याबरोबरच तो एका वेगळ्या पाकिटात ठेवण्यात येईल. त्या पाकिटावर मोहोर करण्यात येऊन त्यावर पुढील तपशील नमूद करण्यात येईलः—

(अ) मतदारसंघाचे नाव,

(ब) ज्या मतदान केंद्रावर मतपत्रिकांचा उपयोग करण्यात आला त्या केंद्राचा तपशील, आणि

(क) मतमोजणीची तारीख.

**६०. मतमोजणी सतत चालू ठेवणे :—**

निवडणूक निर्णय अधिकारी व्यवहार्य असेल तेथवर मतमोजणीचे काम सतत चालू ठेवील आणि मतमोजणी तहकूब करावी लागणार असेल अशा मध्यंतराच्या कोणत्याही कालावधीत मतपत्रिका, पाकिटे व निवडणुकीच्या संबंधातील इतर कागद, स्वतःची मोहोर लावण्याची ज्याची इच्छा असेल अशा उमेदवारांची किंवा निवडणूक किंवा मत मोजणी प्रतिनिधींची मोहोर लावून, मोहोरबंद करील आणि मध्यंतरामध्ये ते अभिरक्षेत राहतील याबद्दल पुरेशी खबरदारी घेण्याची व्यवस्था करील.

**६१. स्वतंत्र मतदारसंघ नसतील किंवा एका मतदारसंघातून एकापेक्षा अधिक जागा भरावयाच्या असतील अशा बाबतीतील मतमोजणीची कार्यपद्धती :—**

उपविधीमध्ये व्याख्या केलेले मतदारसंघ नसतील अशा बाबतीत किंवा एका मतदारसंघासाठी उपविधीमध्ये एकापेक्षा अधिक जागा देण्यात आल्या असतील अशा बाबतीत या जागासंबंधीच्या मतांची मोजणी पुढील रीतीने करण्यात येईलः—

(१) मतांची मोजणी, निवडणूक निर्णय अधिकारी मतमोजणीसाठी नियुक्त करील अशा व्यक्तींच्या सहाय्याने निवडणूक निर्णय अधिका-याकडून आणि त्यांच्या पर्यवेक्षणाखाली करण्यात येईल.

(२) मतमोजणीसाठी प्रत्येक मतपेटी उघडल्यानंतर अवैध व संशयास्पद मतपत्रिकांतून स्पष्टपणे वैध असलेल्या मतपत्रिका वेगळ्या करण्यात याव्यात. अवैध व संशयास्पद मतपत्रिका निर्णयासाठी निवडणूक निर्णय अधिका-याला सादर करण्यात येतील. त्यानंतर वैध मतपत्रिका मत मोजणीस घेण्यात येतील आणि मत मोजणीत सहाय्य करण्यासाठी नेमलेल्या व्यक्तींच्या मदतीने प्रत्येक उमेदवाराच्या बाजून नोंदलेली मते मोजण्यात येतील.

(३) निवडणूक निर्णय अधिकारी उपस्थित असलेल्या उमेदावारांना आणि त्यांच्या निवडणूक किंवा मतमोजणी प्रतिनिधींना, निवडणूक निर्णय अधिका-यांच्या मते ' बाद ' करण्यास पात्र असतील अशा सर्व मतपत्रिकांची तपासणी करण्याची वाजवी संधी देईल. परंतु त्यांना त्या किंवा इतर कोणत्याही मतपत्रिका हाताळता येणार नाहीत. निवडणूक निर्णय अधिकारी बाद केलेल्या प्रत्येक मतपत्रिकेवर ' बाद ' असे पृष्ठांकित करील. कोणताही उमेदवार किंवा त्याचा निवडणूक किंवा मतमोजणी प्रतिनिधी कोणतीही मतपत्रिका बाद केल्याच्या निर्णयाच्या अचूकतेबद्दल प्रश्न उपस्थित करील तर, निवडणूक निर्णय अधिकारी अशा मतपत्रिकेवर ती बाद केल्याचे कारणही थोडक्यात नमूद करील.

(४) वापरलेल्या सर्व मतपेट्यांतील सर्व मतपत्रिकांची मोजणी पूर्ण करण्यात आल्यानंतर, निवडणूक निर्णय अधिकारी मोजणी केलेल्या आणि बाद केलेल्या मतपत्रिकांच्या प्रत्येक पाकिटावर वर्ण पृष्ठांकित करून त्या मतपत्रिका वेगवेगळ्या पाकिटात मोहोरबंद करण्याची व्यवस्था करील.

(५) निवडणूक निर्णय अधिकारी व्यवहार्य असेल तेथवर मतमोजणीचे काम सतत चालू ठेवील आणि मतमोजणी तहकूब करावी लागली असेल अशा मध्यंतराच्या कोणत्याही कालावधीत मतपत्रिका, पाकिटे व निवडणुकीच्या संबंधातील कागद, स्वतःची मोहोर लावून आणि मोहोर लावण्याची ज्याची इच्छा असेल अशा उमेदवारांची किंवा निवडणूक किंवा मतमोजणी प्रतिनिधींची मोहोर लावून मोहोरबंद करील आणि मध्यंतरामध्ये ते सुरक्षित अभिरक्षेत राहतील याबद्दल पुरेशी सावधगिरी बाळगण्याची व्यवस्था करील.

(६) सर्व मतदान केंद्रावर वापरण्यात आलेल्या सर्व मतपेट्यांमधील मतपत्रिकांची मोजणी पूर्ण करण्यात आल्यानंतर, निवडणूक निर्णय अधिकारी प्रत्येक उमेदवाराला देण्यात आलेल्या मतांची एकूण संख्या नमूद करणारे एक एकत्रित विवरणपत्र तयार करील.

**६२. नव्याने मतदान घेण्यात आल्यानंतर मतमोजणीस पुन्हा सुरुवात करणे :—**

(१) नियम ५४ अन्वये नव्याने मतदान घेण्यात आल्यास, ते मतदान पूर्ण झाल्यानंतर निवडणूक निर्णय अधिकारी, त्याने त्याबाबतीत निश्चित केलेल्या तारखेस, वेळेस व त्या ठिकाणी मतमोजणीस पुन्हा सुरूवात करील आणि त्याबद्दल उमेदवाराला पूर्वीच सूचना देण्यात आलेली असेल.

(२) नियम ५८ आणि ५९ चे उपबंध शक्य असतील तेथवर नंतरच्या मतमोजणीस लागू होतील.

**६३. मतांची फेरमोजणी :—**

(१) मतमोजणी पूर्ण झाल्यानंतर निवडणूक निर्णय अधिकारी, नमुना इ-१६ मधील निकालपत्रकात प्रत्येक उमेदवाराला देण्यात आलेल्या मतांची एकूण संख्या नमूद करील आणि ती जाहीर करील. परंतु, राखीव किंवा बिनराखीव जागांवरील कोणत्याही उमेदवारांना सारखी मते पडली आहेत आणि कोणताही एक उमेदवार निवडून आल्याचे जाहीर करण्यासाठी एका जादा मताची आवश्यकता आहे असे आढळून येईल तेव्हा कोणत्या व्यक्तीस किंवा व्यक्तींना असे जादा मत देण्यात आल्याचे समजण्यात यावे याचा निर्णय, निवडणूक निर्णय अधिकारी आणि उपस्थित राहण्याची ज्यांची इच्छा असेल असे उमेदवार यांच्या उपस्थितीत आणि निवडणूक निर्णय अधिकारी ठरवील अशा रितीने चिठ्या काढून करण्यात येईल.

(२) असे जाहीर करण्यात आल्यानंतर, उमेदवारास किंवा त्याच्या अनुपस्थितीत त्याच्या निवडणूक प्रतिनिधीस, फेरमतमोजणीची मागणी तो का करीत आहे याची कारणे नमूद करून, अगोदर मोजणी केलेल्या सर्व किंवा कोणत्याही मतपत्रिकांची फेरमोजणी करण्यासाठी निवडणूक निर्णय अधिका-याकडे लेखी अर्ज करता येईल.

(३) असा अर्ज करण्यात आल्यानंतर, निवडणूक निर्णय अधिकारी, त्या बाबतीत निर्णय देईल आणि त्यास, तो अर्ज संपूर्णतः किंवा अंशतः मान्य करता येईल किंवा असा अर्ज शुल्लक किंवा गैरवाजवी आहे असे त्यास दिसून आल्यास , तो पूर्णतः फेटाळता येईल.

(४) निवडणूक निर्णय अधिकारी पोट-नियम (३) खालील प्रत्येक निर्णय लेखी असेल आणि त्याची कारणेही त्यात नमूद केलेली असतील.

(५) निवडणूक निर्णय अधिकारी पोट-नियम (३) अन्वये अर्जास संपूर्णतः किंवा अंशतः मान्यता देण्याचे ठरवील तर तो.—

(अ) आपल्या निर्णयानुसार मतपत्रिकांची फेरमोजणी करील,

(ब) अशा फेरमोजणीनंतर, नमुना इ-१६ मधील निकालपत्रकात आवश्यक त्या मर्यादेपर्यंत सुधारणा करील ; आणि

(क) त्याने केलेली सुधारणा जाहीर करील.

(६) प्रत्येक मतदाराला देण्यात आलेल्या एकूण मतांची संख्या उपबंध (१) किंवा उपबंध (५) अन्वये जाहीर करण्यात आल्यानंतर, निवडणूक निर्णय अधिकारी नमुना इ-१६ मधील निकालपत्रक पूर्ण करील आणि त्यांनतर फेरमोजणीसाठी कोणताही अर्ज स्वीकारण्यात येणार नाही :

परंतु, मतमोजणी पूर्ण झाली असेल त्या वेळी उपस्थित असलेल्या उमेदवारांना आणि निवडणूक प्रतिनिधींना, उपबंध (२) अन्वये प्रदान करण्यात आलेल्या अधिकाराचा वापर करण्याची वाजवी संधी देण्यात येईतोपर्यंत, मतमोजणी पूर्ण झाल्यावर या उपबंधान्वये कोणतीही उपाययोजना करता कामा नये.

**६४. निकाल जाहीर करणे :—**

(१) निवडणूक निर्णय अधिकारी नंतर ज्याला सर्वात अधिक वैध मते देण्यात आली असतील असा उमेदवार निवडून आला असल्याचे जाहीर करील आणि नमुना इ-१७ मधील निवडणुकीचे विवरण प्रमाणित करील आणि निवडणूक निर्णय अधिकारी शक्य तितक्या लवकर विवरणाच्या सही केलेल्या प्रती जिल्हा सहकारी निवडणूक अधिका-याकडे पाठवील.

(२) असे प्रतिज्ञापत्र मिळाल्यानंतर जिल्हा सहकारी निवडणूक अधिकारी, राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरणाच्या सामान्य अथवा विशेष आदेशाच्या अधिन राहून समितीच्या सर्व सदस्यांची नावे अशा नावांची यादी, त्यांचे कायम पत्ते व ज्या मतदारसंघातून ते निवडून आले असतील त्या मतदारसंघांची नावे यासहित निबंधक, संबंधित संस्थेच्या सूचना फलकावर अथवा त्याच्या कार्यालयातील कोणत्याही ठळक जागी लावण्याची व्यवस्था करून प्रसिद्ध करील.

(३) जिल्हा सहकारी निवडणूक अधिकारी निवडून आलेल्या समिती सदस्यांची यादी राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरणाकडे पाठविल.

भाग–आठ

## निवडणूक खर्च

**६५. निवडणूक खर्चाचा हिशेब :—**

(१) निवडणुकीतील प्रत्येक उमेदवार स्वत: किंवा त्याचा निवडणूक प्रतिनिधी, निवडणूक घेण्याच्या आदेशाची तारीख व तिच्या निकालाची तारीख या दोन्ही तारखा धरून त्या तारखांमध्ये निवडणुकीच्या संबंधात त्याने किंवा त्याच्या निवडणूक प्रतिनिधीने केलेल्या किंवा प्राधिकृत केलेल्या खर्चाचा तपशील ठेवील.

(२) या लेख्यात नियम ६७ मध्ये विनिर्दिष्ट केलेला तपशील अंतर्भूत असेल.

(३) उपरोक्त खर्चाची एकूण बेरीज, ही राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरणाने अधिसूचित केलेल्या रकमेपेक्षा अधिक असता कामा नये.

(४) निवडणूक लढवणारा प्रत्येक उमेदवार त्याच्या निवडणूक खर्चाचा हिशेब नियम-६७ मध्ये ठरवून दिलेल्या रितीने व मुदतीत निवडणूक निर्णय अधिका-यामार्फत जिल्हा सहकारी निवडणूक अधिका-याकडे सादर करील.

**६६. निवडणूक खर्चाचा हिशेब सादर करण्यास कसूर केल्यास अनर्हता :—**

(१) जर जिल्हा सहकारी निवडणूक अधिका-याची अशी खात्री होईल की, एखाद्या व्यक्तीने,–

(अ) पूर्ववर्ती नियमात नमूद केल्याप्रमाणे आवश्यक असेल अशा मुदतीत व रितीने निवडणुकीच्या खर्चाचा हिशोब सादर करण्यास कसूर केला आहे ; आणि

(ब) अशी कसूर करण्यास संबंधात उक्त व्यक्तीपाशी कोणतीही उचीत किंवा समर्थनीय कारणे नाहीत, तर जिल्हा सहाकारी निवडणूक अधिकारी संबंधित व्यक्तीला त्याची बाजू मांडण्याची वाजवी संधी दिल्यानंतर **राजपत्रात** प्रसिद्ध केलेल्या आदेशाद्वारे, आणि त्याला योग्य वाटेल अशा इतर रितीने, तिला अनर्ह घोषीत करील आणि अशी कोणतीही व्यक्ती, निवडून येण्यासाठी अथवा कोणत्याही सहकारी संस्थेचा सदस्य म्हणून चालू राहण्यासाठी तीन वर्ष मुदतीपर्यंत अनर्ह ठरेल.

**६७. निवडणूक खर्चाच्या हिशेबाचा तपशील :—**

(१) नियम ६५ अन्वये उमेदवाराकडून अथवा त्याच्या निवडणूक प्रतिनिधीकडून ठेवण्यात यावयाच्या निवडणुकीविषयक खर्चाच्या लेख्यात, दिवसागणिक; होणा-या खर्चाच्या प्रत्येक बाबीसंबंधीत पुढील तपशील अंतर्भूत असेल,—

(अ) ज्या तारखेला खर्च करण्यात अथवा तो प्राधिकृत करण्यात आला ती तारीख ;

(ब) खर्चाचे स्वरूप (उदा. प्रवास खर्च,टपाल खर्च किंवा मुद्रण खर्च व तत्सम खर्च) ;

(क) खर्चाची रक्कम १. दिलेली रक्कम, २. अदत्त रक्कम ;

(ड) प्रदानाची तारीख ;

(इ) आदात्याचे नाव व पत्ता ;

(फ) रक्कम दिली असेल तर प्रमाणकाचा अनुक्रमांक ;

(ग) कोणतीही रक्कम अदत्त असेल, तर बिलांचे (प्रमाणकाचा) अनुक्रमांक ;

(ह) अदत्त रक्कम जिला देय असेल त्या व्यक्तीचे नाव व पत्ता.

(२) निवडणुकीच्या खर्चाच्या लेख्यासह सर्व प्रमाणके दाखल करण्यात येतील व ती, प्रदानाच्या तारखेनुसार लावण्यात येतील व उमेदवार अथवा त्याचा निवडणुक प्रतिनिधी याच्याकडून त्यावर अनुक्रमांक घालण्यात येईल आणि असे अनुक्रमांक, पोट-नियम (१) ची बाबत (फ) खाली लेख्यात नमूद करण्यात येतील.

(३) ज्याकरिता प्रमाणके मिळविण्यात आली नसतील अशा पोट-नियम (१) च्या बाब (क) मध्ये उल्लेख करण्यात आलेल्या खर्चाच्या बाबीसंबंधात त्याचा तपशील देणे आवश्यक असणार नाही.

**६८. हिशेबाच्या निरिक्षणासाठी निवडणूक निर्णय अधिका-याने नोटीस देणे:—**

निवडणूक निर्णय अधिकारी, नियम ६५ अन्वये उमेदवाराकडून निवडणूक विषयक, खर्चाचा हिशोब सादर करण्यात आल्याच्या तारखेपासून दोन दिवसात, त्याच्या सूचनाफलकावर नोटीस लावण्याची व्यवस्था करील, तीमध्ये.–

(अ) ज्या तारखेला हिशेब सादर करण्यात आला ती तारीख

(ब) उमेदवाराचे नाव, आणि

(क) ज्या ठिकाणी अशा हिशेबाचे निरीक्षण करता येईल. ते ठिकाण व वेळ निर्दिष्ट करण्यात येईल.

**६९. समितीच्या सदस्यांची नावे प्रसिद्ध करणे :—**

(१) नियम ३२ अन्वये प्रतिज्ञापन अथवा नियम ६४ अन्वये निवडणूक विवरणे मिळाल्यावर, राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण किंवा जिल्हा सहकारी निवडणूक अधिकारी निवडून आलेल्या समितीच्या सर्व सदस्यांची नावे अशा नावाची यादी, त्यांचे कायम पत्ते व ज्या मतदारसंघातून ते निवडून आले असतील त्या मतदारसंघाची नावे यासहित, दोन दिवसात सूचना फलकावर अथवा त्यांच्या कार्यालयातील कोणत्याही ठळक जागी लावण्याची व्यवस्था करून प्रसिद्ध करील.

(२) राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण किंवा जिल्हा सहकारी निवडणूक अधिकारी, निवडून आलेल्या समितीच्या सर्व सदस्यांच्या नावाची यादी, संस्थेला आणि निबंधकाला पाठवील.

**७०. उमेदवारांची अनामत रक्कम जप्त/परत अथवा जप्त करणे :—**

(१) नियम २३ अन्वये ठेवलेली अनामत रक्कम, एकतर ती ठेवणा-या व्यक्तीला अथवा त्याच्या वैध प्रतिनिधीला परत करण्यात येईल अथवा या नियमाच्या उपबंधानुसार ती जप्त होईल.

(२) या नियमात यानंतर ज्या प्रकरणांचा उल्लेख करण्यात आला आहे त्याव्यतिरिक्त इतर बाबतीत, निवडणुकीचा निकाल जाहीर झाल्यानंतर, व्यवहार्य असेल तितक्या लवकर अनामत रक्कम परत करण्यात येईल.

(३) जर निवडणूक लढविणा-या उमेदवारांच्या यादीत उमेदवारांचे नाव नसेल अथवा मतदान सुरू होण्याअगोदर तो मरण पावला असेल तर त्याची अनामत रक्कम , यथास्थिती, यादी प्रसिद्ध झाल्यानंतर अथवा त्याच्या मृत्यूनंतर, व्यवहार्य असेल तितक्या लवकर, परत करण्यात येईल.

(४) पोट-नियम (३) च्या उपबंधास अधीन राहून, जेथे मतदान झाले असेल त्या निवडणुकीत जर उमेदवार निवडून आला नसेल व त्याला पडलेल्या वैध मतांची संख्या, सर्व उमेदवारांना पडलेल्या वैध मतांच्या एकूण संख्येच्या एक दशमांशापेक्षा अधिक नसेल तर, अथवा निवडणुकीत एकापेक्षा अधिक उमेदवार निवडून येतील त्याबाबतीत पडलेल्या वैध मतांच्या एकूण संख्येला निवडावयाच्या उमेदवाराच्या संख्येने भागल्यानंतर ती एक दशमांशापेक्षा अधिक नसेल तर, त्याची अनामत रक्कम जप्त होईल.

**७१. निवडणुकीसंबंधीची कागदपत्रे अभिरक्षेत ठेवणे :–**

नियम ५२ मध्ये ज्यांचा निर्देश करण्यात आला आहे अशी पुडकी व निवडणुकीसंबंधीची इतर सर्व कागदपत्रे, निवडणूक निर्णय अधिकारी निवडणूक निकाल जाहीर करण्याच्या दिनांकापासून ६ महिने इतक्या कालावधीपर्यंत अभिरक्षेत ठेवील.

**७२. निवडणुक कागदपत्रे सादर करणे व त्यांची तपासणी :—**

(१) निवडणूक निर्णय अधिका-यांच्या अभिरक्षेत असताना :–

(अ) न वापरलेल्या मतपत्रिकांची पुडकी ;

(ब) वैध, दुबार नोंदलेली अथवा नाकारलेल्या अशा वापरलेल्या मतपत्रिकांची पुडकी ;

(क) मतदारांच्या यादीच्या चिन्हांकित प्रतीची पुडकी उघडण्यात येणार नाहीत, न्यायालयाच्या आदेशाखेरीज, त्यातील कागदपत्रांचे कोणीही व्यक्ती अथवा प्राधिकारी, यांजकडून तपासणी करण्यात येणार नाही अथवा ती कागदपत्रे त्यांच्यापुढे सादर करण्यात येणार नाहीत.

(२) निवडणुकीशी संबंधित असलेली इतर सर्व कागदपत्रे लोकांना तपासणीसाठी खुली असतील.

**७३. निवडणुकविषयक कागदपत्रांची विल्हेवाट लावणे :—**

(१) नियम ७२ मध्ये निर्दिष्ट करण्यात आलेली पुडकी, सहा महिन्यापर्यंत ठेवण्यात येतील व त्यानंतर राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण अथवा न्यायालय यांच्याकडून एतदविरुद्ध असा कोणताही निदेश देण्यात आला असेल तर त्यास अधीन राहून, नष्ट करण्यात येतील.

(२) निवडणुकीशी संबंधित इतर सर्व कागदपत्रे, ती ज्या मतदारसंघाशी संबंधित असतील त्या मतदारसंघातील पुढील निवडणुक समाप्त होईपर्यंत ठेवण्यात येतील व त्यानंतर, राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण अथवा न्यायालय यांच्याकडून एतदविरुद्ध कोणताही निदेश देण्यात आला असेल तर त्यास अधीन राहून, नष्ट करण्यात येतील.

**७४. तात्पुरत्या रिकाम्या जागा भरावयाची रीत :–**

संस्थेचा सदस्य मरण पावल्यामुळे, त्याने राजीनामा दिल्यामुळे, त्याला अनर्ह ठरविल्यामुळे अथवा त्याला काढून टाकण्यात आल्यामुळे अथवा त्याच्या पदाची मुदत संपण्यापूर्वी अथवा अन्यथा सदस्य म्हणून काम करण्यास असमर्थ झाल्याने रिकाम्या झालेल्या जागेच्या बाबतीत, संस्थेचा मुख्य कार्यकारी अधिकारी राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरणाला त्याबद्दल ताबडतोब कळवील व सोईस्कर असेल तितक्या लवकर, कलम ७३कब अनुसार ती भरण्यात येईल. अशाप्रकारे निवडून आलेली व्यक्ती, जर जागा रिकामी झाली नसती तर ज्या सदस्याच्या जागी ती निवडून आली असेल तो समितीचा सदस्य जोपर्यंत त्या पदावर राहिला असता फक्त तेवढ्याच मुदतीपर्यंत पदावर राहील.

भाग – नऊ

**'क' प्रकारच्या संस्थांच्या समिती निवडणुकीबाबत विशेष तरतुदी**

**७५. 'क' प्रकारच्या संस्थांच्या समितीची निवडणूक :—**

(१) या भागातील तरतुदी नियम ४(३) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या ' क ' प्रकारच्या संस्थांसाठी लागू राहतील.

(२) या प्रकारच्या संस्थांच्या समितीची निवडणूक खालील नमूद केल्याप्रमाणे घेतली जाईलः—

(अ) या प्रकारच्या संस्था तालुका/प्रभाग सहकारी निवडणूक अधिकारा-यास त्या संस्थेच्या समितीची मुदत संपण्याबाबत एकशे ऐंशी दिवस अगोदर क्रियाशील सभासदांच्या यादीच्या चार प्रतीसह कळविल.

(ब) तालुका/प्रभाग सहकारी निवडणूक अधिकारी हे सहकार खात्याच्या कार्यालयातील किंवा राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरणाने मान्यता दिलेल्या नामतालिकेवरील व्यक्तीची निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून नियुक्ती करेल आणि निवडणूक निर्णय अधिकारी निवडणूक कार्यक्रम तात्काळ तयार करून त्याची तालुका/प्रभाग सहकारी निवडणूक अधिका-याकडून मंजुरी घेईल.

(क) निवडणूक कार्यक्रम खालील नमूद केलेल्या तरतुदीनुसार तयार करण्यात येईल.

| अ.क्र. (१) | बाब (२) | कालावधी (३) | दिवस (४) |
|---|---|---|---|
| १ | निवडणूक कार्यक्रम आणि प्राथमिक मतदार यादीची प्रसिद्धी | तालुका/प्रभाग सहकारी निवडणूक यांनी निवडणूक कार्यक्रम मंजूर केलेल्या दिनांकाच्या पुढील दिनांकास | ०१ |
| २ | प्रारुप मतदार यादीवरील हरकती व सूचना मागविणे | प्रारुप मतदार यादी प्रसिद्ध केलेच्या दिनांकापासून ५ दिवसाच्या आत | ०५ |
| ३ | प्रारुप मतदार यादीवरील सूचना व हरकती वर निर्णय घेणे | प्रारुप मतदार यादीवरील हरकती व सूचना करावयाच्या शेवटच्या दिनांकापासून दोन दिवसांचे आत | ०७ |
| ४ | अंतिम मतदार यादी प्रसिद्धी | प्रारुप मतदार यादीवरील हरकती व सूचनांवर घ्यावयाच्या निर्णयाच्या दिनांकाच्या पुढील दिनांकास | ०८ |
| ५ | नामनिर्देशनाचा शेवटचा दिनांक | अंतिम मतदार यादीच्या प्रसिद्धीच्या दिनांकापासुन ५ दिवस | १३ |
| ६ | नामनिर्देशनपत्राची यादी प्रसिद्धी | नामनिर्देशनाच्या शेवटच्या दिनांकास नामनिर्देशनाची वेळ संपल्यानंतर | १३ |
| ७ | छाननीचा दिनांक | नामनिर्देशनाच्या शेवटच्या दिनांकाच्या पुढील दिनांकास | १४ |
| ८ | वैध नामनिर्देशनपत्राची यादी प्रसिद्धी दिनांक | नामनिर्देशनापत्र छाननी दिनांकाच्या दुस-या दिवशी | १५ |
| ९ | उमेदवारी मागे घेण्याचा दिनांक | वैध नामनिर्देशनपत्राची यादी प्रसिद्ध केल्याच्या दिनांकापासून १५ दिवस | ३० |
| १० | अंतिम उमेदवार यादी प्रसिद्धी व निशाणी नेमून देण्याचा दिनांक | उमेदवारी मागे घ्यावयाच्या निश्चित केलेल्या शेवटच्या दिनांकाच्या लगतच्या पुढील दिनांकास (निवडणूक निर्णय अधिका-याने निश्चित केलेल्या वेळी व ठिकाणी) | ३० |
| ११ | मतदान घ्यावयाचा दिनांक, वेळ व ठिकाण | उमेदवारी मागे घ्यावयाच्या दिनांकापासून ५ दिवसा पेक्षा कमी नाही (निवडणूक निर्णय अधिका-याने निश्चित केलेल्या वेळी व ठिकाणी) | ३५ |
| १२ | मतमोजणीचा दिनांक, वेळ व ठिकाण | मतदानाची वेळ संपल्यानंतर लगेच (निवडणूक निर्णय अधिका-याने निश्चित केलेल्या वेळी व ठिकाणी) | ३५ |
| १३ | मतदानाचे निकाल घोषित करण्याचा दिनांक | मतमोजणी संपल्यानंतर लगेच | ३५ |

(३) (अ) जर निवडणूक निर्णय अधिका-याने नामनिर्देशन पत्र फेटाळले असेल तर, उमेदवारास नामनिर्देशन पत्र टाळले दिनांकापासून तीन दिवसांच्या आत निबंधकाकडे अपील दाखल करता येईल. निबंधक असे अपील दाखल झाल्यापासून दहा दिवसांचे आत निकाली काढेल.

(ब) निवडणूक निर्णय अधिकारी निकाल जाहीर झाल्यानंतर दोन दिवसांच्या आत संबंधित निकाल तालुका/प्रभाग सहकारी निवडणूक अधिकारी यांचेकडे सादर करील.

(क) तालुका/प्रभाग सहकारी निवडणूक अधिकारी त्याच्याकडे असा निकाल प्राप्त झाल्यापासून तीन दिवसांच्या आत निवडून आलेल्या उमेदवाराची अधिसूचना जाहीर करेल, आणि निवडणूक निर्णय अधिका-यास समितीचे पदाधिका-यांची निवड दहा दिवसांचे आत घेण्याबाबत निर्देशित करील.

(ड) या प्रकारच्या संस्थांच्या निवडणुका नियम ५ ते नियम ७४ मध्ये नमूद केल्याप्रमाणे दिनांक आणि वेळ वगळता जसेच्या तसे लागू राहतील.

## भाग - दहा

## 'ड' प्रकारच्या संस्थांच्या समिती निवडणुकीबाबत विशेष तरतुदी

**७६. 'ड' प्रकारच्या संस्थांच्या समितीची निवडणूक :—**

(१) या भागातील तरतुदी नियम ४ (३) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या ' ड ' प्रकारच्या संस्थांसाठी लागू राहतील.

(२) या प्रकारच्या संस्थांच्या निवडणुका यासाठी बोलावलेल्या विशेष सर्वसाधारण सभेत घेण्यात येईल. अशी सभा राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरणाने नेमणूक केलेल्या व्यक्तीच्या अध्यक्षतेखाली होईल. अशा सभेची नोटीस सभेपूर्वी किमान पंधरा दिवसपूर्वी देण्यात येईल.

परंतु संस्थेची सर्वसाधारण सभेने तालुका/प्रभाग सहकारी निवडणूक अधिका-याकडे नियम ७५ मध्ये नमूद केल्याप्रमाणे निवडणूक घ्यावी याबाबत ठरावाद्वारे मागणी केल्यास, तालुका/प्रभाग सहकारी निवडणूक अधिकारी नियम ७५ अन्वये निवडणूक घेण्याबाबतची पुढील कार्यवाही करील.

परंतु आणखी असे की, जर विशेष सर्वसाधारण सभेत समिती सदस्य निवडण्यास कसूर झाल्यास निवडणुकीच्या कामासाठी नेमणूक केलेली व्यक्ती राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण किंवा जिल्हा सहकारी निवडणूक अधिकारी किंवा तालुका/प्रभाग सहकारी निवडणूक अधिकारी यांचेकडे नियम ७५ अन्वये निवडणूक घेण्यासंदर्भात अहवाल सादर करेल.

परंतु आणखी असे की, निवडणुकीच्या कामासाठी नेमलेल्या व्यक्तीस कोणत्याही परिस्थितीत मतदानाचा हक्क असणार नाही.

(३) निवडणुकीच्या कामासाठी नेमणूक केलेली व्यक्ती सभेस उपस्थित राहून आपला अहवाल राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरणाकडे अशा सभेनंतर दोन दिवसांच्या आत सादर करेल.

**७७. पदाधिका-यांची निवड :—**

समितीच्या सदस्यांची निवड झाल्यानंतर लगेचच अधिनियमातील कलम ७३कब (१२) मध्ये नमूद केल्यानुसार पंधरा दिवसांच्या आत संस्थेच्या पदाधिका-यांची निवडणूक होईल. संस्थेच्या समितीची अशी सभा राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरणाने प्राधिकृत केलेल्या अधिका-याच्या अध्यक्षतेखाली होईल.

## भाग - अकरा

## निवडणूक विवाद

**७८. निवडणूक विवाद :—**

कलम ९१ नुसार सहकार न्यायालयाकडे विनंती अर्ज सादर करून असेल त्याशिवाय निवडणुकीबद्दल कोणताही आव्हान देता येणार नाही. असा विनंती अर्ज सहकार न्यायालयात निवडणुकीचा निकाल जाहीर केल्यानंतरच केला जाईल.

## भाग - बारा

## निवडणुकीतील भ्रष्टाचार व गुन्हे

**७९. निवडणुकीतील भ्रष्टाचार व गुन्ह्यांबाबत करावयाची शास्ती :—**

लाचलुचपत या प्रकरणाच्या प्रयोजनार्थ, पुढील गोष्टी लाचलुचपत असल्याचे समजण्यात येईल :—

(१) लाचलुचपत म्हणजे—

(अ) उमेदवार किंवा त्याचा प्रतिनिधी किंवा इतर कोणीही व्यक्ती यांनी उमेदवार किंवा त्याचे निवडणूक प्रतिनिधी यांचे संमतीने एखाद्या व्यक्तीस बक्षीस म्हणून, त्या उद्देशाने प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष सहभाग :—

(अ) एखाद्या व्यक्तीने, उमेदवार म्हणून उभे राहण्यासाठी किंवा न राहण्यासाठी किंवा उमेदवारी मागे घेण्यासाठी किंवा उमेदवारी मागे न घेण्यासाठी ; किंवा

(ब) कोणत्याही व्यक्तीने स्वतः किंवा दुस-या कोणत्याही व्यक्तीने मत देण्याविषयी, कोणताही परितोष देणे–

(१) कोणत्याही व्यक्तीने उमेदवार म्हणून उभे राहण्यासाठी किंवा न राहण्यासाठी किंवा उमेदवारास आपली उमेदवारी मागे घेण्याविषयी किंवा आपली उमेदवारी मागे न घेण्याविषयी, किंवा

(२) मतदारास मत देण्याविषयी किंवा मत न देण्याविषयी प्रवृत्त करणे,

(ब) प्रेरणा किंवा बक्षीस म्हणून कोणताही परितोष घेणे किंवा परितोष घेण्याविषय करार करणे–

(अ) कोणत्याही व्यक्तीने स्वतः किंवा दुस-या कोणत्याही व्यक्तीने मत देण्याविषयी किंवा मत न देण्याविषयी, किंवा

(ब) कोणत्याही मतदारास मत देण्याविषयी किंवा मत न देण्याविषयी किंवा कोणत्याही उमेदवारास आपली उमेदवारी मागे घेण्याविषयी किंवा आपली उमेदवारी मागे न घेण्याविषयी प्रवृत्त करण्यासाठी किंवा प्रवृत्त करण्याचा प्रयत्न करण्यासाठी, प्रेरणा किंवा बक्षीस म्हणून कोणताही परितोष घेणे किंवा परितोष घेण्याविषयी करार करणे.

**स्पष्टीकरण .-** या खंडाच्या प्रयोजनांसाठी परितोष ही संज्ञा, आर्थिक परितोष किंवा पैशाच्या स्वरूपात ठरविण्यात येण्याजोगा परितोष यापुरतीच मर्यादित नाही. आणि तीत बक्षीस म्हणून केलेल्या सर्व प्रकारच्या सरबराईचा व सेवायोजनाच्या सर्व प्रकारांचा समावेश होतो. परंतु तीत कोणत्याही निवडणुकीत किंवा निवडणुकीसाठी खरोखर केलेल्या निवडणूक खर्चाच्या हिशेबात ज्याची यथोचित रीतीने नोंद करण्यात आली आहे अशा प्रदान केलेल्या रकमांचा समावेश होत नाही.

(२) गैरवाजवी दडपण, म्हणजे उमेदवाराने किंवा त्याच्या प्रतिनिधीने किंवा उमेदवाराच्या किंवा त्याच्या निवडणूक प्रतिनिधीच्या संमतीने इतर कोणत्याही व्यक्तीने कोणत्याही निवडणूक अधिकाराचा मुक्त वापर करण्याच्या कामी प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष रीतीने केलेला कोणताही हस्तक्षेप किंवा हस्तक्षेप करण्याचा प्रयत्न :—

परंतु,–

(अ) या खंडाच्या तरतुदींच्या सर्वसाधारणतेस बाधा न येऊ देता त्याच्या विनिर्दिष्ट केलेली जी कोणतीही व्यक्ती ,–

(एक) कोणत्याही उमेदवारास किंवा मतदारास किंवा ज्या कोणत्याही व्यक्तीविषयी उमेदवारास किंवा मतदारास आस्था आहे अशा व्यक्तीस समाजबहिष्कृत व जातिबहिष्कृत करणे किंवा तिला जातीतून किंवा जमातीतून काढून टाकणे यासह कोणत्याही प्रकारची इजा पोचवण्याची धमकी देईल, किंवा

(दोन) उमेदवारावर किंवा मतदारावर किंवा तो ज्या व्यक्तीविषयी आस्था बाळगतो त्या व्यक्तीवर दैवी अवकृपा होईल किंवा तिला पाप लागेल किंवा ती अशा अवकृपेस पात्र ठरवली जाईल किंवा पापी ठरवली जाईल या गोष्टीवर विश्वास ठेवण्यास कोणत्याही उमेदवाराला किंवा मतदाराला प्रवृत्त करील किंवा प्रवृत्त करण्याचा प्रयत्न करील,

ती व्यक्ती, या खंडाच्या अर्थान्तर्गत उमेदवाराने किंवा मतदाराने निवडणूक अधिकाराचा मुक्त वापर करण्याच्या कामी हस्तक्षेप करीत असल्याचे मानण्यात येईल ;

(ब) सार्वजनिक धोरण जाहीर करणे अथवा सार्वजनिक कृती करण्याचे अभिवचन देणे किंवा निवडणूक अधिकारात हस्तक्षेप करण्याच्या हेतूशिवाय केवळ एखाद्या कायदेशीर अधिकाराचा वापर करणे, हे या खंडाच्या अर्थान्तर्गत हस्तक्षेप करणे असल्याचे मानण्यात येणार नाही.

(३) उमेदवाराने किंवा त्याच्या प्रतिनधीने किंवा उमेदवारांच्या किंवा त्याच्या निवडणूक प्रतिनिधीच्या संमतीने इतर कोणत्याही व्यक्तीने, कोणतेही वाहन किंवा गलबत, पैसे देऊन किंवा अन्य रीतीने, भाड्याने घेणे किंवा मिळविणे किंवा (स्वतः उमेदवार, त्याच्या कुटुंबातील व्यक्ती किंवा त्याचा निवडणूक प्रतिनिधी याव्यक्तीरिक्त) इतर कोणत्याही मतदारास कोणत्याही मतदान केंद्रापर्यंत किंवा अशा केंद्रापासून मोफत ने-आणीसाठी अशा वाहनाचा किंवा गलबताचा उपयोग करणेः

परंतु, एखाद्या मतदाराने किंवा अनेक मतदारांनी त्यास किंवा त्यांना अशा कोणत्याही मतदान केंद्रापर्यंत किंवा मतदान केंद्रापासून ने-आणीच्या प्रयोजनासाठी त्याच्या किंवा त्यांच्या सामाईक खर्चाने एखादे वाहन किंवा गलबत भाड्याने घेणे हे या खंडान्वये भ्रष्टाचाराचे कृत्य समजले जाणार नाही.

आणखी असे की, कोणत्याही मतदाराने अशा कोणत्याही मतदान केंद्राकडे जाण्याच्या किंवा मतदान केंद्रापासून येण्याच्या प्रयोजनासाठी स्वतःच्या खर्चाने, कोणतेही सार्वजनिक वाहतुकीचे वाहन किंवा गलबत किंवा कोणताही रेल्वेचा डबा यांचा उपयोग करणे हे या खंडान्वये भ्रष्टाचाराचे कृत्य समजले जाणार नाही.

**स्पष्टीकरण.**—या खंडात आणि लगत पुढच्या खंडात वाहन या संज्ञेचा अर्थ, रस्त्यावरील वाहतुकीच्या प्रयोजनासाठी उपयोगात आणलेले किंवा उपयोगात आणणे शक्य असलेले कोणतेही वाहन असा होतो मग ते यांत्रिक शक्तीने चालणारे असो किंवा अन्य रीतीने वापरण्यात येत असो.

(४) कोणत्याही निवडणुकीच्या प्रयोजनार्थ विनिर्दिष्ट संस्थेच्या मालकीच्या वाहनांचा वापर.

(५) नियम ६५ चे उल्लंघन करून खर्च करणे किंवा खर्च प्राधिकृत करणे.

(६) निवडणुकीसंबंधीच्या कार्यक्रमाच्या घोषणेची तारीख आणि निवडणुकीच्या निकालाची तारीख या दरम्यानच्या काळात कोणत्याही मतदारास किंवा मतदारांच्या गटास विशेष आगाऊ कर्जे देणे किंवा त्यावर अन्यथा अनुग्रह करणे.

**८०. मतदानाची गुप्तता राखणे :—**

(१) एखाद्या निवडणुकीत मतनोंदणीच्या किंवा मतमोजणीच्या संबंधातील कोणतेही कर्तव्य पार पाडीत असेल अशा प्रत्येक अधिका-याने, लिपिकाने, अभिकर्त्याने, किंवा इतर व्यक्तीने मतदानासंबंधी गुप्तता राखली पाहिजे आणि ती राखण्यास सहाय्य केले पाहिजे आणि त्याने किंवा त्या व्यक्तीने (कोणत्याही कायद्याने किंवा कायद्यान्वये प्राधिकृत केलेल्या कोणत्याही प्रयोजनाकरिता असेल त्याव्यतिरिक्त) ज्यामुळे अशा गुप्ततेचा भंग होईल अशी कोणतीही माहिती कोणत्याही व्यक्तीस कळविता कामा नये.

(२) जी कोणतीही व्यक्ती उपबंध (१) च्या तरतुदीचे उल्लंघन करील तिला अपराध सिद्धीनंतर तीन महिन्यापर्यंत असू शकेल इतक्या मुदतीच्या कारावासाची किंवा दंडाची शिक्षा होईल किंवा या दोन्ही शिक्षा होतील.

**८१. निवडणुकांमधील अधिकारी इत्यादींनी उमेदवारांसाठी काम न करणे किंवा मतदानाबाबत दडपण न आणणे :—**

(१) जी कोणतीही व्यक्ती, निवडणुकीत निवडणूक निर्णय अधिकारी किंवा सहायक निवडणूक निर्णय अधिकारी किंवा मतदान केंद्राध्यक्ष किंवा मतदान अधिकारी असेल किंवा निवडणुकीच्या संबंधात कोणतेही कर्तव्य पार पाडण्याकरिता निवडणूक निर्णय अधिकारी किंवा मतदान केंद्राध्यक्ष यांजकडून नेमण्यात आलेला एखादा अधिकारी किंवा लिपिक असेल अशा व्यक्तीने निवडणुकीचे संचालन किंवा व्यवस्था करीत असताना, उमेदवारांच्या निवडणुकीतील यशाची संभाव्यता वाढविण्यासाठी कोणतेही कृत्य ( मत देण्याखेरीज इतर) करता कामा नये.

(२) वर निर्दिष्ट केलेल्या अशा कोणत्याही व्यक्तीने आणि पोलीस दलातील कोणत्याही व्यक्तीने—

(अ) निवडणुकीत आपले मत देण्याविषयी कोणत्याही व्यक्तीचे मन वळवण्याचा, किंवा

(ब) निवडणुकीत आपले मत न देण्याविषयी कोणत्याही व्यक्तीचे मन वळवण्याचा, किंवा

(क) निवडणुकीत कोणत्याही व्यक्तीच्या मतदानावर कोणत्याही रीतीने दडपण आणण्याचा प्रयत्न करता कामा नये.

(३) जी कोणतीही व्यक्ती उपबंध (१) किंवा उपबंध (२) च्या तरतुदींचे उल्लंघन करील तिला अपराधसिद्धीनंतर, एक हजार रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या दंडाची शिक्षा होईल.

**८२. मतदान केंद्रात किंवा मतदान केंद्राजवळ प्रचार करण्यास मनाई :—**

(१) कोणत्याही व्यक्तीने, कोणत्याही मतदान केंद्रात ज्या तारखेस किंवा तारखांस मतदान घेण्यात येईल त्या तारखेस किंवा तारखांस मतदान केंद्रात किंवा मतदान केंद्रापासून १०० मीटर अंतरातील कोणत्याही सार्वजनिक किंवा खाजगी जागेत पुढील कृत्यांपैकी कोणतेही कृत्य करता कामा नये.—

(अ) मते मिळविण्यासाठी प्रचार करणे ; किंवा

(ब) कोणत्याही मतदारास मत देण्याची विनंती करणे; किंवा

(क) कोणत्याही विशिष्ट उमेदवारास मत न देण्याविषयी कोणत्याही मतदाराचे मन वळविणे; किंवा

(ड) निवडणुकीत मत न देण्याविषयी कोणत्याही मतदाराचे मन वळविणे; किंवा

(ई) निवडणुकीसंबंधी कोणतीही नोटीस किंवा चिन्ह (अधिकृत नोटिशीखेरीज इतर ) प्रदर्शित करणे.

(२) जी कोणतीही व्यक्ती उपबंध (१) च्या तरतुदीचे उल्लंघन करील तिला अपराधसिद्धीनंतर एक हजार रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या दंडाची शिक्षा होईल.

**८३. मतदान केंद्रामध्ये किंवा मतदान केंद्राजवळ बेशिस्त वर्तवणूक केलेबद्दल शास्ती :—**

(१) कोणत्याही व्यक्तीने, ज्या तारखेस किंवा तारखांस कोणत्याही मतदान केंद्रात मतदान घेण्यात येईल त्या तारखेस किंवा तारखांस, मतदानाकरिता मतदान केंद्रावर येणा-या कोणत्याही व्यक्तीस त्रास होईल किंवा मतदान केंद्रात कामावर असलेल्या अधिका-यांच्या व इतर व्यक्तींच्या कामात हस्तक्षेप होईल अशा रीतीने,—

(अ) मतदान केंद्रात किंवा मतदान केंद्राच्या प्रवेश द्वाराजवळ किंवा त्याच्या जवळपास असलेल्या कोणत्याही सार्वजनिक किंवा खाजगी जागेत, ध्वनीवर्धक किंवा ध्वनीक्षेपक या सारखे मनुष्याचा आवाज मोठा करण्यासाठी किंवा तो पुन्हा निर्माण करणेसाठी कोणतेही साधन वापरता कामा नये, किंवा उपयोगात आणता कामा नये, किंवा

(ब) मतदान केंद्रात किंवा मतदान केंद्राच्या प्रवेश द्वाराजवळ किंवा त्याच्या जवळपास असलेल्या कोणत्याही सार्वजनिक किंवा खाजगी जागेत ओरडता कामा नये किंवा इतर प्रकारे बेशिस्तरितीने वागता कामा नये.

(२) जी कोणतीही व्यक्ती, उपबंध (१) च्या तरतुदीचे उल्लंघन करील किंवा त्यांचे उल्लंघन करण्यास जाणूनबुजून मदत करील किंवा अपप्रेरणा देईल तिला, अपराधसिद्धीनंतर, एक हजार रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या दंडाची शिक्षा होईल.

(३) जर एखाद्या मतदान केंद्राच्या मतदान केंद्राध्यक्षास एखादी व्यक्ती या कलमान्वये शिक्षापात्र असलेला अपराध करीत आहे किंवा तिने केला आहे असे सकारण वाटत असेल तर त्यास, अशा व्यक्तीस अटक करण्याबद्दल कोणत्याही पोलीस अधिका-यास निदेश देता येईल आणि लागोलाग त्या पोलीस अधिका-याने उक्त व्यक्तीस अटक केली पाहिजे.

(४) कोणत्याही पोलीस अधिका-यास, उपबंध (१) च्या तरतुदीच्या कोणत्याही उल्लंघनास प्रतिबंध करण्यासाठी वाजवीरित्या आवश्यक असतील अशा उपाययोजना करता येतील व अशा बलाचा वापर करता येईल, आणि अशा उल्लंघनाकरिता वापरण्यात आलेले कोणतेही साधन जप्त करता येईल.

**८४. मतदान केंद्रावर गैरवर्तणूक केल्याबद्दल शास्ती**

(१) कोणतीही व्यक्ती कोणत्याही मतदान केंद्रात मतदानासाठी निश्चित केलेल्या वेळेमध्ये गैरवर्तणूक करील किंवा मतदान केंद्राध्यक्षाच्या कायदेशीर निदेशांचे पालन करण्यात कसूर करील तर त्या व्यक्तीस, मतदान केंद्राध्यक्षांकडून किंवा कामावरील कोणत्याही पोलीस अधिका-याकडून किंवा अशा मतदान केंद्राध्यक्षाने याबाबतीत प्राधिकृत केलेल्या कोणत्याही व्यक्तीकडून मतदान केंद्रातून काढून टाकता येईल.

(२) ज्या मतदारास मतदान केंद्रात मतदान करण्याचा अन्यथा हक्क असेल अशा कोणत्याही मतदारास उक्त केंद्रात मतदान करण्याची संधी मिळण्यास प्रतिबंध होईल अशा रीतीने उपबंध (१) अन्वये देण्यात आलेल्या अधिकाराचा वापर करता येणार नाही.

(३) जर मतदान केंद्रातून अशा रीतीने घालवून देण्यात आलेली कोणतीही व्यक्ती मतदान केंद्राध्यक्षाच्या परवानगीशिवाय मतदान केंद्रात पुन्हा प्रवेश करील तर तिला अपराधसिद्धीनंतर, एक हजार रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या दंडाची शिक्षा होईल.

**८५. निवडणुकात बेकायदेशीर रीतीने वाहने भाड्याने घेणे किंवा मिळविणे याबद्दल शास्ती**

निवडणुकीत किंवा निवडणुकीच्या संबंधात नियम ७९, खंड (३) किंवा (४) मध्ये विनिर्दिष्ट केलेले कोणतेही भ्रष्टाचाराचे कृत्य केल्याबद्दल दोषी असलेल्या कोणत्याही व्यक्तीस अपराधसिद्धीनंतर, एक हजार रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या दंडाची शिक्षा होईल.

**८६. मतदान केंद्रावरून मतपत्रिका बाहेर नेणे हा अपराध असणे**

(१) जी कोणतीही व्यक्ती, कोणत्याही निवडणुकीच्या वेळी, मतदान केंद्राबाहेर मतपत्रिका लबाडीने घेऊन जाईल किंवा घेऊन जाण्याचा प्रयत्न करील किंवा असे कृत्य करण्यास जाणूनबुजून मदत करील किंवा असे कृत्य करण्यास अपप्रेरणा देईल तिला अपराधसिद्धीनंतर, एक हजार रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या दंडाची शिक्षा होईल.

(२) जर कोणतीही व्यक्ती, उपबंध (१) अन्वये शिक्षापात्र असलेला कोणताही अपराध करीत आहे किंवा तिने तो केला आहे असे एखाद्या मतदान केंद्राध्यक्षास सकारण वाटत असेल तर अशा अधिका-यास अशा व्यक्तीस, तिने मतदान केंद्र सोडण्यापूर्वी, अटक करता येईल किंवा तिला अटक करण्याविषयी पोलीस अधिका-यास निदेश देता येईल आणि अशा व्यक्तीची झडती घेता येईल किंवा पोलीस अधिका-यांकडून तिची झडती घेवविता येईल.

परंतु, जेव्हा एखाद्या स्त्रीची झडती घेण्याची आवश्यकता असेल तेंव्हा सदर झडतीत दुस-या स्त्रीकडून, सभ्यतेचे दक्षतापूर्वक पालन करुन घेण्यात येईल.

(३) अटक करण्यात आलेल्या व्यक्तीची झडती घेण्यात आल्यावर तिच्याजवळ कोणतीही मतपत्रिका सापडल्यास ती, मतदान केंद्राध्यक्ष सुरक्षित अभिरक्षेसाठी, पोलीस अधिका-याच्या स्वाधीन करील किंवा सदर झडती पोलीस अधिका-याकडून घेण्यात आली असेल तेंव्हा असा अधिकारी अशी मतपत्रिका सुरक्षित अभिरक्षेत ठेवील.

**८७. इतर अपराध व त्याबद्दलच्या शास्ती**

(१) कोणत्याही निवडणुकीच्या वेळी पुढीलपैकी कोणतेही कृत्य करणारी कोणतीही व्यक्ती निवडणुकीबाबतच्या अपराधाबद्दल दोषी असेल :

(अ) कोणतेही नामनिर्देशनपत्र लबाडीने खराब करणे किंवा लबाडीने त्याचा नाश करणे ; किंवा

(ब) निवडणूक निर्णय अधिका-याच्या प्राधिकाराद्वारे किंवा तद्न्वये लावलेली कोणतीही यादी, नोटीस किंवा इतर कागदपत्र लबाडीने खराब करणे किंवा लबाडीने त्याचा नाश करणे, किंवा ते काढून टाकणे; किंवा

(क) कोणतीही मतपत्रिका किंवा कोणत्याही मतपत्रिकेवरील अधिकृत चिन्ह किंवा ओळख पटवून देण्याबाबतचे प्रतिज्ञापन किंवा डाकेने मतपत्रिका पाठविण्यासंबंधात वापरलेले अधिकृत पाकीट लबाडीने खराब करणे किंवा लबाडीने त्याचा नाश करणे; किंवा

(ड) योग्य प्राधिकाराशिवाय कोणत्याही व्यक्तीस मतपत्रिका पुरविणे किंवा कोणत्याही व्यक्तीकडून मतपत्रिका स्वीकारणे किंवा कोणतीही मतपत्रिका जवळ बाळगणे; किंवा

(ई) मतपेटीत जी मतपत्रिका टाकण्याचा कायद्याने अधिकार असेल त्या मतपत्रिकेव्यतिरिक्त इतर कोणतीही वस्तू लबाडीने तीत टाकणे; किंवा

(फ) निवडणुकीच्या प्रयोजनासाठी त्या वेळी उपयोगात आणलेल्या कोणत्याही मतपेट्यांचा किंवा मतपत्रिकांचा योग्य प्राधिकारावाचून नाश करणे किंवा त्या घेऊन जाणे किंवा उघडणे किंवा त्यात इतर रीतीने हस्तक्षेप करणे; किंवा

(ग) लबाडीने किंवा यथास्थिती, योग्य प्राधिकारावाचून कोणतीही पूर्वोकृत कृत्ये करण्याचा प्रयत्न करणे किंवा अशी कृत्ये करण्यास जाणूनबुजून मदत करणे किंवा अशी कृत्ये करण्यास अपप्रेरणा देणे.

(२) जर ती निवडणूक निर्णय अधिकारी किंवा सहायक निवडणूक निर्णय अधिकारी किंवा मतदान केंद्रावरील मतदान केंद्राध्यक्ष किंवा निवडणुकीच्या संबंधातील कोणत्याही अधिकृत कामावर नेमलेला इतर कोणताही अधिकारी, किंवा लिपीक असेल तर तिला, अपराधसिद्धीनंतर, एक हजार रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या दंडाची शिक्षा होईल.

(३) या कलमाच्या प्रयोजनाकरिता, मतमोजणी धरून निवडणुकीचे काम किंवा निवडणुकीच्या कामाचा भाग पार पाडताना त्यात भाग घेणे किंवा निवडणुकीनंतर अशा निवडणुकांच्या संबंधात वापरलेल्या मतपत्रिका व इतर कागदपत्रे यांच्याबद्दल जबाबदार राहणे हे एखाद्या व्यक्तीचे कर्तव्य असेल तर, ती व्यक्ती अधिकृत कामावर आहे किंवा तद्न्वये असेल त्याखेरीज अन्यथा लादलेल्या कोणत्याही कामांचा समावेश होणार नाही.

**नमुना - इ-१**

[नियम ५ (१) पहा]

**राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरणाकडे पुढील वर्षी निवडणुकीस पात्र असणा-या सहकारी संस्थांचा तपशील दर्शविणारी नोंदवही**

| अ.क्र. शेरा | विभाग | | जिल्हा | संस्थेचे नाव व नोंदणी क्रमांक तालुका/प्रभाग | समितीची संख्या दर्शविणारा पोटनियम व संपूर्ण पत्ता | एकूण निवडावयाचे सदस्य मतदार क्रमांक प्रकार | एकूण निवडावयाचे सदस्य सदस्य संघांचा | व्यवस्थापन समितीची शेवटची संख्या त्याचा दिनांक | व्यवस्थापन समितीची मुदत निवडणूक झाली | संपण्याचा दिनांक |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) | (८) | (९) | (१०) | (११) |
| | | | | | | | | | | |

**नमुना - इ-२**

[नियम ५ (२) पहा]

**संस्थेच्या व्यवस्थापक समितीने त्यांची मुदत संपण्याच्या सहा महिने पूर्वी दाखल करावयाच्या माहितीचा नमुना**

| अ.क्र. | संस्थेचे नाव व नोंदणी क्रमांक व संपूर्ण पत्ता | व्यवस्थापन समितीची पहिली सभा ज्या तारखेस झाली ती तारीख | सद्याच्या व्यवस्थापन समितीची मुदत ज्या तारखेस संपली ती तारीख | उप विधीनुसार मतदार संघ | प्रत्येक मतदार संघाने निवडावयाचे व्यवस्थापन समितीचे सदस्य संख्या | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) |

**टीप.**—संस्थेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी/सचिव यांनी संस्थेची प्राथमिक मतदार यादी सात दिवसाच्या आत खालील बाबींचा अंतर्भाव करून देत असल्याबाबतचे प्रमाणपत्र :—

(१) ज्या संस्थेच्या व्यवस्थापन समितीची मुदत संपणार आहे तीने प्राथमिक मतदार यादी ही सदरची मुदत संपणेपूर्वी एकशे वीस/एकशे पन्नास दिवस करावयाचे आहे.

(२) मुख्य कार्यकारी अधिका-याने सदर मतदार यादीमधील माहिती खरी असल्याबाबत व संस्थेच्या अभिलेखाशी जुळणारी असल्याबाबत प्रमाणित करावयाचे आहे.

(३) प्राथमिक मतदार यादीतील तपशील नियम क्र. ६ मध्ये नमूद केलेप्रमाणे असावा.

**नमुना इ- ३**

प्राथमिक मतदार यादी ( वैयक्तिक मतदार)

(नियम ७ व १० पहा)

| अ.क्र. | सभासदाचे नाव (इंग्रजी वर्णमालेनुसार)<br>(आडनाव, नाव व वडिलांचे अथवा पतीचे नाव) | सभासद क्र. | वय | लिंग | पत्ता |
|---|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) |
| | | | | | |

**संस्था त्यांची मतदार यादी तयार करताना , संस्थेचे कार्यक्षेत्र , संस्थेच्या शाखांची संख्या विचारात घेऊन त्याप्रमाणे मतदार यादी करू शकेल.**

**नमुना इ- ३(१)**

प्राथमिक मतदार यादी (संस्था सभासद)

(नियम ७ व १० पहा)

| अ.क्र. | सभासद संस्थेचे नाव | सभासद संस्था प्रतिनिधीचे नाव (इंग्रजी वर्णमालेनुसार)(आडनाव, नाव व वडिलांचे अथवा पतीचे नाव) | संस्थेचा सभासद क्र. | वय | लिंग | पत्ता |
|---|---|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) |

## नमुना इ -४

[नियम १९ पहा]

निवडणूक निर्णय अधिकारी यांचे कार्यालय, ………………………… (सद्याचे कार्यालयीन पदनाम नमूद करण्यात यावे)

सहकारी संस्थेचे नाव ……………………… सहकारी संस्था मर्यादित ……………… तालुका ……………… जिल्हा ……………………

महाराष्ट्र सहकारी संस्था निवडणूक नियम, २०१३ याच्या नियम १९ प्रमाणे राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण व जिल्हा सहकारी निवडणूक अधिकारी यांनी जाहीर केलेल्या वरील सहकारी संस्थेचा सन …… ते ……. या कालावधी साठीचा निवडणूक कार्यक्रम मी, ……………………………… (कार्यालयीन पदनाम) व निवडणूक निर्णय अधिकारी, …………………………………… सहकारी संस्था मर्या., ……………, तालुका ………………, जिल्हा …………… , जिल्हा सहकारी निवडणूक अधिकारी अथवा राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण यांच्या पूर्व मान्यतेने जाहीर करीत आहे. सदर कार्यक्रमातील विविध टप्पे , संबंधित संस्थेच्या मतदार संघ अथवा मतदार संघा अनुसार सोबत जोडलेल्या अनुसूचीप्रमाणे जाहीर करीत आहे.

### अनुसूची

| अ.क्र. | मतदार संघाचे नाव | नामनिर्देशनपत्रे दाखल करण्यासाठी शेवटची तारीख व वेळ ज्या जागी नामनिर्देशनपत्रे मिळतील ती जागा | पोचलेली नामनिर्देशन पत्रे प्रसिद्ध करण्याची तारीख, वेळ व स्थळ | नामनिर्देशन पत्राच्या छाननी साठी तारीख व वेळ व स्थळ | विधी ग्राह्य नामनिर्देशनांची सूची प्रसिद्ध करण्याची तारीख, वेळ व स्थळ | नामनिर्देशन पत्रे मागे घेण्याची तारीख, वेळ व स्थळ | पात्र उमेदवारांना निशाणी वाटपाचा व अंतिम विधी ग्राह्य नामनिर्देशनांची यादी प्रसिद्ध करण्याची तारीख, वेळ व स्थळ | आवश्यक असेल तर मतदान ज्या तारखेस घेण्यात येईल ती तारीख, वेळ व मतदानाचे स्थळ | मत मोजणी ची तारीख, वेळ व स्थळ | मतदानाचे निकाल घोषित करण्याची तारीख |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) | (८) | (९) | (१०) | (११) |

निवडणूक निर्णय अधिकारी यांचा कार्यालयीन पत्ता : ………………………

संपर्क क्र.:– …………………… ई- मेल :- ………………

निवडणूक निर्णय अधिकारी यांचे नाव, स्वाक्षरी व मुद्रा

**टीप** : आवश्यकता असल्यास

राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण/ जिल्हा सहकारी निवडणूक अधिकारी यांच्या मान्यतेने

**नमुना इ- ५**

[नियम २०(२) पहा ]

नामनिर्देशन पत्राचा नमुना

| पासपोर्ट आकाराचे नजीकच्या काळातील छायाचित्र |
|---|

(.................................................................................................सहकारी संस्था मर्या., ................................................... तालुका ..........................., जिल्हा ..................................... ची सन ............ ते ............ या कालावधी साठीची निवडणूक)

मी, ...................................................................................... याद्वारे श्री./श्रीमती ...................................................... यांना................................. या मतदार संघातील उमेदवार म्हणून नामनिर्देशीत करीत आहे.

१. मतदार संघाचे नाव :- ..........................................................................................................................

२. उमेदवाराचे नाव :- ..........................................................................................................................

(आडनाव) (नाव) (वडिलांचे/पतीचे नाव)

३. उमेदवाराचे वय :- ..........................................

४. उमेदवाराचा डाकेचा संपूर्ण पत्ता :- ..........................................................................................................

(निवासी पत्त्याबाबतच्या पुरावा व ओळखपत्राची छायांकित प्रत जोडवी)

५. संपर्क क्रमांक.— अ) निवास/कार्यालय ............, ब) भ्रमण ध्वनी क्र.. .................

क) ई- मेल आय डी.........................................., ड) आधार कार्ड नं. ....................

६. मतदार संघाचे नाव ..........................................................................................................................

i) राखीव जागा असलेल्या मतदार संघात उमेदवार ज्या अनुसूचित जातीचा किंवा अनुसूचित जमातीचा किंवा इतर मागास प्रवर्गाचा किंवा भटक्या जाती किंवा विमुक्त जमातीचा किंवा विशेष मागास प्रवर्गाचा असेल त्याचा तपशील नमूद करावा.

...........................................................................................................................................................

ii) ज्या मतदार संघात उमेदवाराचे नाव नोंदलेले आहे त्या मतदार संघाचे नाव (लागू असल्यास नमूद करावे)

..........................................

iii) ज्यात उमेदवाराचे नाव मतदार म्हणून नोंदलेले असेल त्या पूर्वोल्लेखित मतदार संघाच्या मतदारांच्या यादीतील उमेदवाराचा अनुक्रमांक :-

७. सूचकाचे नाव :- ..........................................................................................................................

(आडनाव) (नाव) (वडिलांचे /पतीचे नाव)

८. संपर्क क्रमांक :- अ) निवास/कार्यालय ............ , ब) भ्रमण ध्वनी क्र. .................,

क) ई- मेल आय डी.............................. , ड) आधार कार्ड नं. .............................

९. मतदार संघाच्या मतदाराच्या यादीतील सूचकाचा अनुक्रमांकः- - ........................................................

**सूचकाची स्वाक्षरी**

१०. अनुमोदकाचे नाव ..........................................................................................................................

(आडनाव) (नाव) (वडिलांचे /पतीचे नाव)

११. मतदार संघाच्या मतदाराच्या यादीतील अनुमोदकाचा अनुक्रमांक- ................................................

**अनुमोदकाची स्वाक्षरी**

---

**(अ) उमेदवाराचे प्रतिज्ञापत्र**

निवडून आल्यास, संस्थेच्या समितीचा सदस्य म्हणून सेवा करण्याची माझी तयारी, मी, याद्वारे व्यक्त करतो.

दिनांक ........................... उमेदवाराची स्वाक्षरी

**(ब) उमेदवाराचे प्रतिज्ञापत्र**

मी याद्वारे घोषित करतो की, महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० चे कलम ७३ कअ मध्ये नमूद केलेली कोणतीही अपात्रता मी धारण करीत नाही.

दिनांक .................................................................... उमेदवाराची स्वाक्षरी

---

## (क) उमेदवाराचे प्रतिज्ञापत्र

(अनुसूचित जातीच्या किंवा अनुसूचित जमातीच्या किंवा विमुक्त जातीच्या किंवा इतर मागासवर्गीय प्रवर्गाच्या, भटक्या जाती किंवा विमुक्त जाती किंवा विशेष मागास प्रवर्ग या घटकातील उमेदवाराने द्यावयाचे प्रतिज्ञापत्र. कलम ७३ ब)

मी, याव्दारे, घोषित करतो की, मी ............................................................................ या जाती/जमाती मधील असून सदरची जात/जमाती ही महाराष्ट्रामध्ये ............................................................................ या राखीव प्रवर्गात मोडते. मी सदरच्या राखीव प्रवर्गात मोडत असल्याचे सक्षम अधिका-याने दिलेले जातीच्या प्रमाण पत्राची सत्य छायांकित प्रत सोबत जोडत आहे.

दिनांक ...................................................... उमेदवाराची स्वाक्षरी

---

## निशाणी निवडल्याबद्दलचे प्रतिज्ञापन

मी, याव्दारे, घोषित करतो की, माझ्या निवडणुकीसाठी मी निवडलेल्या निशाण्या, माझ्या पसंतीक्रमाने, खाली दर्शविल्या आहेत-

१.______________________ २.______________________ ३.______________________

उमेदवाराची सही

---

नामनिर्देशनाचा अनुक्रमांक............................................................................ हे नामनिर्देशनपत्र माझ्या कार्यालयात मला ..............................(तास) वाजता...........................रोजी (दिनांक) उमेदवाराकडून/उमेदवाराच्या सूचकाकडून मिळाले.

---

दिनांक........................................................ निवडणूक निर्णय अधिकारी सही

---

सदरच्या नामनिर्देशन पत्रावर महाराष्ट्र सहकारी संस्था निवडणूक नियम २०१३ चे नियम २१ अनुसार मी हे नामनिर्देशन पत्र तपासले असून पुढील निर्णय घेतला आहे.

स्विकारले आहे/ फेटाळले आहे.

(फेटाळले असल्यास कारणे नमूद करावीत)

दिनांक : ............................................................................ निवडणूक निर्णय अधिकारी सही

---

## नामनिर्देशन पत्राची पोचपावती व छाननीची नोटीस.

(नामनिर्देशन पत्र सादर करणा-या व्यक्तीला द्यावयाचे)

नामनिर्देशन पत्राचा अनुक्रमांक ............................................ सहकारी संस्था मर्या., ............................................ तालुका ................................................ जिल्हा, ...................................................... मतदार संघातील सन ......... ते ......... या कालावधी साठीची निवडणुकीसाठी उमेदवार ............................................................................ यांचे नामनिर्देशन पत्र मला माझ्या कार्यालयात ............................. (तास) वाजता .......................... रोजी (दिनांक) उमेदवाराकडून/उमेदवाराच्या सूचकाकडून मिळाले.

सर्व नामनिर्देशन पत्रे यांची छाननी ...................................(तास)वाजता...........................रोजी (दिनांक) .............................. ठिकाणी करण्यात येईल.

ठिकाण :.............................

दिनांक :................................ (मुद्रा) ...............................................................

निवडणूक निर्णय अधिकारी सही

**नमूना इ-६**

[नियम २७ पहा]

**उमेदवारी मागे घेण्याबाबत नोटीस**

.......................................................................सहकारी संस्था मर्या.,.......................................तालुका,.....................
जिल्हा................................ च्या समितीवरील ..................................मतदारसंघातील सन .........ते ......... या कालावधीसाठीची निवडणूक

---

निवडणूक निर्णय अधिकारी,

..........................................यांस,

महोदय,

मी, ........................................................................................................... वरील निवडणुकीतील उमेदवार, याव्दारे नोटीस देतो की, मी माझी उमेदवारी मागे घेत आहे.

ठिकाण :................................ ....................................................................

दिनांक................................ उमेदवाराची सही

---

ही नोटीस मला माझ्या कार्यालयात, तारीख ...................................... ला ................. (वेळ) वाजता .............................
श्री. (नाव)...................................................................................................यांच्याकडून देण्यात आली.

दिनांक :................................ ....................................................................

निवडणूक निर्णय अधिकारी सही

---

**उमेदवारी मागे घेण्याची नोटीस मिळाल्याची पोचपावती**

(नोटीस पोचवणा-या व्यक्तीच्या स्वाधीन करावयाची)

....................................................................सहकारी संस्था मर्या. च्या समितीवरील .....................................मतदार संघातील निवडणुकीतील उमेदवार......................................................................................................यांनी दिलेली, उमेदवारी मागे घेण्याबाबतची नोटीस मला माझ्या कार्यालयात ..........................रोजी (दिनांक).............. (तास) वाजता ........................................................ ................................ यांच्याकडून देण्यात आली.

दिनांक :................................ ....................................................................

निर्वाचन अधिकारी सही

---

येथे योग्य असेल त्या प्रमाणे पुढील पैकी एक पर्याय दाखल करावा.-

- १. उमेदवार

२. ही नोटीस हवाली करण्यासाठी उमेदवाराने लेखी प्राधिकृत केलेली, उमेदवाराची सूचक व्यक्ती

३. वर नमूद केल्याप्रमाणे लेखी प्राधिकृत केलेला उमेदवाराचा निवडणूक प्रतिनिधी.

**नमूना इ -७**

[नियम २८ पहा]

निवडणूक लढविणा-या उमेदवारांची यादी

..........................................................................सहकारी संस्था मर्या.,........................................ तालुका,.....................

जिल्हा................................. यांची ...........................मतदारसंघातील सन .........ते ......... या कालावधीसाठीची निवडणूक

| अ.क्र.<br>(१) | उमेदवाराचे नाव<br>(२) | उमेदवाराचा पत्ता<br>(३) | उमेदवाराला नेमून दिलेली निशाणी<br>(४) |
|---|---|---|---|
| | | | |

ठिकाण :..............................

दिनांक :................................ ......................................................................

निर्वाचन अधिकारी सही

**टीप—**निवडणूक लढविणा-या उमेदवारांची यादी त्यांच्या आडनावाच्या इंग्रजी वर्णमालेप्रमाणे तयार करण्यात यावी. उमेदवाराचे आडनाव नसल्यास त्यांच्या नावाच्या इंग्रजी वर्णमालेप्रमाणे यादी तयार करण्यात यावी. सदर यादी निवडणूक निर्णय अधिका-याच्या कार्यालयाच्या व संस्थेच्या सूचना फलकावर प्रसिद्ध करण्यात यावी.

**नमूना इ- ८**

[ नियम २९(१) पहा ]

**निवडणूक प्रतिनिधींची नेमणूक**

.........................................................................सहकारी संस्था मर्या.,................................ तालुका,.....................
जिल्हा ................................ यांची .................................. मतदारसंघातील सन ......... ते ......... या कालावधीसाठीची निवडणूक

---

प्रति,

निवडणूक निर्णय अधिकारी,

................................................ यांस,

मी,..........................................................................वरील निवडणुकीतील उमेदवार, याव्दारे अशी नोटीस देतो की, मी........................................................................( मतदार यादीतील क्रमांक ...........) याची उक्त निवडणुकीत माझे निवडणूक प्रतिनिधी म्हणून आजपासून नेमणूक करीत आहे.

ठिकाण :..............................
दिनांक :................................ ...................................................................

उमेदवाराची सही

---

मी वरील नेमणूक स्विकारीत आहे.

ठिकाण :..............................
दिनांक :................................ ...................................................................

निवडणूक प्रतिनिधीची सही

**नमूना इ ८ अ**

[ नियम ३० पहा ]

**मतदान/मतमोजणी प्रतिनिधींची नेमणूक**

.................................................. सहकारी संस्था मर्या., .............................. तालुका .................. जिल्हा ............ यांची .............................. मतदारसंघातील सन ......... ते ......... या कालावधी साठीची निवडणुक.

---

प्रति,

............................................... निर्वाचन अधिकारी .......................................... मतदारसंघ .......................................... मतदान केंद्र अध्यक्ष.................................... मतदान केंद्र.

मी, ........................................................................................ विद्यमान निवडणुकीतील उमेदवार ...................................................................... याद्वारे , नोटीस देतो की, मी ............................................................... मतदान प्रतिनिधी म्हणून.................................................................................................... मतदान केंद्रात ................................................................. मतदान केंद्र/मतदान मंडप क्रमांक .................................... येथे उपस्थित राहण्यासाठी नियुक्त करीत आहे.

मतमोजणीसाठी निश्चित केलेल्या जागी उपस्थित राहण्यासाठी मतमोजणी प्रतिनिधी म्हणून नियुक्त करीत आहे.

दिनांक : ................................ ................................................................

उमेदवाराची सही

मी मतदान प्रतिनिधी/मतमोजणी प्रतिनिधी म्हणून काम करण्यास संमती देतो ..............................................

दिनांक :................................ ....................................................................

मतदान/मतमोजणी प्रतिनिधीची सही

मी याद्वारे घोषित करतो की, मी .................................. मतदार संघातील निवडणुकीच्या वेळी, अधिनियम किंवा त्याखालील नियम किंवा उपविधी अन्वये निषिद्ध असलेले कोणतेही कृत्य करणार नाही.

..................................

मतदान/मतमोजणी प्रतिनिधीची सही

..................................

माझ्यासमोर सही केली.

निवडणूक निर्णय अधिकारी/ मतदान केंद्राध्यक्ष/ मतमोजणी अधिकारी

**नियम इ-९**

[ नियम ३२ पहा ]

अविरोध निवडणुकीच्या निकालाच्या प्रतिज्ञापनाचा नमुना

(संस्थेचे नाव)........................................................................................ सहकारी संस्था मर्या., ...........................................
ता. .................................. जि. ......................... ची (मतदारसंघाचे नांव) ...................................................................................
मतदारसंघातील सन ............ ते ............. या कालावधी साठीची निवडणूक.

---

महाराष्ट्र सहकारी संस्था निवडणूक नियम, २०१३ च्या नियम ३२ ला अनुसरून, मी, घोषित करतो की, खालील नमूद केलेले उमेदवार त्यांच्या नावासमोर नमूद केलेल्या मतदारसंघातून अविरोध निवडून आलेले आहेत कारण त्या जागेसाठी ते एकच उमेदवार होते.

| अ.क्र. | उमेदवाराचे नाव | मतदारसंघाचे नाव |
|---|---|---|
| (१) | (२) | (३) |
| | | |
| | | |
| | | |

मी असे प्रमाणपत्र देतो की, वरील उमेदवार संस्थेच्या व्यवस्थापन समितीच्या त्या त्या जागांवर यथोचितरित्या निवडून आलेले आहेत.

ठिकाण : ............
दिनांक : ...............

.................................................

निवडणूक निर्णय अधिका-यांची सही.

**नमूना इ-१०**

[ नियम ३५ पहा ]

**मतपत्रिकेचा नमुना**

........................................................................................... संस्थेचे नाव सहकारी संस्था मर्या., ...................... ता. ............... जि. ..................... ची ...................................... (मतदारसंघाचे नाव) मतदारसंघातील सन ........... ते ......... या कालावधी साठीची निवडणूक.

मतपत्रिका क्र.

........................................................................................... संस्थेचे नाव सहकारी संस्था मर्या., ...................... ता................. जि. ......................... ची ........................................... (मतदारसंघाचे नाव) मतदारसंघातील सन ................... ते ............. या कालावधी साठीची निवडणूक.

| अ.क्र. | उमेदवाराचे नाव | नेमून दिलेली निशाणी |
|---|---|---|
| (१) | (२) | (३) |
| | | |
| | | |
| | | |
| | | |
| | | |
| | | |
| | | |

## नमुना इ-११

[ नियम ४१ पहा ]

### आव्हानित मतांची यादी

.................................................................... संस्थेचे नाव सहकारी संस्था मर्या. .........................., ता. ..........................

जि. ..................................................... ची सन ......... ते ......... या कालावधीसाठीची निवडणूक.

मतदारसंघ ...............................................

मतदान केंद्र ...............................................

असल्यास, मतदान केंद्राचा क्रमांक ................................

| नोंदीचा अनुक्रमांक | मतदाराचे नाव | मतदारांच्या यादीतील अनुक्रमांक | मतदाराची सही किंवा अंगठ्याची निशाणी व त्याचा पत्ता | आव्हान देणा-या व्यक्तीचे नाव |
|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) |
| | | | | |

| दिलेली अनामत रक्कम (रुपये) | ओळखीबाबतचा पुरावा अथवा ओळख पटवणा-या व्यक्तीचे नाव | प्रत्येक बाबतीतील मतदान केंद्राध्यक्षाचा आदेश | अनामत रक्कम परत करण्यात येईल तेव्हा ती मिळालेबद्दल आव्हानाची सही | अनामत रक्कम परत न दिल्यास मतदान केंद्राध्यक्षाचा शेरा |
|---|---|---|---|---|
| (६) | (७) | (८) | (९) | (१०) |
| | | | | |

ठिकाण ......................................

दिनांक ..........................................

मतदान केंद्राध्यक्षाची सही

**नमुना इ – १२**

[ नियम ४६ पहा ]

**अंध किंवा अपंग मतदारांच्या सोबत्याने करावयाच्या प्रतिज्ञापनाचा नमुना**

संस्थेचे नाव ........................................................................ सहकारी संस्था मर्या., ............................ ता. ............................
जि. ...................... हिच्या .............................. मतदारसंघातील सन .................... ते ................ या कालावधीसाठीची निवडणूक.

---

मतदान केंद्राचा क्रमांक व नाव ...................................................................
मी, ............................................................................................................................ वय ........................................
रा. .................................................................................................................................... याद्वारे घोषित करतो की,

(अ) मी याचा सोबती म्हणून काम करू इच्छितो, ते वरील निवडणुकीतील अंध/अपंग मतदार असून मतदाराच्या यादीतील अनुक्रमांक वर त्यांचे नाव आहे.

(ब) मी आजच्या दिवशी यापूर्वी कोणत्याही मतदान केंद्रावर इतर कोणत्याही मतदाराचा सोबती म्हणून काम केलेले नाही.

(क) उपरोक्त मतदाराच्या वतीने मी नोंदलेले मत गुप्त ठेवीन.

ठिकाण ..............................
दिनांक ................................................ ................................................

सोबत्याची सही.

**नमुना इ १३**

[नियम ४६(२) पहा]

**अंध किंवा अपंग मतदारांची यादी**

संस्थेचे नाव ........................................................................ सहकारी संस्था मर्या., ................................... ता. ..................
जि. ..........................ची ............................ मतदारसंघातील सन .......... ते .......... या कालावधीसाठीची निवडणूक.

---

मतदान केंद्राचा क्रमांक व नाव ...................................................................................................

| मतदाराचा अनुक्रमांक (१) | मतदाराचे संपूर्ण नाव (२) | सोबत्याचे संपूर्ण नाव (३) | सोबत्याचा पत्ता (४) | सोबत्याची सही किंवा अंगठ्याचा ठसा (५) |
|---|---|---|---|---|
| | | | | |

ठिकाण : ......................

दिनांक : ......................

मतदान केंद्राध्यक्षाची सही

## नमुना इ १४

[नियम ४८(२ पहा)]

### दुबार नोंदलेल्या मतांची यादी

संस्थेचे नाव ........................................................................ सहकारी संस्था मर्या., ............................ ता. ..................
जि. ....................................................... ची सन ......... ते ......... या कालावधीसाठीची निवडणूक.

---

मतदारसंघ ..........................................

मतदान केंद्र ..........................................

असल्यास, मतदान केंद्राचा क्रमांक ................................

| नोंदीचा अनुक्रमांक (१) | मतदाराचे नाव (२) | मतदारांच्या यादीतील मतदाराचा अनुक्रमांक (३) | मतदाराचा पत्ता (४) | दुबार नोंदलेल्या मतपत्रिकेचा अनुक्रमांक (५) | ज्या व्यक्तीच्या नावाने पूर्वीच मतदान केले असेल त्याचा मतदार यादीतील अनुक्रमांक (६) | मतदाराची सही किंवा अंगठ्याचा ठसा (७) |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | |

ठिकाण : ......................................

दिनांक : ......................................

मतदान केंद्राध्यक्षाची सही

**नमुना इ १५**

[नियम ५१ पहा]

**मतपत्रिकेचा हिशोब**

संस्थेचे नाव ………………………………………………………… सहकारी संस्था मर्या., ………………………………… ता. ………………………

जि. …………………………………………… ची …………………… मतदारसंघातील सन ……… ते ……… या कालावधीसाठीची निवडणूक

मतदान केंद्र …………………………………

मतदान मंडप क्रमांक ………………………

| अ.क्र. (१) | तपशील (२) | अ. क्र. ... पासून ……… पर्यंत (३) | एकूण (४) |
|---|---|---|---|
| १ | मतदान केंद्राध्यक्षास मतदान मंडपावर मिळालेल्या मतपत्रिकांची संख्या | | |
| २ | मतदारांना दिलेल्या मतपत्रिकांची संख्या | | |
| ३ | परत केलेल्या, वापरात न आणलेल्या, मतपत्रिकांची संख्या | | |
| ४ | रद्द केलेल्या मतपत्रिकांची संख्या | | |
| ५ | दुबार नोंदणीसाठी वापरलेल्या, मतपत्रिकांची संख्या | | |

दिनांक : ………………………………… मतदान केंद्राध्यक्षाची सही

**नमुना इ १६**

[नियम ५९ व ६३ पहा ]

**निकालपत्र**

संस्थेचे नाव ········································· सहकारी संस्था मर्या., ································· ता. ································
जि. ························ ची ····························· मतदारसंघातील सन ········· ते ········· या कालावधीसाठीची निवडणूक.

---

मतदान केंद्राचे नाव : ·························································

मतदान केंद्राचा क्रमांक : ······················································

| अ.क्र. (१) | उमेदवाराचे नाव (२) | मतदार संघाचे नाव (३) | उमेदवाराला मिळालेली एकूण वैध मते (४) |
|---|---|---|---|
| १<br>२<br>३ | | | |
| | | | |

एकूण वैध मतपत्रिका संख्या : ··········································

एकूण अवैध मतपत्रिका संख्या : ··········································

दुबार नोंदलेल्या मतपत्रिका संख्या : ··········································

ठिकाण : ·········································· ··········································

दिनांक : ....................................... निवडणूक निर्णय अधिकारी स्वाक्षरी

**नमुना इ १७**

[ नियम ६४ पहा ]

**निवडणूक निकालाचा आणि समितीच्या सदस्यांची नावे प्रसिद्ध करण्याचा नमुना**

संस्थेचे नाव.......................................... सहकारी संस्था मर्या., ............................ ता. ..........................................

जि. ................................................... ची सन ......... ते ......... या कालावधीसाठीची निवडणूक

(१) सन - २०१ ते २०१ (२) मतदारसंघाचे नाव : ................................................

| अ.क्र. (१) | उमेदवाराचे नाव व पत्ता (२) | उमेदवाराला मिळालेली एकूण वैध मते (३) |
|---|---|---|
| १<br>२<br>३ | | |
| | | |

एकूण वैध मतपत्रिका संख्या : ..........................................

एकूण अवैध मतपत्रिका संख्या : ..........................................

दुबार नोंदलेल्या मतपत्रिका संख्या : ..........................................

मी घोषित करतो की, (नाव) ....................................................... (पत्ता) .................................................. हे यथोचितरीत्या निवडून आलेले आहेत.

..........................................

मुद्रा

निवडणूक निर्णय अधिकारी स्वाक्षरी

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**राजगोपाल देवरा,**

शासनाचे सचिव.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY SHRI PARSHURAM JAGANNATH GOSAVI, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004, EDITOR : SHRI PARSHURAM JAGANNATH GOSAVI.